म. ग्रं. सं. ठाणे

विषय

लेखक ह. आगहयान

सन

ग्रंथालय क्रमांक

पुस्तकाचें नांव अनाचार दुष्परिणाम
प्राजीरन पेशवेयांचे

६६

नाटक

मराठी ग्रंथ संग्रहालय.
ठाणे.

# अनाचार दुष्परिपाक

अथवा

## थाकटे बाजीराव पेशवे

यांची

# राज्यच्युति.

( अनाचारपरिणामदर्शक ४ अंकी नाटक. )

गणिका, नट, गायक या मल्ल तशा षंढ जातिशीं सक्त ॥
जाणा नृप तो निंदाहि दर्दुर कीं अहिमुखीं जसा व्यक्त ॥ —शुक्र०

हें

हरि आपाजी दीक्षित

ह्यांनीं केलें.

तें

मुंबईंत

फ्यामिलि प्रिंटिंग प्रेसमध्यें छापिलें.

---

१८८८.

किं० १२ आणे.

( सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिस्टर केलें असे. )

हें

नाटक

सर्व सत्यप्रिय व स्वदेशाभिमानी

लोकांस

अर्पण केलें असे.

ग्रंथकर्ता.

# प्रस्तावना.

पेशवाई कशी बुडाली, अनाचाराचा परिणाम काय होतो, कुबुद्धीचें फळ काय, हें ह्या नाटकांत वर्णिलें आहे. गृहकलह हा मूळ नाशाचा पाया होय. कृत्या आनंदीबाईनें भोळ्या काकाला घेऊन बिचाऱ्या नारायणरावाला गारद्यांचा बळी केलें. तेव्हांच या पेशवाईची गादी डगमगली; ती खालावत जाऊन राव बाजीला बेदावा लिहून देण्याची वेळ आली ! नाहींतर एवढें जोरदार राज्य दोन वारांत पार व्हावयाचें नव्हे. आणि बखरी लिहिणारे ह्मणतात कीं, ‘ पेशवे यांचे वंशांत बाजीरावसाहेब यासारखा बे हिमती, दुसऱ्याचा विश्वास नाहीं, शहाणें मनुष्य जवळ ठेवावयाचें नाहीं आणि अंगांत शिपाईगिरीही नाहीं ’ तें सत्य आहे.

अशाचें वर्णन कां कारितां ? दुसरी सुंदर सुंदर चरित्रें नाहींत काय ? खरें तें. पण सगळ्यांनीं आपल्या लोकांच्या गुणांचेंच वर्णन केलें तर दुर्गुणाचें तरी कोणीं करावें ? ‘ अप्रियस्यच पथ्यस्य वक्ता श्रोताच दुर्लभः ’ आतां धाकटे बाजीराव स्वतांच गादीला अपाय करणारे आहेत, असें नाना फडनवीस

ह्मणत होतेच. त्यांत आणखी आमचे शाईर सगन भाऊ ही ह्मणतात कीं, “ चौघांनीं भरी भरून घातली गोष्ट विशादीला ॥ फुटली मूठ आंवळ्याची राव पडला अवकाळीला ” असेंही झालें आहे खरें. तेव्हां पुष्कळ आमच्या मित्रमंडळीनें ‘ नको नको ’ ह्मणत असतां रंगभूमीवर अभिनयन करण्यासारखें स्फोटन केलें आहे. त्याबद्दल क्षमा असावी.

वाचक हो, गंगाधरशास्त्री यांस त्रिंबकजी डेंगळ्यानें मारल्यानंतर ( १८१५ ) बाजीराव मालकम साहेबास शरण ( १८१८ ) जाईपर्यंतचा ३॥ वर्षांचा इतिहास यांत आहे. इकडे अवधान असावें. यांत मुख्य नायकापासून तों अगदीं हलक्या पात्रापर्यंत स्वभाववर्णन केलें आहे त्याकडेही विशेष लक्ष्य असावें.

नाटक रचण्याचा हा प्रथम प्रयत्न आहे. तेव्हां ‘ नचापि काव्यं नवमित्य वद्यं’ ह्मणजे नवें तितकें वाईट असें न करून हंसक्षीरन्यायानें सेवन व्हावें ही प्रार्थना आहे.

**नाटककर्त्ता.**

# पात्रें.

---

बाजीराव पेशवे— } रघुनाथराव दादांचे पुत्र—यांस बाबासाहेब ह्मणत.

एल्फिन्स्टन—इंग्रजांकडील पुण्याचा रेसिदेंट.

बापूगोखले—पेशव्यांचा शूर सरदार.

गोविंदराव काळे—पेशव्यांचा हैदराबादचा वकील.

खरशेटजी मोदी [illegible] खुशरजी मोदी—पारशी वकील इंग्रजांचा, पु[illegible] दरबारचा.

मालकमसाहेब—इंग्रजी सैन्याधिकारी [illegible] पोलिटिकल एजंट.

विठ्ठल नरसिंह विंचूरकर,
रास्ते,
आबा पुरंदरे,
मोरदीक्षित मराठे,
पटवर्धन,
नारोपंत बक्षी,
रूपराम,
मोहनगीर बुवा,
} पेशव्यांचे सरदार.

त्रिंबकजी,
गहेनाजी,
} पेशव्यांचे हुजरे.

कदीम—एक शूर शिपाई.

वाराणसीबाई—पेशव्यांचें कुटुंब.

| | |
|---|---|
| अन्याबा रहातेकर,<br>सीताशेंडी,<br>बया दातारीण,<br>ताई पेठीण,<br>उमा फडकीण, | बाजीरावाचे उनाड स्नेही. |
| विठ्ठलपंत पुणेकर,<br>खंडू खिजमतगार | बापू गोखल्याची मंडळी. |

ठाकूरदासबोवा—बापूंचा गुरु.

बाळाजी—एक कारकून गृहस्थ.

शास्त्री, पुराणिक, उपाध्ये, ज्योतिषी, कोतवाल, कारकून, तमासगीर, शिपाई, कानफाटे, प्रेक्षक, इत्यादि मंडळी.

# अनाचार दुष्परिपाक

अथवा

# धाकटे बाजीराव पेशवे यांची राज्यच्युति.

## अंक १ ला.

### श्लोक.

हस्तीं अंबुज, कंबु, शुंभ निधनीं दक्षा गदा शोभते ॥
दैत्यांच्या दलनीं भयंकर रणीं घे चक्र दुर्धर्षतें ॥
राहे जी करवीर पुण्यभवनीं भक्तार्त्यघध्वंसिनी ॥
देवो ती सुख संहरोनि विपदा तुझी कुलस्वामिनी ॥ १ ॥
पारावार समोर जो पसरला लक्षावधी योजनें ॥
पाहोनी उडतां नभीं वघितला संत्रस्त लंकाजनें ॥
'श्रीराम' प्रभुनाम गर्जत वनीं श्रीसन्निधीं पावला ॥
पावो तो भगवान् कपीश हनुमान् त्याच्या नमूं पावलां ॥ २ ॥

### पद.

( जय श्री रमणा भवभय० या चालीवर. )

हिमनगबाळा गिरिशजिव्हाळा मंगल देवो आम्हांला ॥
नाट्यकथानक नूतन रचिलें प्रियकर होवो सर्वांला ॥ धृ० ॥
'मद्वचनातें अवमानुनिया दक्ष जनकमख बघण्याच्या ॥

उत्कंठेनें कैलासाहुनि गेलिस गेहीं ताताच्या ॥
स्वागतपूर्वक येये ऐसें वदले पाहुनि कोण तुला' ॥ हिम०॥१॥
पतिवचनाचा रोख कळुनिया भिउनी खालीं मानेला ॥
घाली तंव पद नखेंदु बिंबीं जटाजूट वरि गंगेला ॥
धारण केल्या स्मितमुख पतिला पाहुनि जीला धीर अला ॥२॥
नेत्रापांगें भृकुटीभंगें बोले 'राहो गत गोष्टी ॥
क्षमा करावी चुकल्यें चुकल्यें अठवुनि होतें मन कष्टी' ॥
भोला शंकर अनुतापानें प्रसन्न होउनि तिज वदला ॥ हिम० ३
'कोकिलयुवती रम्यवनांतरिं नव प्रसवला आम्रांच्या ॥
छायेमध्यें करितां कूजित मंजुल रव तो तरि साचा ॥
श्रवणीं ऐकुनि लुब्धचि झालों धांवत आलों पायांला' ॥
प्रेम पुरस्सर वाणी परिसुनि दृढ आलिंगन दे पतिला ।हिम०४

( इतकें मंगलाचरण झाल्यावर सूत्रधार पुढें येतो. )

**सूत्रधार**—( पडद्याकडे तोंड करून ) प्रिये, नाट्याचार्याला आवश्यक लागणाऱ्या सामुग्रीची सिद्धता तुवां करून ठेविलीच असेल तरी अंमळ इकडे येशील तर बरें. समजलीस का ? ( उजवा हात पुढें लांब करून खुणावितो ) इकडे ये.

**नटी**—( प्रवेश करून ) कशास ? आत्तांच काय तटलं आहे ? कांहीं विशेष आहे काय ?

**सूत्र०**—हो, विशेष आहे ह्मणूनच हाक मारली. समजलीस ?

**नटी**—समजल्यें. नवी ठेवणीची पैठणी काढून नुकतीच नेसाया करितां घडी मोडली होती. तों

इतक्यांत हाक मारणें झालें. आतां नेसूं केव्हां व जाऊं केव्हां ?

**सूत्र०**—अगे जायाचें कुठें ? पात्रें सजविण्या करितां ह्मणत्येस काय ? ( तिच्या खांद्यावर डावा हात टाकतो. )

**नटी**—( झिडकारून ) जळं मेलं. आपल्याला नेहमीं नाटकच दिसतं. मला वाड्यांत जायाचं आहे बरं का ?

**सूत्र०**—( आश्चर्यानें तोंडापर्यंत उजवा हात नेतो ) तुला ! आणि वाड्यांत ! आणि जायाचें ? अगे आमंत्रण तरी पाहिजे कीं नको !

**नटी**—कारभाऱ्यांच्या घरच्या आनंदीबाई नव्हत्या का आल्या ?

**सूत्र०**—मला माहित नाहीं. पण त्या कशाकरितां ?

**नटी**—पुरुषाला का बायका येऊन सांगतात घरच्या ? धाकट्या बाईसाहेबांच्या फळशोभनाचा सोहळा आहे ह्मणून मला गेलंच पाहिजे.

**सूत्र०**—मग तूं मला आधीं विचारूं नयेस का ? आमंत्रण घेतलेंस देखील अं ! आतां विचारावयाचा काळ उरला आहे कोठें ? ( कपाळास बोट लावितो. )

**नटी**—पुरें मेलं. नित्य उठून हीच कटकट. बायकां-

च्या गोष्टी पुरुषाला काय कळवाव्या ह्मणून सांगितलें नाहीं.

**सूत्र०**—अगे तसें नव्हे. करव्यां कडून आमंत्रण आणि श्रीमंतांच्या वाड्यांत ह्मणून शंका आली.

**नटी**—हो ( मान मुरडिते ) शंका बापडी येत नाहीं कधीं ? नवरात्रांत, गणपतींत अशीच मेली चिकित्सा.

**सूत्र०**—तर मग तुझ्या मनांत एकूण जायाचें आलें ह्मण.

**नटी**—मग त्याला आडकाठी आहे काय कांहीं ? सांगावी, रहावें बापडी ! श्रीमंत कसे समदृष्टि आहेत. जसा भोळा सांबाचा अवतार !

**सूत्र०**—तुह्मांला त्यांत काडी इतकें समजत नाहीं व तुला सगळें फोड करून सांगण्याची जरूरी नाहीं. तशांतून दुसऱ्या कोणी बाया आल्यातर पाहतां येईल.

**नटी**—कशाला ? मीच जातें त्या सावित्रीबाईच्या घरावरून ह्मणजे झालं. मग सखुबाई, बकुताई व रमावहिनी मिळून वाड्यांत जाऊं. मग भीति कसली ?

**सूत्र०**—( विचार करून ) इतक्या दूर सावित्रीबाईकडे तूं आत्तां ह्यावेळीं जाणार ! नवल आहे बुवा !

तूं आतां कोठेंच एकटी जाऊं नकोस. समजलीस ?

**नटी**—नसतीचं भलती कल्पना. ( तोंड मुरडते ) मी जाणार वरं कां. कित्ती बायका एव्हांच जमल्या असतील. ( जाऊं लागते. )

**सूत्र०**—( तिचा पदर धरतो. इतक्यांत पडद्यांत डफावर थाप पडते " खुप शर्थिनें राज्य राखिलें यशवंत फडनीस नाना " जी, जी, जी, जी, असा पोवाडा ऐकूं येतो ) पहा, (पडद्याकडे बोट करून) ऐकलेंस कां, हे तमासगीर लोक इकडेसच येत आहेत. सांग तरमग एवढ्या रात्रीं एकटेंदुकटें जाण्याची बोली आहे काय ? भल्या माणसाची या राज्यांत वूज नाहीं. ते पहा आलेच. ( तिचा हात धरितो )चल कशी घरांत जाऊं. घालूंद्या ह्या रांडलेकांनां हवा तितका गोंधळ. ( दोघे जातात. )

( ही नाटकाची प्रस्तावना झाली. )

---

## प्रवेश-पहिला.

### स्थळ-गवत्या मारुति.

( तिघे तमासगीर व कांहीं लोक येतात. )

**१ ला तमासगीर**—बसा महाराज, कांहो, खालीं कां वसतां ? मारुतीच्या पारावर बसा. दे रे डफ इकडे, चालूंद्या.

# पोवाडा.

रतिवंत महाराज पेशवे माधव विष्णु अवतार ॥
हिंदुस्थान, कर्नाटक, तेलंगण काबिज केलं सारं ॥
घरिं बैसल्या घरिं खंडण्या येती वृत्तांत ऐका साचार ॥
शिंदे, होळ्कर, गाइकवाड नामी नामी सरदार ॥
जात रोहिले पठाण कांपाति राज उदापुरचा राणा ॥

ऐकलंत कां महाराज उदेपुरचा राणा रजपूत वरें थर थर कांपत होता. पण एवढी कुणाची अक्कल? (पुनः थाप मारतो) तरः—

खुब शर्थीनें राज्य राखिलें यशवंत फडनीस नाना ॥ १ ॥

आणखी ऐकाः—

जरिपटक्याचें निशाण ताया हरिपंताला सरदारी ॥
चौखंडामधिं धौशा वाजतो कइकाला दहशत भारी ॥
हुजुरातीची जिलिब चालती मानकरी सेना सारी ॥
पाटणकर, घोरपडे, निंबळकर तल्वारीचे धारकरी ॥
आपाजी बळवंतराव शिपाई शाइमधिं एक दाणा ॥
खुब शर्थीनें राज्य राखिलें यशवंत फडनीस नाना ॥ २ ॥

केवढी हो त्यांची अटोकाट बुद्धि !

भले बुद्धीचे सागर नाना ऐसे नाहीं होणार ॥
मर्दा मर्दा राज्य राखिलें मनसोबीची तलवार ॥ जी, जी,

**२रा तमा०**—आतां ह्या तुमच्या खऱ्या तलवारी चालेनात. आणि नानांची तरवार तर सारी अकलेची वरें काय?

**प्रेक्षक**—खरें आहे. नानांचें चातुर्यच विलक्षण. एके बाजूला टिप्पू, दुसरीकडे भागानगरचे नबाव

श्रीनिर महादेव [illegible]
७
[illegible]

व तिकडे कलकत्तेकर इंग्रज या सर्वांना मुठींत आंवळलें होतें.

**२रा प्रेक्षक**—काय हो सितारामबोवा सवाई माधवराव साहेबांवर तरी नानांचें प्रेम विशेष होतें नाहीं बरें ?

**सीता०**—हें हो काय विचारितां ? आमचे वस्तादजी असें ह्मणतातः—

लक्ष धन्याचे पायीं चित्ता पासूनि हा ज्याचा भाव ॥
पहा राइचें पर्वत केले वाढविले माधवराव ॥

**३रा प्रेक्षक**—ठीक, ठीक, ठीक. लग्नासाठीं तर सारे ५६ देशचे राजेरजवाडे आणले होते नाहीं ? लाखों हत्ती, पालख्या, ग्याने काय लोटले होते ! !

**१ला तमा०**—दोन लाख नुसता उंबरा झाला होता. पहाः—

लग्ना साटीं आणले ज्यानें मोठे मोठे उमराव ॥
जागजागीं दिल्या बैठका अनंत होतो उत्साव ॥

आणि आपले हिंदुपद बादशाह छत्रपति तरः—

तखत राया रतरस्तांचा पुढें वाजे नौबतखाना ॥
खुब शर्थीनें राज्य राखिलें येशवंत फडनीस नाना ॥३॥ जी,

( इतक्यांत दोघे अमलदार येतात,
व बरोबर एक मशालजी असतो.)

**१ला अमलदार**—कोणरे हे वाटेंत जी, जी, जी, करीत आहेत. सगळा रस्ता अडला ना ? (जरा न्याहा-

ळतो ) गहेनाजी, समजलेत कां हे कोण ते ?

**गहेनाजी**—नाहीं, नारोबा कोणबरें हे ? मला अंधाराचें नीट दिसले नाहींत. मशालजी, मशाल जरा पुढें कर पाहूं; ( पाहतो ) हं हं बाळा वहिरूचे शाग्रीत अरे हा तो आमचा लंगोटियार (बोटानें दाखवून) सीतारामबुवा, अरे लेकाच्या तुह्मी अहांत काय ? चालूं द्या तरमग आह्मांला वाट द्या ह्मणजे झालें.

**मी०**—या हो, या गहेनाजी, या नारोपंत जरा बमा तरी. ऐका आमच्या गुरूजींचें कवन. ( दोघे थांबतात ) ह्मणरे ह्मण चल ' तखत् राया० ' ( हें कडवें पुन्हा ह्मणतो.)

**ना०**—वाहवा, वाहवा. कायहो आमच्या बाबासाहेबांचें नाहीं कां यांत कांहीं वर्णन ?

**२रा तमा०**—हो नाहीं कां ? पुढेंच ऐका:—

राव बाजीचें पुण्य प्रतापी पुणें शेहर केवळ काशी॥
गोब्राह्मणां प्रतिपाळितो दक्षिणा श्रावण मासीं ॥

याच श्रावण महिन्यांत श्रीमंत जरा उदासीन दिसले नाहींतबरें ?

**नारोपंत**—त्याला पुष्कळ कारणें झालीं आहेत. त्याची वाचाळता करण्याची जरुरी नाहीं. बहुतेक जगजाहीर आहेत.

**१ला प्रेक्षक**—बेटावरल्या टोपीवाल्याची सारी तोशीस.

**२रा प्रेक्षक**—त्याच्याकडे काय बोल आहे ? त्रिंबकजी

एवढें करितांना तरमग अशा थराला गोष्ट कशाला आली असती ?

२रा प्रेक्षक—ह्मणूनच श्रीमंत रात्रंदिवस फिकिरींत दिसतात ते.

सीता०—नाहींतर हरिदास, पुराणिक, गवई, शास्त्री, भिक्षुक, दशग्रंथी, यांचा सन्मान झाल्या वांचून राहता का ?

गहेना०—( नारोपंतास चिमटा घेतो ( कानांत ) अजून पुष्कळ कामें उरकावयाचीं आहेत, तुह्मी पाय काढलात ह्मणजे आह्मांला बरें. )

नारो०—बसा मंडळी. येतों. चला गहेनाजी चला ( मंडळीस ) येतों बरें.

सीता०—थांबा हो नारोपंत जरा. ( मंडळीकडे तोंड करून ) काय हो रावजी, किती तास वाजले असतील बरें ?

राव०—तिसऱ्या घंटेचा अंमल आहे वाटतें.

२रा प्रे०—छत् आतां तोफ होईल. मग कोतवालीच-त्रास आहे.

सीता०—आह्मीही पण आपलें आटपतें घेतों. चलरे चल.

सेवक सीताराम जयाचा दशनामी भगवा बाणा ॥
खुब शर्थीनें राज्य राखिलें यशवंत फडनीस नाना ॥ ४ ॥

झालें बुवा गहेनाजी, आह्मी ही आलोंच तुह्मासंगातीं

( आपला डफ वगैरे साथीदारापाशीं देतो व गहेनाजीचा हात धरतो ) तुह्मांलाच इतकी निकड कसली ?

**गहे०**—( त्याच्या कानाशीं लागतो ) यामुळें आणखी काय ?

**सीता०**—तरमग संभाळून. फत्ते होऊंद्या हां, घ्या वलभीम मारुतीचें नांव. पण कायहो एव्हांच ?

**नारो०**—अहो आज अनंत चतुर्दशी शुभ दिवस आहे. व अमृतसिद्धियोगही आहे. चला आतां ( दोघे चालूं लागतात ) रामराम मंडळी (दोघे-जातात.)

**१ला प्रे०**—या बुवा असे मध्यें या. घ्या जरा पान तंबाकू. कात आहे का तुमच्या पाशीं रावजी ? माझ्या पाशीं बाकी सर्व आहे. ( चंची सोडतो ) हात्तेच्या यांत आडकिता आणायला मुळींच विसरलों.

**सी०**—थांबा माझ्या पाशीं सगळें आहे ( बसतो, सर्व तंबाकू खातात. ) इतक्यांत तोफ होते. सर्व आटपतात.

**२रा तमा०**—चलारे बुवा चला. आतां इथें उभें राहायाची सोय नाहीं.

( सर्व जातात. )

---

## प्रवेश–दुसरा.

**स्थळ**–ठाण्याचा किल्ला.

( पहाऱ्याचा शिपाई फिरतो, इतक्यांत एक कानफाट्या गोसावी येतो. )

**गो०**—( किनरी लावून वाजवितो व गातो. )

दिधल्यावरतीं तुज देवानें उणें कुणाला बोलुं नको ।।
मायबापावर रुसूंनको, दूर एकला बसूं नको ।।
लंडें, गुंडें, हिरसें तट्टु याची संगत धरूं नको ।।

ऊं, ऊं, ऊं 'सिता माई भिक्षा आणा.' ( मनाशीं ) मघांशीं त्याबाईनें सांगितलेंच आहे कीं, आतां आपल्या भावाची रखवालीची पाळी सरत आली आहे, तेव्हां त्याला एकदम सलाम केला तर जवळ कोंणी असल्यास आपली सगळी मसलत फसेल. करितां युक्तियुक्तीनेंच घेरला पाहिजे. ह्मणजे कोणास शंकेस जागा रहाणार नाहीं. मग वहिणीकडली संकेताची थोडी ओळख दिली ह्मणजे बहुधा बस्स होईल. बाकी तिनें त्याला भारून ठेविलेलाच असेल. ओळखीचें कारण पडूं नये तिच्या ह्मणण्यावरून. असो; ( उघड ) भिक्षा घाला वो माय.

**शिपाई ( संत्री )**—ये तूं कोन है? क्या ये किसीका मकान है?

**गो०**—बाबा, आह्मांसनी तुमची बोली समजत नाहीं.

शि०—अच्छा, अहो गोसाई बोवा, हें घर नाहीं. हा किल्ला आहे. किल्ला, तुरुंग बरें ?

गो०—आह्मांला काय गोसाव्याला घर काय, किल्ला काय आणि तुरुंग काय सारखेंच. थोडी भिक्षा वाढली ह्मणजे झालें.

शि०—अरे वेड्या पण इथें का आमचीं घरें, दारें, बायका, पोरें आहेत ?

गो०—आह्मांला तुमचीं बायका पोरें नकोत महाराज. मला कानफाट्याला भिक्षा आली ह्मणजे झालें.

शि०—छिः अरे इथें आह्मी जेवत नाहीं ह्मणतोना. कोण त्रास हा.

गो०—नसाना. पैसा शिवराई द्याल तरी चालेल. ( किनरी लावितो ) पहा या आठ दिवसांच्या आंत तुह्मांला मोठा लाभ आहे. ( नेत्र संकेत करतो ) दादाचें दोंद वाढेल ( किनरींत तसेंच वाजवितो. ) दादाच्या पोटांत गुड्गुड् गुड्गुड् होईल ( पुनः तसेंच वाजवितो. )

शि०—( खदां खदां हंसतो ) वा, वा, वा, तुमची किनरी तर खाशी बोलते बा. एखादें मजेशीर गाणें गातां का इच्यावर.

गो०—हो, मला फटके वगैरे पुष्कळ येत आहेत-ह्मणूं ?

शि०—थांबा. ( हांका मारतो ) सटवाजी अरे सट-

वाजी, कोण आहे रे तिकडे; राम्या जा लेका सटूवाजीला हाक मार आणि त्याला सांग कीं, आठ वाजले माझा पाहरा आटपला. तूं ये ह्मणावें. ( पडद्याकडे पाहून ) अरे हा आलाच. राम्या नको जाऊं. (पडद्यांत जी 'हवालदार' असा शब्द होतो) सटूवाजीराव ही घ्या बंदुक आमची क्षणभर. आतां ह्या खिडकी खालीं बसून जरा या बोवांचें गाणें ऐकूं. देवढीवरच्या लोकांनांही बोलावतो. अरे राणुजी, ए यंक्या, अहो ह्मादबा, सर्व इकडे या लेकाच्या हो. बोवा नामी गाणें ह्मणतात. ( सर्व येतात ) अरे संत्रजी, कांबळें आणा कांहीं तरी बसायला. यंक्या जा संत्रजी आण. ( तो जाऊन सतरंजी घेऊन येतो. ) कुठें टाकशील बरें [ बोटानें दाखवितो ] त्या खिडकी खालीं. [ सतरंजी पसरून सर्व गोंसाव्या भोंवतालीं बसतात.] काय बुवा असें एक नामी गाणें ह्मणाल कीं ज्याचें नांव तें.

गों० —( किनरी लावतो व सलाम करतो ) पहा, जसें येईल तसें ह्मणतों —( देव पर फटका.)

अष्टौ प्रहर येउंदे वाचें नाम देवाचें शिव हर, हर, हर, ।।
दे टाकुनि हे छंद वावुगे फंद विषयिंची काय मजा ।।
हरि नामाची लावि ध्वजा ।। असार हा संसार त्यजा ।।
तमोरजाला देच रजा ।। क्षमा, शांति मनीं धरीत जा, ।।

सत्वगुणाची करी पुजा ॥ भगवीं वस्त्रें करी पोट भर ॥
भिक्षा मागे घर, घर, घर ॥ अष्टौ० ॥ १ ॥

येउन परोपकारें शरिर झिजवावें जैसा मैलागिरि चंदन ॥
कर सज्जन चरणीं वंदन ॥ सा शत्रूंचें करी कंद न ॥
गृहवैभव वाजी, स्यंदन ॥ अशाश्वती ह्या हो धुंदन ॥
एक हरिचरणीं फिर गर, गर, गर ॥ अष्टौ० ॥ २ ॥

**हवालदार**—हा छान ह्मटला, दुसरा एकादा ह्मणा.
(सर्व माना डोलवितात.)

**सर्व**—फार छान, फार छान ह्मटला बुवा.

**कैदी**—(माडीवर खिडकीच्या तोंडाशीं येऊन मनाशीं) आज पुष्कळ दिवस झाले, बाबासाहेबांकडून पत्र नाहीं! नाहींतर माझ्या वांचून सुपारीचें खांड तोंडांत टाकावयाचे नाहींत, ते आतां एवढे निष्ठुर वरें कशानें झाले? अथवा राजे लोकते. आमच्या सारख्या पायपोसाची काय परवा करतात? काम व्हावयाचें होतें तोंवर अंजारलें गोंजारलें, व कधीं आजन्मांत केलें नाहीं असें ब्रह्महत्येचेंही पातक कपाळीं बांधलें. आधीं दुसऱ्यांच्या साध्वी स्त्रिया फांशांत पाडून पापाचे घडे भरीतच होतों, तो त्यांची सांगता या ब्राह्मणवधानें केली! काय मला बुद्धि सूचली आणि महा पुण्य क्षेत्रांत कीं रे म्यां ब्राह्मणावर हात टाकिला! अस्तु, त्याचें फळ हें आलेंच. महाराज कांहीं

करतील या भरंवशावर होतों, पण तें स्वस्थच आहे-त. हाय हाय! (सुसकारा टाकतो) अरे, प-ण आपल्या खिडकी खालीं गाणें कोण चाललें आहे? मघां पासून एक सारखें सुरू आहे, ऐकूं तरी या.

**हवा०**—दुसरा एकादा ह्मणा फकीरसा.

**गोसा०**—ऐका तर मगः—

चल उठ घडी ही साधायाची व्यर्थचि बावा दवडुं नको ॥
सखा तुझा हा परम प्रीतिचा झुरतो मनीं हें पाहुं नको ॥ धृ०॥
नेतां ऋषीनें झाला कष्टी दशरथ जैसा रामाला ॥
सवत्सधेनु नेतां रायें वशिष्ठ जैसा गहिवरला ॥
अक्रुर आला क्रूर जहाला रामकृष्ण जें नेलें ॥
वक्षस्थळ तें पिटुनि गोकुळीं आकांत किति झाले ॥
मृगशावका व्याध वधीतां हरिणी जैशी लोळे ॥
लाल शरीरें तुजला हरितां मन हें त्याचें पोळे ॥
चातक पक्षी मृग हा लक्षी तेंवि तुझ्या दर्शना ॥
उत्कंठित हा राव जहाला पाहुं नको या क्षणा, ॥ चल उठ०॥

**कैदी**—(मनाशीं) देवाधर्माचें आहे ह्मणावें तर इं-ग्रजांनीं मला धरल्याचा मजकूर आला आहे. सं-पूर्ण ऐकूं या.

**हवा०**—फारच नामी ह्मटलें.

**ह्माद०**—काय वो गोसाई बुवा, याचा अरुत काय?

**गोसा०**—अहो या पुराणांतल्या गोष्टी. विश्वामि-त्रानें रामाला यज्ञ राखायला नेलें, अक्रूरानें बळि-

राम व कृष्ण यांनां मथुरेला नेलें, तेंव्हां गोपी रड-ल्या त्याचें हें वर्णन.

**कैदी**—मग काय माझ्याबद्दल यांत कांहींच नाहीं ?

**राणूजी**—हं, हं, हं, हंग त्येच त्येच. लइ ग्वाड बगा गानं तुमचं साकरेवानी. चालूं द्या बुवा. ( पुढें सरकतो. )

**गोसा०**—ऐका तर मग:—

बिंबस्थानीं पेंच दीधला भिऊं नको गा अंतरीं ॥
प्रभु रायाची मर्जी तुजवर बहाल समज गा पुरी ॥
पण खचित मजला कळूंदे आतां कोण कुठें तूं वरी ॥
त्र्यंबकराया सौंगडी याचा हाक दे सत्वरी ॥

**कैदी**—हं, हं, अरे, हा माझेंच नांव बोलला, आणि याचा आवाज तर ओळखीचासा वाटतो. कोण बरें हा ?

**गोसा०**—

हरहर शंभु ह्मणतों आह्मी तूंही ह्मण लौकरी ॥

**कैदी**—आतां उशीर कशाला लावूं—( उघड ) 'हर हर हर शंभु.'

**गोसा०**—( किनरी जरा थांबवितो व मिशांस पीळ देतो व मनाशीं ह्मणतो ' ठीक आहे ' ) ऐका ह-वालदार, मग ही संसाररूप नौका तरून जावयाला काय केलें पाहिजे. तर—( इतक्यांत गस्तीचे लोक येतात. एक साहेब व दोन शिपाई हातांत चोर कंदील घेतलेले असे येतात.)

**साहे०**—जमादार, ये तमाम लोग किसूवास्ते यहां जमे हुवे है ?

**हवा०**—हुजूर, ये लोग गाना सुननेके लिये यहां जमा हुवे.

**साहे०**—ये किसूतन्हाका गाना है ? और किस वास्ते इतनी वडी रातको ?

**हवा०**—साव, ये गाना खुदाई है.

**साहे०**—अच्छा, इस्को गाने दो. हंम् सुनेंगे.

**हवा०**—बुवा, साहेब ह्मणतात त्यांनां गाणें ह्मणवून दाखवा.

ठाणे.

**गोसा०**—बरें तर—

वेडीवागडी घरची नारी हृदेमध्यांतुनि फेंकू नको ।।
दिधल्यावरतीं तुज देवानें उणें म्हणुनी झोकुं नको ।।

**साहे०**—इसका माने क्या है ?

**हवा०**—हुजूर ये ऐसा कहते है के अगरचे शादीकी औरत बदशकल वोहो तोभी उसके साथ रहना चाहिये. लेकिन् खुपसुरत औरत जिसके फेल बद हो उससे सोहबत् कभी करना नचाहिये.

**साहे०**—अच्छा, ये फकीर है, इसलिये इसको गाने दो. लेकिन् खबरदार रहेना क्यों के बाजीराव साव पेश्वेका वडा बदमाष लडका उप्पर कैद है.

**हवा०**—हां हुजूर. ( सलाम करतो ) ( साहेब व शिपाई जातात ) चालूं द्या बुवा.

**ह्माद०**—गेली एकदांची पीडा. आतां हा साहेब कांहीं पुनः प्रहरभर येणार नाहीं. नाहीं बरें हवालदार ?

**हवा०**—हो. यंक्या जा लेका, चिलीम भरून आण घेऊं या एक एक झुरुका मारून. ( व्यंक्या जाऊन चिलीम घेऊन येतो ) घ्या ह्मादवा घ्या.

**ह्माद०**—अदोगर बुवास्नी द्या. ( हवालदार बुवाच्या हातांत देतो, बुवा ती घेऊन विस्तव चाळावयाचें निमित्त करून त्यांत कांहीं टाकतो.) .

**गोसा०**—( छापी जरा हलवून डोक्यापाशीं चिलीम नेतो ) वस्स तुमचा मान झाला ना ? आतां ओढा, घ्या ह्मादवा. ( असें ह्मणून चिलीम त्याजपाशीं देतो, नंतर सर्व पाळीपाळीनें घेतात, व पाहऱ्यावरचा शिपाईही घेतो मग व्यंक्या ती आणून हवालदाराच्या हातांत देतो, ती तो बाजूस ठेवितो.)

**हवा०**—चालूं द्या बुवा गाणें.

**गोसा०**—ऐका ह्मादवा,

तरी उतरुनि दोड हाक तूं जातां दक्षिण आंगा ॥
देखशील गा थोर उंचशा तेथें तरुवररांगा ॥
झाडाखालीं हैदरअल्ली सलाम त्याचा पाहिला ॥
घोड्यावरतीं जीन घालुनी सज्ज तुला तो ठेला ॥

**ह्माद०**—लइ ग्वाड लइ ग्वाड. ( हात नाचवितो व झिंगून पडतो. )

राणु०—अक्षी बगा. (तोही पडतो व ब्यंक्याही पडतो)

गोसा०—तुह्मी सर्वांनीं गोड करून घेतलें ह्मणून ( मनाशीं ) ठीक झालें. ( उघड )

आतां सांगणें व्यर्थ कशाला वेळ चालला वायां रे ॥
गवाक्षद्वारीं येतां दुसऱ्या दोरी लागल पायां रे ॥

( पाहऱ्यावरचा शिपाई भिंतीला टेंकून उभा राहतो तों बंदुक गळते ) हवालदार, आतां रडायला गाणंत्रिणं हवं कशाला ? ( बोटानें दाखवितो ) ती पहा खिडकी उघडली, तो त्रिंबकजी आला; तुह्मी जा त्याच्या बरावर तरीवर. घ्या ती आपली बंदुक. मी या रानांत आतां तुह्माला भेटणार नाहीं; सिंहगडास गेल्यावर तुह्माला बक्षीस देईन.

त्रिंब०—( गहेनाजीस भेटतो ) मला पुष्कळ बोलावयाचें आहे. ( टिपें टाकतो ) गहेनाजी,

गहे०—वेड्या रडूं नको. जा हवालदार नाखव्याच्या तरीवर याला घेऊन. मी दुसऱ्या वाटेनें जातों. ( ते दोघे जातात इतक्यांत पडद्यांत बंदुकीचे बार होतात. ) अरे ही किनरी, अंः आतां ही कशाला पाहिजे ? ( आदळतो ) ही दुसरी बरी आहे. ( पहारेवाल्याची बंदुक उचलतो. ) हीच उपटावी ह्मणजे झालं. पहा हा उजेड इकडे दिसूं लागला. कोण येताहेत वाटतें. घ्या

ह्मणावं ह्या लेकांनां. (पाय आदळून पळून जा-तो. नंतर साहेब व शिपाई येतात.)

**साहेब**—रे सठ्वाजी, ये ह्मादबा, तुम् ऐसे कैफी क्यंव् बनगये? (इकडे तिकडे पाहतो व चिलीम पाहून) हां इस चिलमनें तुमको दिवाना बना दिया है. (सगळ्यांना हलवून खिळखिळे करतो. कोणी अर्धेमुर्धे जागे होतात, कोणी पडतात, कोणी पेंगतात) वो षक्स बदमाष है, ऐसा मेरे खयालमे आयाथा. लेकिन् जमादार कहां है? वोभी फरार होगया. रे सठ्वाजी तूं किस् रहाकी निग्हेवानी करताहै. चावडीपर लुटारोनें आपना काम किया. ये कित्ना बडा आपने नामको वट्टा लगा. एक तऱ्हफसे तो एलिफन्स्टन साहिब मुझे बदनाम करे गे, और दूसरी तरफसे गवर्नरसाव. (सगळ्यांना काठ्या मारतो ते पळून जातात) अब् शेख महंमद, तूं चार घोडे सवार लेकर आ. और बहादुरसिंग तुम् दर्वाजेपर खडे रहो, और किसिको अंदर मत् जाने दो.

(सर्व जातात.)

## प्रवेश तिसरा.

**स्थळ**—बेट, एल्फिन्स्टन साहेबांचा बंगला.

( दोन तीन शास्त्री व एल्फिन्स्टन साहेब. )

**पुराणिकबावा**—साहेब या प्रमाणें आपण ऐकलेंतच कीं, अभिमन्यूचा वध झाल्या नंतर अर्जुनानें समसप्तकांचा नाश करून आल्यावर मोठे दुर्धर जे ते प्रतिज्ञा केली कीं, उदईक सायंकाळ झाला नाहीं तोंच जयद्रथाचें मस्तक जें तें उडवीन. मग श्रीकृष्ण परमात्मा जे आहेत त्यांस परम चिंता जे ते त्या कालाचे ठाई उत्पन्न झाली व त्यांनीं दारुकास रात्रौ बोलावून आणून आपला रथ सिद्ध ठेवण्याविषयीं आज्ञा केली:—( वाचतो )

उपरि उठोनि प्रातःकाळीं ॥ स्नानादि सत्कर्मे सारिलीं ॥
दोहीं दळें सिद्ध झालीं ॥ घाई लागली वाद्यांची ॥ १ ॥
शकटव्यूहाचे मध्यें कमल ॥ त्यामाजी केशरस्थळ ॥
भ्रमरप्रायें जयद्रथ केवळ ॥ संकोचोनी वैसला ॥ २ ॥
इकडे रण माजलें अपार ॥ पुढें आला पार्थ वीर ॥
लागला वाद्यांचा गजर ॥ भूगोल तेणें कांपतसे ॥ ३ ॥

मग त्या कालाचे ठाई महाराज, अर्जुनाचे बाणांपाठीवाण जेव्हां जाऊं लागले, तेव्हां वाद्यांचे गजर जे ते झाले. वीर हे परस्परांवर शस्त्रें टाकून सिंहनाद करिते झाले. त्या कालीं हा सकल भूगलो कंपायमान जे ते झाला कळलं?

**एलिफ०**—थांबा पंडितजी, एक शंका आहे. अहो, आपण ह्मणतां कीं, शास्त्रांत पिंपळाच्या पाना सारखी पृथ्वी आहे असें सांगितलें आहे. पण आतां तर या ग्रंथांत ' भूगोल ' असेंच आमच्या लोकांच्या मता सारखें ह्मटलें आहे. यांत खरें कोणतें ?

( सगळे एकमेकांच्या तोंडांकडे पाहतात
व खुणा करितात. )

**एक शास्त्री**—( कानांत ) पुराणिक बुवा, इथें ' जे ते ' आणि ' जो तो ' विसरा बरें. साहेब मोठा धूर्त आहे.

**पुरा० वा०**—( कानांतच ) अहो कुंडलशास्त्री, मला तरी कुठें हवें होतें ! पण प्रत्यहींच्या पांडवाची ( पांच बोटें करितो ) आशाना ? असो जाव तरी आतां देतों ( उघड ) साहेब, आपण ह्मणतां तें खरें; परंतु हें काम पडलें ज्योतिष्यांचें. आपल्याकडे ते गगनशास्त्री पर्वते येतात ते याचा फाड सांगतील.

**साहे०**—अस्तु बरें कां, शंका आली ह्मणून विचारलें. उद्यां त्यांनांच विचारूं किंवा ( विचार करून ) कशाला ? आतांच त्यांनां बोलाविल्यास कांहीं हरकत आहे ?

**कुंड० शा०**—कांहीं नाहीं.

**साहे०**—कोन है बाहेर, शिपाय, रायटरकू बुलाव. ( रायटर कानावर पेन ठेवून येतो ) वे० शा० सं० गगनशास्त्री पर्वते यांनां आतां मेणा धाडा. त्यांनां ह्मणावें तावडतोब बंगल्यावर चला. बरावर दोन मोहोराही भूकन चपराशी बरोबर पाठवून द्या ( रायटर सलाम करून जातो. )

**कुंड० शा०**—पहा साहेबांची केवढी तत्परता. ( मान डोलवितो ) वाहवा. काय विद्ये विषयीं अभिरुचि !

. ( इतक्यांत शिपाई येतो. )

**शिपाई**—( सलाम करून ) रावसाहेब रास्ते, व चिंतोपंत श्रीमंताचे कारभारी आले आहेत.

**साहे०**—जा त्यांनां आंत घेऊन ये. ( ते येतात ) चालूं द्या पंडितजी.

**पुरा०**—( वाचतो )

पार्थ वीर संहारी अपार ॥ वेग करी ह्मणे सर्वेश्वर ॥
दिवस आला दोन प्रहर ॥ तृषाक्रांत अश्व झाले ॥ ४ ॥

अर्जुनें बाण पाठवून पाताळा ॥ काढिलें भोगावतीजळा ॥
अश्वाभ सरोवर जाला ॥ वृक्ष सभोंवते विराजती ॥ ५ ॥

या प्रकारें करून अर्जुनानें बाण मारून सिद्ध केलेलें सरोवर घोड्यांनां धुतल्या बितल्यावर तत्काळ आटलें. मग पुनः तुंबळ युद्ध झालें, तरी सहा गांव शकटव्यूह रचिला होता तो जिंकतां

जिंकतांच तिसरा प्रहर आला. तेव्हां अर्जुनाचा मनोरथ सिद्धीस जाण्यास कठीण पडेल हे पाहून श्रीकृष्ण परमात्मा काय करिते झाले:—

" सुदर्शन आड घातलें ॥ दिनकरातें लपविलें ॥
अर्जुनासि तें नकळे ॥ वीरश्रीयाचेनिनादें ॥ ६ ॥
घे घे म्हणे अर्जुन ॥ मगबोले जगज्जीवन ॥
अस्तास गेला दिनमान ॥ आलें मरण तुजलागीं" ॥ ७ ॥

मग अर्जुनाला फार वाईट जें तें वाटलें आहे. आणि खरेंच कीं काय ह्मणून :—

" जों सूर्याकडे पाहिले ॥ तों सूर्यबिंब मावळलें ॥
गांडीव हातींचें टाकिलें ॥ कुंड रचिलें तेधवां ॥ ८ ॥

मग धनुष्य बाण टाकून देऊन जेव्हां अग्नि प्रज्व-लित केला, तेव्हां दोहीं दळांतले लोक तेथें पहावयाला आले. मग अग्नीला प्रदक्षिणा घालते वेळीं कृष्णांनीं सांगितलें कीं, क्षत्रियानें धनुष्यबाण आकर्ण ओढून सज्ज असावें व तसें अग्निकाष्ठ भ-क्षण करावें हा त्याचा धर्म होय. त्या प्रमाणें तो प्रदक्षिणा घालूं लागतांच.

" इतुकियांत काढिलें सुदर्शन ॥ तों अर्ध घटिका दिवस पूर्ण॥
पार्था हा सूर्य तो जयद्रथ दुर्जन ॥ सोडीं बाग वेगेंसी" ॥ ९

अशी आज्ञा होतांच मग काय महाराज,

' ऐसें बोलतां जगजीवन ॥ निमिष न लागतां गेला प्राण ॥
जयद्रथाचें शीर छेदून ॥ आकाशपंथें उडविलें' ॥ १० ॥

या प्रकारें करून जयद्रथवधाचा अध्याय आज

जहाला. (कायेन, वाचा, मनसेंद्रियैर्वा बुद्ध्यात्मने नावा इ० ह्मणून पोथी आटपतो.)

**साहेब**—पंडित, हा जयद्रथ दुर्योधनाचा मेव्हणा नां? पण काय हो, घटिका यंत्रें वगैरे जर त्या वेळेला होतीं, तर अर्जुनाला दिनमान कसें समजलें नाहीं? खरें कीं नाहीं रावसाहेब? गोळ्या, तास, टोले होते ह्मणतांनां.

**पुराणि०**—(तटस्थ होतो मनाशीं) आतां या ठिकाणीं काय सांगावें? (उघड) त्यांत आह्मां भिक्षुकांला काय समजतें. हे रावसाहेब सांगतील.

**रावसा०**—अहो अर्जून वीरश्रींत होता कीं नाहीं? त्याला लढाईच्या नादांत भान राहिलें नाहीं.

**साहे०**—उत्तर ठीक आहे. त्याला एक नसेल पण त्याचे चार भाऊ होते त्यांनां? आणि पांडवांच्या फौजेमध्यें सर्वांनां ही तसेंच झालें असेल?

**कुंड० शा०**—(मनांत) हें एक मोठें लचांडच झालें.

**रावसा०**—अहो ज्या श्रीकृष्ण परमात्म्यानें सूर्याला झांकिला. त्याला घटिका यंत्राच्या गोळ्या फिरवितां येणार नाहींत काय?

**साहे०**—खरें आहे. कृष्ण हा परमात्मा परमेश्वर अशी कल्पना केली ह्मणजे सर्व संभवतें. आणि सूर्यही झांकोळण्याचा संभव आहे.

**रावसा०**—मोठ्या लढाया चालल्या ह्मणजे पावसाचीं चिन्हें होतात ह्मणतात. तद्वत् तेथें ढग आले असतील.

**साहे०**—बरें असो. पुराणिक बुवा, जरा तंबाकूविंबाकू घ्या. ( स्वतः सर्वांला देतो, व आपणही घेतो ) तंबाकू नको तर विडा घ्या. लवंगा, जायपत्री सर्व येथें आहे. ( पुराणिक, शास्त्री यांनां पोहोंचवितो. )

**साहे०**—सांगा चिंतोपंत, आज दोचौं रोजांत काय कारभार झाला तो?

**चिंतो०**—फार सांगण्या सारखें नवल विशेष नाहीं. एक पंढरपुरचे मामलेदार चिंतो कृष्ण यांना हिशेबासाठीं हुजूर बोलाविलें आहे. ते हिशेब देणार आहेत. विजापुरला सोमवारीं नारो रामजी सुभे नेमिले होते. परंतु मंगळवारीं तिरासिंगाप्पा मल्लाप्पा त्या प्रांतांतील हुषार गृहस्थ व लोकांत त्यांचें मोठें वजन ह्मणून त्यांची नेमणूक केली होती. पण बुधवारीं सकाळींच राघो अनंत कमाविसदार किल्ले बदामी प्रांत विजापुर यांनीं हुजूर असें कळविलें कीं, आज पिढीजादे आपण कारभार करीत आलों. किल्ला हा आमचे ताब्यांत बाच्छाई पासून आहे, तेंव्हां भोंवतालचा मुलूख सरकारानें

आमच्या स्वाधीन केला असतां सर्व खर्च संभाळून सरकाराला २९ लाख रुपये अविच्छिन्न पोहोंचवीत जाऊं; त्या प्रमाणें सरकारच्याही मनांत आलें. व त्यांना नियत केलें होतें. मग संध्याकाळीं ते निरोप घ्यावयास आले, तों मागचे मामलेदार यांचे मार्फत साल गुदस्तचा बाकी राहिलेला ऐवज व या सालाचे आगाऊ ३० लाख देतों ह्मणून निशाचिठ्या करून ही आणल्या. तेव्हां श्रीमंतांनीं भानाजी गोपाळ यांसच कायम केलें.

**साहे०**— वाँहवा काय बंदोबस्त ! एकाच अधिकारावर दहा असामींच्या नेमणुका. अशा मक्त्याच्या मामलती देण्याच्या योगानें रयत अगदीं चुरडून जाते हें श्रीमंतांच्या ध्यानांत कसें येत नाहीं कोण जाणे !! काय ह्मणावें अशा कारभाराला ? बरें कांहो चिंतोपंत, कोंकणचा काय बंदोबस्त केला ?

**चिंतो०**—कोंकणचा ? पेंढार सुटलें आहे. त्याच्या पारिपत्यार्थ विजयदुर्ग, रत्नागिरि वगैरे महालों महालीं ताकीदपत्रें गेलीं आहेत. खेरीज दसरा झाल्यावर बापूगोखले जाणार आहेत.

**साहे०**—पहा हा असा तुमचा बखेडा आह्मांला विलायतेला कंपनी सरकाराला कळविणें भाग पडेल. श्रीमंतांनीं राज्यांत सगळी अव्यवस्था करून टा-

किली. खाजगीवाले, पाटणकर वगैरेंच्या जहागिरी अन्यायानें जप्त केल्या, त्याबद्दल मी एकदां सांगितलें होतें, त्याचें काय केलें ?

**चिंतो०**—पाटणकरांच्या जहागिरी ? काय कीं बोवा ! ( विचार करून ) हो, सोडण्याच्या यादी अजून गेल्या नाहींत. त्या बद्दल गोविंदराव निळकंठ खाजगीवाले यांचे तर्फे बोलणें सुरू होतें. विचार चालला आहे. निकाल झाला नाहीं.

**साहे०**—पहा, अशा बाबी आमच्याकडे हमेष येतात. कारभार आह्मी उरकतों ह्मटलें तर नको ह्मणतां. अझून तरी बाजीराव साहेबांनां आमचा निरोप कळवा. खरें कीं नाहीं रावसाहेब ? आपल्यावर, पटवर्धनांवर, प्रतिनिधीवर केवढा गहजब मांडिला आहे ?

**रावसा०**—तें कांहीं पुसूंच नका. यांच्या पक्षामुळें कोल्हापुराकडे त्यांचें खडाष्टक वाजलें. व इकडे ही श्रीमंत बेफिकीर. उलटा त्यांचा सरंजाम घशांत टाकायाचा बेत. रोजचा कारभार निराळा. कोठचे तेली, तांबोळी आणून भरताहेत कोणजाणे? चिंतोपंतांला राग येईल, पण खरें आहे तें बोलावयाला काय भीड !!

**चिंतो०**—त्यांत राग कसला? (मनाशीं) यांचे अपराध

मात्र कांहीं नाहींत! (उघड) आहे तसें ह्मणून तुह्मी ह्मणतां.

(इतक्यांत शिपाई येतो.)

**शिपा०**--हुजूर, कुंपनी सरकारका ठानेसे एक हरकारा आयाहै. और उसके हाथसे कमेंडर साहिबनें एक खत्मी भेजाहै.

**साहे०**—अंदर लेकर आव्. (पत्र वाचतो व ओंठ चावतो व पत्र मेजावर आपटतो) रावसाहेब, पुष्कळ गोष्टींवर बोलावयाचें आहे, परंतु आतां अडचणीचें पत्र आलें आहे तेव्हां उदईक बोलूं. बाळाजीला ही घेऊन या. चिंतोपंत, तडक आतांच्या आतां आपण आमची हद्द सोडून आपल्या सरकारच्या हद्दींत जावें. आमच्या जीवाला जो संताप झाला आहे तो सांगतां येत नाहीं. फार कशाला? मी तुह्मांला उघड करून सांगतों, त्रिंबकजी पळाला असें त्यांत आहे. यास्तव बाबासाहेबांस विचारावें कीं, त्याला भल्या गोष्टीनें स्वाधीन करतां किंवा नाहीं? कारण तो ह्मणजे आपल्या इतल्ल्या शिवाय फरारी झाला असेल असें नाहीं. आमचा एवढा बंदोबस्त, तेथें अशी गोष्ट झाली हें मोठेंच आश्चर्य आहे. असो, जा सांगा बाबासाहेबांनां कीं, तो स्वाधीन करी तोंपर्यंत आपला आ-

मचा व्यवहार बंद राहील. मग मुंबईला सरकारांत एकदां आह्मी लिहून चुकल्यावर आमच्या हातांत कांहीं राहणार नाहीं. येतां रावसाहेब, या. ( रावसाहेब जातात. )

**चिंतो०**—होय साहेब, श्रीमंताच्या कानांवर ही गोष्ट घालतों. आतां आपण त्रिंबकजी पळाले ह्मणतां त्यास उपाय नाहीं. त्यास बाबासाहेबांचा काय अपराध? तत्रापि मी आपला मजकूर निवेदन करीन.

**साहे०**—(पाय आपटून) त्यांचा काय अपराध? हें काम तुमचें नाहीं. तुह्मी निरोपाचे धनी. (चिंतोपंत जातो. मनाशीं ) काय करावें? निरोप तर रागाचा पाठवून चुकलों. पण आज पेशव्यांची सत्ता कोठवर आहे हा विचार केला ह्मणजे आमची कोठें दर्यामें खसखस असें होणार आहे. तेव्हां त्यांच्याशीं एकदम हमरीतुमरी करून निभाव लागणार नाहीं. सत्याची बाजू संभाळली पाहिजे. आपण नीतीनें वागतों ह्मणून आल्या वेळेला व हल्लींच्या वेळेला केवढी तफावत बरें? तेव्हां जो मी यःकश्चित होतों त्या माझ्या शिवाय आतां पान हलत नाहीं. वाड्यांतील व गांवांतील खडानूखडा मला बातमी लागते. बाहेरच्या एकाद्या जहागीरदारावर आमच्या एका शद्बाची जेवढी

मातब्बरी आहे, त्याच्या शतांश त्यांच्या ताकीदपत्रांची नाहीं. ( स्वाराकडे पाहून) अरे, हा अझून येथेंच आहे ( त्याला उद्देशून ) अच्छा बाहेर ठेरो. जलदी जबाब लिखकर भेज देतांहूं. तुमको खानापिना नचाहिये? खाकर पिछे आव्.

**स्वार**—हां साब. ( जातो.)

**साहेब०**—( मनाशीं ) आतां पुढें काय कर्तव्य तें पाहिलें पाहिजे. दोन चार महिने वाट पाहून, जडशीळ तोफा ओढून शहरावर रोखून ठेवूं व दोन पायदळ पलटणा सभोंवार पसरून ठेवूं. शिरूरला स्वाराची पलटण पाठविण्याविषयीं लिहिलें पाहिजे. मग दहावीस हजार लोक मुंबईहून येत आहेत ह्मणून आवई उठविली ह्मणजे झालें. ह्मणजे यांनां धास्ती सुटावयाचीच. ठीक आहे पाहूं.

( जातो. )

---

## प्रवेश चवथा.

**स्थळ**—बुधवारचा वाडा, दिवाणखाना.

(गुप्त दरबार.)

**बाजी०**—मला या इंग्रजांची कांचणी लागल्यामुळें कांहीं सूचत नाहीं. बघा गोविंदराव, तशांत त्या

त्रिंबकजी विषयींही मला काळजी लागली आहे. कारण तो साष्टी बेटांतून पळून गेला. त्याला मी काय करावें? इकडे कोंकणांत पेंढार सुटलें आहे ह्मणून सिंधुदुर्गचे मामलेदार यांचें पत्र आलें आहे. तिकडे हिंदुस्थानांत शिद्यावर इंग्रजांनीं आपला शह बसविला. सारांश, दशा आली ह्मणजे चोहों कडून येते. जीव अगदीं कंटाळून गेला आहे. नाना जरी असते तरी यांतून पार पाडून नेते. बापूही नाहींत. असा मी अगदीं उघडा पडलों. ( खिन्न होतो. )

**गोविंदराव**—सरकारांनीं असें दिलगीर होऊं नये. आपल्या पदरीं बापू गोखल्या सारखे शूर वीर आहेत, निपाणकरा सारखे मसलती आहेत, हें पटवर्धन मंडळ अझून सबळ आहे, कोल्हापुराकडे राजकारण केलें तर साधण्या जोगतें आहे, आमचे केंस ही याच दौलतीच्या सेवेंत पांढरे झाले आहेत, इंग्रज ह्मणजे काय विशाद! तेव्हांच मोडून काढूं. खरें कीं नाहीं शेटजी?

**खरशेटजी मोदी**—मी अथा माझा तोंडाशें जासती काय शांगूं. तुमी महाराजाचे पायाशें समदं काम प्रापत होईल. अने तुमी थोडा माश थांबेल अने जशे गोइन्दराव बाबा शांगेल तशे करल

तर मी ये सायबाला विलातशी बदली करवून गेल मंग तुमाला य बाबदचे काइबी धास्ती नहीं.

**बाजी०**—सगळें खरें. परंतु राज्याचा सहा आणे भाग मागून कारभार ही करतों ह्मणतात यास उत्तर तरी काय देऊं? जेव्हां जेव्हां तो टोपडा भेटतो. तेव्हां तेव्हां मला पहिला प्रश्न हाच कीं, 'श्रीमंत कारभार कधीं देतां'? त्यास वर्ष सव्वा वर्ष आज टोलवीतच आहे. परंतु परवां नारोपंत बेटावर गेले होते, तेव्हां त्याजबरोबर तोच निरोप आला कीं, 'ह्मटल्याचें काय केलें?' ह्मणून सर्व अक्कलवंत, हुशार असे येथें जमलां आहां, तरी कोणी कांहीं यांतून पार जाण्याची शक्कल काढा. गोखले तुमच्या चित्तास काय येतें?

**बापू गोखले**—आमच्या? आह्मांला महाराज एक दोन कांहीं समजत नाहींत. ही समशेर बाजूला आहे. (जरा म्यानांतून काढतो) हिच्या घावानें शत्रूचें हृदय कधीं विदारण करीन, कधीं समर भूमीचेठाईं ही रक्तानें न्हाईल, एवढीच माझी इच्छा आहे. मोठा टिपू सुलतान असो का दिल्लीचा बादशाह असो, अगर रूमशामचा बडा बादशाह असो, त्यावर लढाईस जाण्यास मला आज्ञा

द्या. हा मी चाललों. मग टोपीवाल्या इंग्रजाची काय कथा ? ( मिशांस पीळ देतो ) आत्तां सांगा आत्तां चाललों. मळमळीत सौभाग्या पेक्षां झळझळीत वैधव्य बरें. एवढी त्यांची रिपरिप हवी कशाला ? आज्ञा द्या कीं, नेऊन कोंवतों मुंबईच्या दर्‍यांत. त्यांची काय प्रतिष्ठा ! !

**गोविं०**—बापूंचें बोलणें आवेशाचें आहे. एवढा राग करून उपयोगीं नाहीं. दगडा खालीं हात सांपडला आहे तो आधीं काढून घेतला पाहिजे 'वसईचा तह फाडून देतों' ह्मणून सांगितलें आहे तेवढें आधीं साधावें.

**बाजी०**—अहो पण अगोदर सहा आणे मागतात, खेरीज कारभार करूं ह्मणतात याचें कसें करावें ?

**गोविं०**—त्याचेंही उत्तर सांगतां येईल.

**बाजी०**—कधीं ? आज सहा महिने मी दांतांच्या कण्या केल्या. काळे, कांहीं उपाय सांगा. एवढ्यासाठींच पुन्हां आतांतरी बारामतीहून तुह्माला बोलावून आणिलें. तुह्मी सांगतां एक मनुष्य नागपुराहून यावयाचा आहे. अहो, नागपूर का गिलिचांच्या मुलखा इतकें दूर आहे ? मला सांगा तरी मी सांडणी धाडून आठ दहा दिवसांत आणवितों.

**गोविंद०**—छे, इतकी तसदी कशाला ? तो येईल.

**वाजी०**—केव्हां ? परवां ह्मणालेत कीं, एकदोन दिवसांत. आज त्याला दहा दिवस झाले ! आला तुमचा मनुष्य ?

**गोविंद०**—नाहीं, अझून नाहीं.

**वाजी०**—पहा, हे कांहीं भलतेंवेळ नव्हतें. ( डोळे भरून काढतो ) गोविंदराव, अंत पाहूं नका. भरल्या बांधा खालीं आपण बसलों आहों. सांगा सत्य स्मरून कोण तो मनुष्य ? अनृत भाषण करूं नका बरें !

**गोविंद०**—आतां खरें सांगूं तर मग ? पण छेः मला अझून धीर होत नाहीं. महाराज तो मनुष्य आलाच नाहीं. आल्यावर मग कळवीन.

**वाजी०**—तो येई तोंवर माझे प्राण जातात किंवा राहतात कळत नाहीं, मोदी, तुमच्यावर तरी माझा पूर्ण भरंवसा आहे कांहीं तडजोड काढा.

**खरशे०**—दुशरा जासती मी काय शांगूं ? तुह्मी महाराज. जशे तुमच्या ध्याना मंदी दरुश्त येल तशा करा. अमी लोक फकत् तुमच्या होकमा बराबर चालेल. अने मी लइ खुशी हये कीं तुमचा हमच्यावर पुरा विश्वाश हये.

**वाजी०**—खरोखरींच आमचा पूर्ण विश्वास आहे.

**खरशे०**—लेकिन तुमी जो एबाबद थोडे बखत् लं- बावेल तर मी अशे करेल कीं, ए साहेब ए मकान आपशे—पोते—छोडून जाएल, अने मंग तुमी तुम- चा राज वगर फिकरशे चलावा. तया मंदी काइबी संशय नाहीं.

**बाजी०**—असें झालें तर मी आपला फारच ऋणी होईन. हा साहेब एकदा गेला तरी कुणीतरी रा- हू येणारच.

**खरशे०**—कारन ए अदमी लइ हुशियार अहे. जो दुशरा बदली एल तो काय अशे निकाम चोरची माफक लइ हुशियार नहि हाइल. ए बात अमें बोलतो तो आमचा जान जाएल अं!

**बाजी०**—नाहीं ही बातमी फोडणार नाहीं. देवाची शपथ.

**खरशे०**—जो ते लोकांत अशे मनेल के, तुमी खरशे- टजीला हमचे शवाधीन करा. तर तुमी शांगावा के काइक गांवांचा काइ हिशाब नकी करायाचा हाय.

**बाजी०**—खरी गोष्ट. नाहीं गोविंदरावजी? शेटजीची हिकमत फारच नामी दिसते. कशी वाटते आ- पल्याला? याची एकदां तळी उचलली ह्मणजे कं- पनी सरकार जो दुसरा पाठवील तो कांहीं इतका धूर्त असणार नाहीं. मग आपला डाव साधेल. पण आतां त्याला काय सांगावें बापू?

**बापू गो०**—मला सतरा पंधरा कांहीं समजत नाहींत. ( तरवार काढून हातांत घेतो ) हा पहा, माझा लाडका छावा खड्ग नूतन उष्ण उष्ण रक्त प्राशना विषयीं अत्यंत उत्कंठित झाला आहे. आपल्याला एवढी त्यांची विशाद काय वाटते कोण जाणे! धोंडी वाघाला चीत केल्या दिवसा पासून पुनः असा समराचा प्रसंग केव्हां येईल याविषयीं माझे बाहू फुरफुरत आहेत. साहेब साहेब झाला ह्मणून कांहीं देव नाहीं. काय कवाइतीची फुशारकी मारतात कोण जाणे! आपला पिंटो तेंच शिकवतो ह्मणून त्याचें पायदळ माझ्या पायदळाच्या सरीचें आहे काय? एक माझा मोडका एसवा एकांड्या सुटला तर त्यांना त्राहि त्राहि करून सोडील. मागच्या महिन्यांत मी जातखत १९ हजार लोक नवे वांड चाकरीस ठेविले आहेत. मोहनगीर बोवाचे ४० हजार गोसावी आहेतच. एवढ्या फौजेवर मी सगळें हिंदुस्थान पालथें घालीन. आह्मांला हुकूम द्या कीं, तुटून पडतोंच.

**बाजी०**—हें ही बरें दिसतें कीं, एकदम जाऊन लढाई देऊन इंग्रज जर्जर केला ह्मणजे तो अर्थातच मोडेल. नाहीं काळे?

**गोविं०**—इंग्रज ह्मणजे कांहीं सामान्य प्रकरण नव्हे.

बाकी युक्तीयुक्तीनें कावा केला तर सर्व साधण्या सारखें आहे. ईश्वर कृपेनें दम धरला तर लवकरच इच्छित घडून येईल. त्यावर आमचा तो मनुष्य आला ह्मणजे पाहूं.

**बाजी०**—आतां तो येणार तरी कधीं ? आणि मला एकदांचा निश्चय कळणार कधीं ? पाठवूं कां त्याला बोलवायाला ? नाहींतर सांगा आतां तो येणार खाचित केव्हां ? असा तो आहे तरी कोण ?

**गोविं०**—सांगूंच तर आतां निश्चयानें ?

**बाजी०**—ह्मणजे काय संशय आहे ? मोठी शर्थ झाली बुवा ! तुह्मी एवढीं जुनीं माणसें ह्मणून मुद्दाम आणविलीं. मला तो टोपीवाला एक पाऊलही टाकूं देत नाहीं, व बिलकूल दुसरी गोष्ट बोलत नाहीं. सांगा तुमचा तो मनुष्य येणार तरी कधीं ?

**गोविंद०**—सांगूंच तर ? (विचार करतो) राग नाहींना येणार ?

**बाजी०**—मला राग नाहीं, लोभ नाहीं. तुमच्या वडिलांच्या पायांची शपत.

**गोविंद०**—छे, पण मला धीर होत नाहीं.

**बाजी०**—हें पहा दादासाहेबांच्या व आईच्या पायां-

ची शपत. आतां या परतें आणखी काय सांगूं ? माझा एकवार विश्वास तर पहा.

**गोविंद०**—हं तोच हो तोच. आपली बुद्धि क्षणिक व भोळवट पडली ह्मणून इतकी शंका आली. फुटलें नाहीं ह्मणजे सांगतों.

**बाजी०**—फुटायची गोष्टच बोलूं नका. सांगा.

**गोविंद०**—आमचा मनुष्य यावयाचा तो **'विश्वास.'** तो आतां आपण एवढ्या आणाभाका देतां त्यापक्षीं दवडणार नाहीं. संभाळा, ही वाफ जातां कामा नये. आपण येथें बसलों आहों तेवढ्याच पुरतें. आतां बोला. इंग्रज काय मागतो ?

**बाजी०**—कारभार करावयाचा ह्मणतो.

**गोविंद०**—कशाकारितां ?

**बाजी०**—राज्यांत जिकडे तिकडे बंदोबस्त करून सहा आणे भाग आह्मी पूर्वी त्यांस देतों ह्मटला होता, तो आपले आपण वसूल करून घेतों ह्मणतात, व बाकी दहा आणे घर बसल्या आपल्यास आणून देतों ह्मणतात.

**गोविंद०**—बरें आहे. त्यांनां ह्मणावें तुह्मांला आमच्या रुपयांतले सहा आणे पाहिजेतना ? घ्या ह्मणावें वर्षाच्या वर्षास मोजून. परंतु एक मात्र करा ह्मणावें ?

**बाजी॰**—तें काय?

**गोविं॰**—आधीं आपली छावणी येथून उठवून मुंबईला चला ह्मणावें. आह्मी विन बोभाट ऐवज पावता करून देतों; परंतु त्यांनीं आमच्या कारभारांत हात घालूं नये. त्याची व्यवस्था मुकत्यारीनें आह्मी करूं. यांत त्यांचें सर्व आलें. मग मी येथें राहतों व बंदोबस्त कसा होत नाहीं पहातों.

**बाजी॰**—मग लढाईचा घाट घालूंच नये?

**गोविं॰**—तूर्त इंग्रजांशीं लढाईचा प्रसंग करूं नये. तुमचा सरंजाम अवघा नवा आहे. काल चाकर ठेवलेला आज लढून मरतो असें नाहीं. वर्ष दोन वर्षें अशी फौज बाळगावी. त्यांस यथायोग्य शिक्षण द्यावें ह्मणजे लोक तरबेज होतील. दुसरें, लढाईचा प्रसंग शहरा पाशीं कधीं करूं नये. आज पर्यंत मराठ्यांनीं इतक्या लढाया मारल्या. पण कोठें हिंदुस्थानांत, गुजराथेंत, भागानगरकरांच्या राज्यांत असे पर्याय होते. ह्मणून कधीं साताऱ्याच्या किंवा पुण्याच्या जवळ दिली आहे काय? पहा जर सोनपत पानपतचें युद्ध पुण्याच्याच नजिक झालें असतें, व तिकडल्या सारखें रणकंदन माजून आपला पराभव झाला असता, तर आपलें नांव शेषही राहिलें असतें किंवा नाहीं याचा वानवा

आहे. तस्मात् इंग्रजांशीं सख्यत्व ठेवावें. मोहीं-म परराज्यांत काढावी. इंग्रज तिकडे बरोबर न्यावा. मग प्रसंग आणतां येईल. परंतु सध्यां लढाई उभी केली असतां इंग्रज हटेल असतो अशी गोष्ट नाहीं.

**खरशे०**—खरंखर मी वी वचमी ए सायबाची बदली करेल.

**बाजी०**—ठीक आहे. तर मग याप्रमाणें बोलाव-याचें. आतां मला धीर आला. कसें काय बापू ?

**बापू गो०**—आंतां मलाही वाटतें कीं काळ्यांचें बोलणें फार सयुक्तिक आहे. श्रीमारुति पार पाडील तेव्हां खरें. तितक्यांत मी घनचक्कर तयारीही करून घेतों.

( इतक्यांत पडद्यांत अहो भामरटजी पळा- पळा-नीं बो- बो- बोळा- इंग्रज आला- इंग्रज ठाणीं बस-लीं धांवा, धांवा एं- एं- एं- पडलों, पडलों, पडलों, अरे हा चोर- चोर- अं- अं- अं- पळा- पळा- आला- आला- हो. असा एकच कल्ला उसळतो. )

**बाजी०**—काय खालीं धामधूम कसली चालली आहे ? बापू, तुह्मी जाऊन सगळा बंदोबस्त करा. गहेनाजी, जा कोतवालाला सांग कीं, चावडी चावडीवर हुशारीनें असा. मी इतक्यांत बेटा करून शोध

करून आणवितों. ( सर्व उठून जातात व बाजीराव साहेब इकडे तिकडे फिरतात. एक शिपाई येतो. )

**शि०**—सरकार, बाहेर कोणी दाढीवाला बुवा आला आहे. तो आपल्याला भेटावयाचें आहे ह्मणतो.

**बाजी०**—दाढीवाला ! आणि काय ह्मणतो माझी भेट पाहिजे ! ( आश्चर्य करून ) हातांत कागद बिगद आहेका ?

**शि०**—नाहीं दिसला नाहीं सरकार.

**बाजी०**—कांहीं हत्यार पात्यार हातांत आहे ?

**शि०**—नाहीं. त्याचा आह्मी झाडा घेऊन मग पाठवूं.

**बाजी०**—बरें तर दे पाठवून. ( तो येतो ) या बसा असे. आपण कोण कशाकारितां आलां ?

**पुरुष०**—माझ्या नांवगांवाशीं आपल्यास कांहींच कर्तव्य नाहीं; पथ्यकर असेल असेंच सांगावें असा हुकूम आहे त्या प्रमाणें मी करतों.

**बाजी०**—हुकूम कोणाचा ? व कशाबद्दल ?

**पुरुष०**—कशा बद्दल तें सांगतों " सांप्रत चाललेला तुझा राज्यकारभार इतका निंद्य आहे कीं, त्याचें वर्णन देखील करवत नाहीं. जुनीं जुनीं बहुतेक संस्थानें कांहींतरी निमित्त करून घशांत ओढलीस.

पटवर्धनांनीं राज्य फांकण्यास एवढा जोर केला अं-सतां त्वां त्यांचें समूळ बीजच खणून टाकण्याकरितां अधमा, प्रयत्न केलेस. वसईला नेऊन सुयंत्र तुझें राज्य तुझ्या हातांत दिलें. त्याचें यथान्याय रक्षण तुझे हातून होत नाहीं. इंग्रज केवढे पराक्रमी! हे राजा, तुजला तिळमात्रही वळले नसतें बरें? त्या रास्त्यांची व त्यांच्या कारभाऱ्याची एवढी खटपट बरं? त्यांचा सरंजाम तुह्मी जप्त केला. याचें प्रायश्चित्त पुढें, अझून डोळे उघडले नाहींत तर, भोगावें लागेल. लोकांच्या साध्वी स्त्रिया आणून छळ करवितां या योगें तुमचे पापाचे घडे लवकरच भरत आहेत. ज्या बाळाजीनें हाडांचीं काडें केलीं, एवढा प्रबळ न्यायी असा इंग्रजासारखा दोस्त मिळवून दिला. त्याला अगदीं झिडकारितां हें योग्य नव्हे. इंग्रज लोकांनीं कल्याण केलें त्यांवर उठूं पाहतां हें अनुचित होय.

**बाजी॰**—मला वाटतें तुह्मी बाळाजीच असाल अगर त्यांचे साथी. कोणीही असा. चोंहोंकडे सगळा अन्याय चालला ह्मणतां ठीक नाहीं. आठा चौरोजां अशी अन्नशान्ति होत आहे कीं, लक्षावधि पातकें भस्म होऊन जातील. नाना देवस्थानें यांस नंदादीप व अन्नछत्रें चाललीं आहेत.

उच्छाव चालले आहेत. मी लोकांच्या संस्थान जहागिरी वगैरेंचा अपहार करितों हें ह्मणतोस हें खोटें. कारण उद्धट भृत्य झाले असतां यजमानानें शिक्षा करूंनये काय? मला तर अन्याय कोठें दिसत नाहीं. इंग्रज माझा डाव साधूं पहातो मी त्यांचा.

**पुरु**० —हे राजा, तुझे ठिकाणीं दुर्गुण तितके भरले आहेत. पहा नीतिशास्त्रज्ञ ह्मणतात:—

बुद्धिमन्तं सदाद्वेष्टि । मोदते वंचकैःसह ॥
स्वदुर्गुणं नैववेत्ति । स्वात्मनाशायसो नृपः ॥

त्याप्रमाणें लुच्चे लोकांच्या संगतीमुळें तुला तुझे दुर्गुण दिसत नाहींत. तुझें हें परस्त्रियांचे पातिव्रत्यहरण तुझ्या नरडीचा घोट घेतल्याशिवाय सोडणार नाहीं. पहा मन्वादिक काय ह्मणतात:—

नहीदृश मनायुष्यं ॥ लोकेकिंचन विद्यते ॥
यादृशं पुरुषस्येह ॥ परदारोपजीवनं ॥

आणि हे अधमा तुझा वाडा तर इथें कुंटणखाना रे झाला आहे. तुला ठाऊक आहे ना?

दंण्डको नृपतिः कामात् ॥ क्रोधाच्च जनमेजयः ॥

आणि लोभानें

'लोभादैलस्तु राजर्षिः'

आणि

मोहाद्वातापिचासुरः ॥

एवढा रावण कशानें

पौलस्त्यो राक्षसो मानात् । मदाद्दंभोद्भवोनृपः ॥

पहा यावरून कल्याण होणें नाहीं. आज ज्या १९० बायका तुझ्या ह्या कुंटणखान्यांत आणविल्या आहेस. त्यांपैकीं तुझ्या नेहमीं वेश्यैव त्या वर्ज केल्यातर ४९ केवळ पतिव्रता आहेत. इच्छा असल्यास नांवें सांगतों. तूं सोडून दे.

**बाजी०**—ही तुझी छेः तुमची कल्पना खोटी आहे. स्वेच्छेनें चालणाऱ्या व्यापाराचा दोष माझे माथीं मारूं नका. मी किती क्षमाशील आहे हें तुह्माला येथें बोलूं देतों यावरून समजा.

**पुरु०**—हे नराधमा, तुला असें वाटत असेल कीं, शहाणा तो मी आहें. तर ती व्यर्थ घमेंडी सोडून दे. कैद करण्याची तुझी छाती नाहीं. माझेपाशीं अशा कांहीं गोष्टी आहेत कीं, त्यानें तात्काल तुझा देहांतच होईल. या गोष्टींचा इहपरलोकीं तुला जाब देणें आहेच. त्या स्त्रिया पुनः स्वाधीन करतोस काय ?

**बाजी०**—( चपापतो ) त्या मी आणल्या नाहींत व मला ठाऊक नाहींत.

**पुरु०**—हें तुझें ह्मणणें बरोबर नाहीं. त्यांत अशां-

च्या पत्नी भावजया, स्नुषा भगिनि आहेत कीं, ते तुला उलथून पाडल्याशिवाय कधीं सोडणार नाहींत.

बहवोविनयान्नष्टा । राजानः सपरिच्छदाः ॥

वनस्था अपि राज्यानि । विनयात् प्रतिपेदिरे ॥

तद्वत् अशा गुणानीं तुझें राज्य नष्ट होवोन वनस्थच येथें एका वर्षांत राजे होतील हेंच घे माझें शापवचन. ( जातो. )

**बाजी**०—( मनाशीं ) कोणत्रें हा असावा? ( विचार करून ) हा त्या बाळजीपंताचा गुरु रामदास बुवा-तर नव्हे. असो कोणीका असेना. कावळ्याच्या शापानें कुठें गुरें मेलीं आहेत? ( जातो ).

---

## प्रवेश पांचवा.

**स्थळ**—कुंभारवेस. वेटाकडला रस्ता.

कोतवालीचे लोक येतात.

**कोत**०—समजलेत तुह्मी? ज्यांनां वेताळ पेठेकडे धाडलें आहे त्यांनीं तिकडे जावें. रामजी, तुह्मी चौकीवर जाऊनच पहारा करा. भगवानसिंग, तुम् लकडीपुलका नाकेपर ठेरो. बाकीच्यांनां मी आज कोठें कोठें असावयाचें याबद्दल सक्त ता-

कीद दिलीच आहे. आह्मी खुद्द आज या इमामभाईच्या डोल्यापाशीं वेटाकडला रस्ता रोखून राहतों. खरें कीं नाहीं गहेनाजी? (हळू) आपल्याला पोट साहेबाच्या जमादारानें धरणापाशींच भेटतों ह्मणून सांगितलें आहे नाहीं बरें? चला तर मग तिकडे. फिरव रे मशाल. बाकीचे तुह्मी जा आपल्या सांगितल्या कामावर. खबरदारी ठेवा बरें काय? ("जी" ह्मणून दोघे जातात. कोतवाल गहेनाजीचा हात धरून) पहा मोठा कठीण प्रसंग आला ह्मणावयाचा. परवां साहेबाचीं ठाणीं बसल्यापासून मला चैन पडत नाहीं. ज्या दिवशीं संध्याकाळीं हूल पडली त्या वेळेला मी चोहोंकडून फिरून आलों तेव्हां चोहोंकडे सामसूम होतें. पहाटे पहातों तों वाटा बंद झाल्या व वेढा बसला! सकाळींच आमचा नाईक रंभाजी येऊन सांगूं लागला कीं, टोपीवाल्यांचीं तुरुपें चतुर्शिंगीच्याही बाजूला उतरलीं. मुंबईहून पन्नास एक हजार फौज आली आहे ह्मणतात. मग मी बुधवारांत चावडीवर येऊन टाकोटाक चहूंकडे स्वार धाडले व वाड्यांतही एक धाडला.

गहे०—वाड्यांत ह्मणजे श्रीमंतांनां ही गोष्ट ठाऊक नव्हती असें नाहीं. त्यांनां आधीं ४ महिने क-

ळली होती. ( हात दाबतो व दुसऱ्या हातानें छातीस बोट लावतो. ) पण तेथें घटकेचे सतरा पंधरा वेत. त्यामुळें आतां पंचाईत पडली.

**कोत०**—काय ह्मणतां? अगोदर ही गोष्ट श्रीमंतांच्या कानांवर घातली होती? आणि कांहींच त्यांनीं मनावर घेतलें नाहीं? मला जरी थोडी सूचना तुह्मी केली असती, तर मी पक्काच बंदोबस्त करून टाकला असता. किंवा बापूला कळतें तरी ठीक झालें असतें.

**गहे०**—अहो, बापू अगदीं तयार एका पायावर होते. पण त्यांचा तेजोभंग निपाणकरानें वेळोवेळीं केला. निपाणकर आतां गेले निपाणीला.

**कोत०**—चुकलेंच तें आतां. इंग्रजाचें ह्मणणें तरी काय?

**गहे०**—नाशिक, संगमनेर, खानदेश व बागलाण या प्रांतांत भिल्ल, रामोशी जमवून त्रिंबकजीनें पुंडावा मांडला आहे. त्यास आंतून पाठपुरावा तुह्मी ह्मणजे पेशवे करीत आहां असें आमच्या कानांवर येत आहे, याकरितां त्यास आमच्या स्वाधीन करून द्या. हें होई तों, रायगड, पुरंदर व सिंहगड आमचे ताब्यांत द्या.

**कोत०**—मग श्रीमंतांनीं काय केलें?

**गहे०**—मग काय, आज दोन दिवस माणकेश्वर बोलण्यांत समेट घालीत आहेत. बाबासाहेबांनीं आज एक जाहीरनामा देखील तयार करून साहेबाच्या संमत्तीसाठीं पाठवून दिला.

**कोत०**—त्यांत काय आहे?

**गहे०**—जो कोणी त्रिंबकजीला आणि त्याचे साथी नानाकाळू यांनां धरून देईल त्याला दोन लाख रुपये इनाम, शिवाय हजार रुपयांचा एक गांव जानतलक जहागीर देऊं ह्मणून ह्मटलें आहे. मग मला महाराज बोलले माणकेश्वर बेटावर जातील, व तूंही आज कोतवालाला बंदोबस्त ठेवायाला सांग. उद्यां बहुधा तोफा निघतील.

**कोतवाल**—बरें असो. ठीक आहे. वेळ मोठा चमत्कारिक ह्मणावयाचा. अहो, ज्या राज्याकडे कोणाची पाहण्याची प्राज्ञा न्हती, त्यावर आतां असा प्रसंग यावा काय? साहेबाच्या ओंजळीनें पाणी प्यावयाचें? नशीब!!

**गहे०**—असेंच आहे. एक प्रभु ठीक नाहीं ह्मणजे असेंच व्हावयाचें. जरा स्वारी खमकी असती, तर मग यांची काय मगदूर लागली होती? पण (पुढें पाहून) अहो कोतवाल साहेब, तुह्मांला त्या बोळांत कांहीं दिसतें का? मला वाटतें तिकडून

कोणी येत आहे. आपल्याला पाहून थबकलें कीं काय ?

**कोत०**—कोण, काय ह्मणतां, थबकलें ? ( पाय उंच करून पाहिल्यासारखें करतो ) छे हो, एक नाहीं दोघेजण आहेतसे दिसतात. पोषागही अगदीं काळा आहे. इतक्या रात्रीचे कोण बरें हे ? चिंता नाहीं. चलरे राम्या चल. मशाल तिकडेच फिरव. ( विचार करून ) पण छेः मशाल उपयोगी नाहीं. विझव, विझव, अरे गुलामा, विझव ती लवकर. आपण ही पलीकडल्या बोळाच्या तोंडाशीं भिंती आड जाऊन बसूंया. बहुधा हे चोर असतील. तर त्यांनीं कांहीं आपल्याला अजून पाहिलें नाहीं तोंवर ठीक आहे. त्याच बोळानें माघारे जातील ह्मणावें, तर गोविंदरावाच्या वाड्याचें पाठीमागलें दार तिकडे त्या बारक्या गल्लीच्या तोंडावरच आहे. तेव्हां राम्या, तूं मधून तडक तात्याशास्त्र्याच्या पिछाडीनें बाबूरावांच्या आवारांत उतर, आणि चौकीवरून चार जवान घेऊन गोविंदरावाच्या पुढल्या दरवाज्यानें जा. मग कुठें जातात पाहूं.

**रामा०**—जी, जातों तरमग. ( तो जातो व हे दोघे गल्लींत आड होतात. )

**कोत०**—( हळू ) अहो, इकडे या इकडे. हळू, जरा

मारून घ्या. पुढेंच तोंडावर नको अगदीं.
( इतक्यांत काळा वेष धारण केलेले दोघे जण येतात. )

**पहिला**—मघाशीं येथें उजेड दिसत होता नाहीं बरें ? ते बहुधा या रामरावाच्या घरचे कोणीतरी असतील.

**दुसरा**—मला माहित नाहीं.

**गहे०**—कोतवाल, हा शब्द पुरुषाचा दिसत नाहीं. यांत कांहीं तरी काळेंबेरें आहे. दोघांच्याही आंगावर काळ्या घोंगड्या आहेत. तुह्माला कसें वाटतें ?

**कोत०**—खरेंच, जर रागरोस जाणारे असते तर असे गुरगुटून घेतेना. बरें ऐकूंया पुढें काय संवाद चालतो तो.

**पहिला**—माहित नाहीं ? ( आश्चर्य करून ) अशी गोष्ट कशी व्हावी ? मग खडानूखडा बातमी मिळावी कशी ? तुमच्या आमच्या धीरावर ( कानांत सांगतो उघड ) हं.

**दुसरा**—खरं तें. पण मला आज संध्याकाळीं वाड्यांत जायाला झालें नाहीं. आज ताईसाहेबांचा नवस फेडायचा होता.

**गहे०**—अहो, ही निःसंशय बाईच आहे.

**कोत०**—बरें ऐकूंया तर खरें. वाद नको.

**पहिला**—तरच आज संध्याकाळीं नवा चौघडा वा-

ह्यापुढें चालला होता. पण मग मला तुझ्या घरापाशीं फार वेळ थांबावें लागलें ? मी समजलों कीं, तूं वाड्यांत असशील.

**दुसरा**—माझी भाची चंद्री आजारी होती ह्मणून बळवंतराववैद्याकडलें औषध आणून रामभाऊला तें घालावयाला सांगितलें. इतक्यांत तुह्मी दारावर धक्यावर धक्के मारूं लागलां. यामुळें माझी धांदल झाली.

**पहिला**—बरें तर, चला, आपण या पिंपळाच्या पारावर बसून जरा तंबाकू खाऊं. ( दोघे पारावर जाऊन बसतात. )

**कोत०**—पाहिलेंत, बायको असती तर तंबाकू खावयास जातींना.

**गहे०**—कां ? हल्लीं पुष्कळ विठ्ठल सवाष्णी व गरती बाया देखील तंबाकू फांकूं लागल्या. या बाजीरायाच्या राज्यांत कांहीं ताळ राहिला नाहीं. दुसऱ्या गृहस्थाच्या बोलण्यावरून तर ओळखीचासा शब्द वाटतो. मोठ्या बुचकळ्यांत पडलों आहें बुवा ! जाऊंया त्यांच्याकडे आणि एवढ्या रात्रीचें गल्लीकुचीनें जाण्याचें काय काम ह्मणून दरडावून विचारूंया.

**कोत०**—तें नाहीं हो कामाचें. याचा सगळा ठाव

आपोआप समजेलच. नाहींतर आपल्या हद्दीच्या बाहेर जातांच लंबे करूं.

**गहे०**—दिसतात कोणी तरी भेदेच. वाड्याचें, ताईसाहेबाचें नाहीं का नांव घेतलें ?

**कोत०**—काय असेल तें पुढें समजेल.

**दुसरा**—कुठें आहे तुमची चंची ? मीच पट्टी करतें.

**गहे०**—ऐका, ऐका, द्या टाळी.

**कोत०**—खरें हो खरें. तुमच्या ओळखीचा आवाज ह्मणून समजलें. पण कोणहो ही ?

**गहे०**—पण अझून ओळख नाहीं पटली कोणती. थांबा, हा बोलतो आहे.

**पहिला**—मग गरिबावर मोठीच कृपा झाली.

**दुसरा**—कृपा कसली ? आपल्या सारख्यांची असली ह्मणजे झालें. आपल्या ब्राह्मणाच्या आशीर्वादानें आज हे दिवस पाहिले. पण लोभामुळें सर्वः—

**पहिला**—माझीही तुझ्या सारखीच स्थिति झाली आहे. पण त्याला अनेक कारणें आहेत. मला हा लोभ लागल्यामुळें माझ्या हातूनही अचाट कामें उलगडून गेलीं. आज दोन रोजांचा व्यूह तरी माझाच आहे. पहा कसा टराऊन सोडला आहे. या सर्वांच्या नाकावर मिऱ्यें वाटीन व या लोकांच्या

हातांत नारळाच्या आया देईन. अहो चांगुणा-बाई, तुह्मांला एक छानदार बगीचा व टुमदार वाडा देऊन तेथें जशी माझी पट्टराणी अशी करून ठेवीन.

**कोत०**—अरेरेरे ! ! ! हा तो घेड बाळाजी. याच्या विषयीं गांवांत हल्लीं पुष्काळच गवगवा झाला आहे. व बाबासाहेबांच्या पुळपुळीत कारभारामुळें "खाल्लें तर बाधतें व टाकलें तर श्रापतें" अशी गोष्ट झाली आहे. नाहींतर परवांच याचें तळपट केलें असतें.

**गहे०**—राहूंद्या, हा आतां भरांत आला आहे. पुढें पाहूंया काय होतें तें. ही चांडाल चांगुणी अशी असेल असें मला बिलकुल वाटलें नाहीं. रांड ताईसाहेबांची काय प्यारी. पहा उद्यां तुझ्या झिंझ्या कशा फराफरा ओढून तुझ्या तोंडांत शेण घालतों रांडे.

**कोत०**—भलतेंच कराल बरें ? परवांची गोष्ट माहित आहेना ? त्या भिव्या शिपायाला महाराजांनीं छड्या दिल्या. त्याबद्दल साहेबानें कोण तोशीस लाविली ? अखेरीस दारूखान्यावर पानशांच्या हाताखालीं बढतीवर ठेवावें लागलें. ऐकूंया पुढें.

**बाळा०**—आज जो मी तेथें जातों ह्मणतीस तो कांहीं बक्षीस उपटल्या वांचून येणार आहे ? आज त्यांनां

वाटेल कीं, केवढी कामगिरी बजावली! व या लोकांनांही तोंडांत बोट घालावें लागेल.

**चांगु०**—अशी अजब गोष्ट तरी कोणती आहे ?

**बाळा०**—ती आत्तां नाहीं सांगत.

**चांगु०**—सांगा, सांगा, असें काय बरें ? येथें कोण ऐकावयाला का आहे ?

**बाळा०**—नाहीं, सांगत नाहीं. नाहीं.

**चांगु०**—बरें नाहींतर नाहीं. पट्टीतर घ्या बटकीची. ( पट्टी त्यांच्या तोंडांत देते. )

**बाळा०**—वा: काय छान पट्टी. आतां एकादा गोडसा. ( जरा जवळ लगटतो. )

**चांगु०**—आतां तेवढा गोडसा पाहिजे. पण मघांशीं ह्मटलें काय आहे तें सांगा तर तेवढें मात्र नाहीं.

**कोत०**—काय सांगतो पहावें. बहुधा बिलंदर आहे. पूर्ण घात करावयाचा मनांत असेल.

**बाळा०**—अगे वेडे, तुझ्यापासून का चोरून ठेवीन? बंगल्यावर तरी तें तुला कळेलच.

**चांगु०**—बंगल्यावर कळेल, तर इथें सांगायला काय झालं ?

**बाळा०**—पहा तर. ( बाहींतून एक पत्र काढतो ) हें पहा.

**चांगु०**—तें काय पहा? तो लखोटा आहे. मला

काय वाचतां येतें ? आणि येत असलें ह्मणून अंधारांत दिसणार थोडेंच आहे. सांगा ह्मणजे झालं.

बाळा०—अगदीं गुप्त आहे. पहा बोलूं नकोस कोणापाशीं. चंद्रीपाशीं देखील हो ? तिथलें ऐकिलेलें तिकडेच ठेवावें. इथलें मात्र तिकडे न्यावें !

गहे०—काय गुलाम बोका नीति सांगतो आहे पहा.

चांगु०—मी कधीं या कानाची गोष्ट या कानाला फोडली आहे का ?

बाळा०—नाहींग, ऐक तर. काल संध्याकाळीं वाड्यांत गुप्त दरबार झाला. तेव्हां सगळें खलबत काय झालें तें समजलें नाहीं. कारण रामा हुजऱ्या तेथें असता, तर समजलें असतें. पण तो आज चार महिने झाले संगमनेराकडे आहे. असो; कालपासून वेढा कां बसला तुला ठाऊक आहे ?

चांगु०—गांवांत कुणी ह्मणतात दिल्लीचा बाच्छा येणार आहे. कुणी ह्मणतात इंग्रज राज्य मागतो आहे. ताईसाहेब यामुळेंच मोठ्यानें रडूं लागल्या कीं देवा, धांव. तुळजापुरच्या आईला नारळ देखील बोलल्या.

बाळा०—छेः वेडे, कुठचा बादशाह व कुठची आई ! त्रिंबकजी डेंगळ्या पळाला, त्यामुळें हें सगळें झालें.

**चांगु०**—पण यांत मजेची गोष्ट काय झाली ?

**बाळा०**—ऐक:—दरबारांत खलबतें आटपल्यावर नारो-विष्णु आपटे वक्षी यांनीं बाळाजीपंत मराठे वसई-कर यांनां पत्र लिहिलें कीं, महादेवाच्या रानांत त्रिंबकजी आहे त्याला या खेपेला येथील धोम्या कुंभाराच्या गाढवावरून पैसा पोहोंचवून या.

**चांगु०**—गाढवावरून पैसा ? कोण पहाणार नाहीं.

**बाळा०**—अगे वरून कोळसे व आंत मोहोरा, पुतळ्या असतात.

**चांगु०**—असें काय ?

**बाळाजी**—तें पत्र हलकऱ्यानें मला आणून दिलें. मी खरखरून विचारलें तरी तो ह्मणाला, वक्षींनीं बाळाजीपंताला द्यावयाला सांगितलें आहे पण मी मनांत ह्मटलें माझा काय संबंध असावा ? कदाचित् वाजीरावाला मी साहेबाकडे जातों हें समजलें कीं काय ? किंवा दुसऱ्या कोणत्या कामा कारितां आहे हें कळेना. मग मी लखोटा घेतला आणि दिव्यापाशीं नेऊन फोडला मात्र तों आंत त्रित्तम बातमी लागलीच, कीं, हें बंड सारें त्रिंबकजीचें, आणि तें सारें श्रीमंताच्या जोरावर. तो लखोटा हा. समजलीस ? आतां जेव्हां साहेब हा पाहील व यांतील एवढी गुप्त गोष्ट समजेल तेव्हां उद्यां

यांचीं गाढवें जेव्हां हद्दींच्या पलीकडे सांपडतील तेव्हां यांची बोत्रडीच वळेल.

**चांगु०**—एकूण आज आपण मोठेंच काम केलें असें होईल. आतां पहावें बक्षीस काय मिळेल तें.

**गहे०**—ऐकलेंत बुवा. हा अधम चोरांतला चोर. ही घरची बातमी साहेबाच्या कानांवर घालतो सोडीत नाहीं.

**कोत०**—मला आज्ञा द्या मी याला आत्तां यमाजी भास्कराकडे पाठवितों. व या रांडेला सती पोहोंचवितों. आतांची वेळ कांहीं सुनी जाऊं देत नाहीं. पुढच्या पुढें राम आहे.

**गहे०**—माझ्या ही मनांत तसेंच येतें. पण काय करावें ?

**कोत०**—मग चला पहातां काय? हातचा ससा टाकून मग पस्तावा कराल ( तरवार उपसतो ) चला.

**गहे०**—( विचार करून ) थांबाहो थांबा जरा.

**कोत०**—छेः थांबा कशाला ? चेंगट कुठले मुलखाचे. हा मी चाललों. ( मोठ्यानें ) अरे हरामखोर हो, ( दोघेही दचकतात, पारा खालीं उतरून बेटाकडे जाण्याच्या उद्देशानें तोंडें फिरवतात. चांगुणा घाबरते, व बाळाजी सांवरून उभा राहतो. ) अरे हरामखोरांनो, तुह्मी जाऊं द्या हो गहेनाजी, मी यांचा शिरच्छेद करितों.

[library stamp]

**चांगु०**—अग आई, ( रडूं लागते )

**कोत०**—अबे, लंडी तुमारी माय किधर है, हराम-खोर, बईमान.

**बाळा०**—अगे रडूं नकोस जें होणें असेल तें होईल. ( आपण ही तरवार काढतो ) हें जोंवर शाबूद आहे तोंवर या * * फुसक्यांला विचारीत नाहीं. घाबरूं नकोस. पण ( हळूंच ह्मणतो ) पळूं लाग बेटाकडे. नाक्यावर जायाला फार दूर नाहीं. ( आपण ही झरझर चालूं लागतो. व चांगुणा पळते. )

**कोत०**—अबीक्या देखते है? पकडो इनकू. ( तो धांवतो. )

( कोतवाल बाळाजीच्या पाठीमागें लागतो. दोघे एकमेकांच्या आंगावर हात करतात. बाळाजीच्या हातास जखम होते. त्याची तरवार गळून पडते. चांगुणा किंकाळी फोडते, हें पाहून गहेनाजी तिचें तोंड दाबूं लागतो. ती दूरदूर पळते. )

**कोत०**—( बाळाजीला पाडून त्याच्या उरावर गुडघा देऊन बसतो ) बोलरे दुष्टा, रे अधमा, अशा कृतीनें तूं कोणत्या स्वर्गाची तयारी करून ठेवली आहेस? पहा, महान् राजद्रोह संपादून तूं रौरव नरकांतच अक्षय्य अधःपतन पावशील हें खूप जाण.

व आतांच तुला तुझ्या पितरांच्या भेटीला यम-सदनाला पाठवितों.

**बाळा०**—मी तर तुझ्या आधीन सांप्रत झालों आहें खरा. पण हें पक्कें ध्यानांत ठेव कीं, मी ब्राह्मणबच्चा आहें. माझा एकट्याचा येथें मुडदा पडला तर माझा विचारणारा वाली असा समर्थ आहे कीं, क्षणार्धांत तुमच्या सर्वांच्या बायका रंड्यामुंड्या होतील. अरे सालसा, आतां तूं राजद्रोह पदरीं बांधतोस; पण सांगकीं, माझ्या मित्राच्या पाठीस पाठ लावून आलेली बहीण, माझ्या परमप्रिय स्नेह्याची साध्वी स्त्री हिचें अकारण ज्यानें पातिव्रत्य हरण केलें, त्याला तरी नरक ठेविला नाहीं काय? ज्यानें एवढ्या गजांतलक्ष्मीवर आणून बसविण्यास काय श्रम केले आहेत ते एक त्या परमेश्वरास माहीत. तर ते मुदलीच विसरून जाऊन कृतघ्नपणें त्यांचें नुकसानच करावयाचें असा ज्यानें चंग बांधला, त्या दुष्टाला शासन नको काय?

**कोत०**—परंतु तें असो; दुष्टा, आज सर्व हद्दत फोडून आपल्या पुत्रपौत्रांचें आजन्म तूं अकल्याण करीत आहेस.

**बाळा०**—नाहीं. तूं चुकतोस. मी दुष्ट व्याघ्राच्या तडाक्यांतून निरपराधी शतावधि गाई सोडविण्याचें

पुण्यकर्म करीत आहे. त्यांत मोक्ष होवो कीं मोक्ष होवो.

**कोत०**—परंतु प्रस्तुत सक्षिमोक्षाचा दाता कोण आहे?

**वाळा०**—एक भगवान् आहे. तूं कोण त्यापुढें मशाक.

**कोत०**—पहा तूं चुकतोस, मी ही नंगी भोंसकली कीं, तुझे पंचप्राण इथेंच विकल होतील. पण ब्राह्मण ह्मणून सोडून देतों. तें पत्र कुठें आहे तें दे इकडे.

**वाळा०**—घे हें पत्र. ( भिरकाटून देतो. ) हं घेतलेंस ह्मणून हृदय कांहीं घेतलें नाहींस.

**कोत०**—अरे अधमा, तुला आतां पार केला असता, मग हृदय कुठें राहिलें असतें? पण मी जीवदान देतों. ( पत्र आपल्या खिशांत घालतो. )

**वाळा०**—अरे मूर्खा, जीवदानाची भलतीच घमेंडी बाळगूं नकोस. तूं कोणीही अस. मी करतों हें यथान्याय आहे. शस्त्रविरहित झालों ही काळाच्या विपर्ययाची गोष्ट. नाहींतर तुझ्यासारख्या दहा असामींना पाणी पाजीन.

**कोत०**—एकूण अझून तुझी गुर्मी जिरली नाहीं. चांगलाच इंगा फिरला पाहिजे. हा पहा. मी तुला आतांच ठार करतों. ( तरवार उचलतो.

इतक्यांत चांगुणा मोठ्यानें किंकाळ्या फोडते कोणी धांवा धांवा ह्मणते. लोक धांवून येतात. कोतवाल गहेनाजी पळून जातात. मग बेटावरले शिपाई कंदील घेऊन येतात. )

शिपा०—दादा, आन् तुमी हथ असा पडलाया. कां इवळतां कां ? ( कंदील जवळ नेऊन ) हां हां हां तुमच्या हाताला लई लागलया. ( बाळाजी कण्हतो ) थांबा मेना आनितों. आन् ( दुसरीकडे पाहून ) तथ कोन आवा हाय ? ( बाळाजी त्यास चिमटा घेतो. ) हं हं हं बरं बरं. ( बाळाजीस उचलून घेऊन जातो. )

**प्रेक्षक**—काय बाजीरावाच्या राज्यांत चोरापोरी ही.. हरहर ! ! !

( सर्व जातात. )

**पहिला अंक समाप्त.**

# अंक दुसरा.

## प्रवेश—पहिला.

**स्थळ**—विश्रामबागेचा वाडा.

( पडद्यांत गलबलाट होतो व त्रिसुपर्ण चालतें. )

ॐम् ब्रम्हमे तुमां मधुमे तुमां ब्रह्ममेव मधुमे तुमां । अयानो देव सविता । यास्ते सोमप्राणाग्ङ्स्तांऽजुहोमि । त्रिसुपर्णं मया चितं ब्राह्मणाय दद्यात् ब्रूणहत्यां वा एतेघ्नन्ति । ये ब्राम्हणा स्त्रि-सुपर्णं पठान्ति । ते सोमं प्राप्नुवन्ति । आसहस्त्रात्पंक्ति पुनन्ति ॐम् ब्रह्ममेधवा: मधुमेधवा, सहना ववतु । सहनौ भुनक्तु सहवीर्यं करवावहै । तेजास्विनावधीतमस्तु । माविद्विषावहै । ओ-म् शान्ति: शान्ति: शान्ति:

( पळीपंचपात्री घेऊन दोघेजण येतात. )

**पहिला**—झालीं उपाध्येबोवा, सर्व पात्रें प्रोक्षून झालीं काय ? श्रीमंत विचारतात संकल्पाला येऊं काय ?

**उपाध्या**—जोशीबुवा, सर्व तयारी होऊन राहिली आहे; परंतु सदाशिवपेठेंतून बाळंभट आयदे काशीकर व त्यांच्याकडे गये कडले कोणी शास्त्री आले आहेत, ते तेवढे यावयाचे आहेत, बापूसाहेब गोखले ही यावयाचे आहेत. बाकीची मंडळी तटस्थ आहे, एवढ्यासाठीं हा मी

उपा०—काय, आपल्याला श्रीमंत काय बोलले ?

जोशी—बोलायाचें काय? परम चिंतातुर दिसले. मी ग्रहाचे जप करावयाला सांगितलें आहे. साडेसाती ही आतां बाबासाहेबांनां सरताची आहे. ही फार घोळल्याशिवाय सोडणार नाहीं. ग्रहांचीं दानेंही केलीं पाहिजेत. एक लागत्याची किंवा सुटत्याची फारच कष्ट देते. लागल्याची बरी गेली. पण आतां सुटावयाला अझून आठ महिने पाहिजेत.

उपा०—बरें. काल जी उदकशान्ति केली त्याचें कारण तुह्मांला कळलेंच असेल.

जोशी—मला स्वप्न कळल्यावर मींच सांगितलें काल सुप्रभातीं कीं, उदकशान्ति व दंपती-भोजन हीं करावीं असें शास्त्र आहे.

उपा०—स्वप्नाचा उलगडा तरी कसा करतां ? आह्मांला स्वप्नतरी उडत उडत तिकडून वहिनी साहेबांकडून कळलें आहे. आपल्याला सगळें सांगितलेंच असेल श्रीमंतांनीं.

जोशी—हो. महाराज ह्मणाले, दसऱ्याच्या दिवशीं शिलंगणाला आपण जसे निघतों तसे नेहमीं प्रमाणें निघालों. बरोबर थोर मोठे मानकरीही अंबाऱ्यांत होते. त्यापुढें लोहदंड धारण करून

भालदार ललकारत होते. त्यापुढें तासे वाजंत्री वाजत होते. व सर्वांत पुढें जरीपटक्याचा हत्ती ही चालला होता. अशा रीतीनें दक्षिणेकडे तोंड करून चाललों, तों ओंकारेश्वराचें देवालय लागलें. नंतर देवाला वंदन करावयाला गेलों तों पागोटें पडलें. तें उचलून गहेनाजी हुजऱ्या घालूं लागला, तों मला डोक्याला शेण थापीत आहेत असें वाटलें. मग मीं स्वतः शेला गुंडाळला. पुढें आमची स्वारी चालली तों, अपरंपार गढूळ पाणीच पाणी पाहिलें. त्यांत आमचे सरदार, शिपाई गटंगळ्या खातांना दिसलें. पुष्कळ सामान, मेणे, पालख्या, वाहून गेल्या. माझ्या अंबारीच्या दांड्याला पाणी लागलें. अरे, हा अनर्थ काय ह्मणून विचार करीत आहें तों, जरिपटका पाण्यांत पडून हत्तीही वाहून गेला. माझा ही हत्ती ठेंचाळल्या सारखा होऊन महात उलथून पडला व अंबारीच्या दांड्याही मोडल्या. तेव्हां मी पाण्यांत उडीटाकून पोहत पोहत चाललों. कड दिसेना. अखेरीस एका दाढीवाल्या गोऱ्या बुवाच्या कासेला लागून कडेला आलों. पहातों, तों तें गढूळ पाणी नाहीं सारखें होऊन मोठा थोरला घाट आहे, पुढें स्वच्छ स्फटिका-

सारखी भागीरथी वाहत आहे, दाट वृक्ष लागून गेले आहेत, ब्राह्मण स्नानसंध्या करीत आहेत. सुंदर सुंदर बायका पाणी भरीत आहेत, मोठा वेदघोष चालला आहे, तेथें स्नान करून जाऊन जप करीत बसलों." इतकें ऐकिल्यावर मी सांगितलें कीं, तासे वाजणें, गढूळ पाणी, शेण, लोहंदड वगैरे स्वप्नांत पाहूं नये. आतां ज्या-पक्षीं:– ( इतक्यांत बाजीराव साहेब येतात. )

**बाजी०**—काय आमच्या स्वप्नाच्या गोष्टी चालल्या आहेत वाटतें. ( दोघे गप्प राहतात ) चालूंद्या. पण कायहो उपाध्येबावा, बापू नाहीं आले अझून? त्यांचें कुटुंब तरी आलें आहे काय?

**उपा०**—नाहीं, कोणीच नाहीं. त्यांच्याकडे बोलावणें गेलें आहे. आतां येतील बहुधा. हे काय! ( पडद्याकडे बोट करून ) आलेच. वा: बापू-साहेब, आज खूपच उशीर केला! सगळी मंडळी आपल्या करितां खोळंबून आहे. श्रीमंत सुद्धां मुद्दाम बाहेर आले.

**बाजी०**—खरेंच बापू, आज तुमच्याकडून भारी उशीर झाला. बरें चला. आणखी कोणी यावयाचें आहेना तुमच्या कडलें?

**बापू**—आमच्या कडलें? कोण बुवा?

**जोशी**—कोण ह्मणजे यमुना वहिनी हो. आज दांपत्य नव्हे का ?

**बापू०**—( हसून ) जोशीबुवा, ती तुमची वहिनी बराबरच आहे. ( शालजोडीच्या आंतून सोन्याच्या पट्ट्यांतून तरवार काढितो. ) सर्व बावरतात, व आपआपसांत नेत्र संकेत इत्यादि करून दाखवितात कीं, स्वारी मोठी कडक आहे. )

**उपा०**—नाहीं बापू. तो नियम तुह्माकडे लागू नाहीं. चला आंत. श्रीमंत पात्रें प्रोक्षण करूंदेत आतां. ( मंत्र ह्मणतो ) एकोविष्णुर्महद्भूतं पृथक्भूतान्यनेकशः त्रीन्लोकान्व्याप्यभूतात्मा भुंक्तविश्वभुगव्ययः ( सर्व आंत जातात. हर हर महादेव होतो. )

---

## प्रवेश—दुसरा.

**स्थळः**—शुक्रवारचावाडा.

( सोंगट्या व बुद्धिबळें यांचे डाव चालले आहेत. )

**बाजी०**—किती पडले ताई ?

**उमा**—किती ते काय ? हे पुढं पडलेच आहेत पव बारा तेरा. फार फार तर तांबडीच्या दोन घरं पुढं जाईल.

**ताई**—पुरे ग उमा. काय दिमाख लावतीस ?

मघांशीं ( बाजीरावाकडे बोट करून ) हात लागला ह्मणून डाव झाला. नाहीं तर पाहिलं असतं. ( सोंगटी एक लावते व दुसरीनें डाव देते. )

**बया**—अहो पेठीण बाई, इतकं कांहीं मेलं उंच नाक करून बोलायला नको.

**उमा**—हें पहा, आत्तां किती पाहिजेत बरं ? ( फांसे खुळखुळाविते. )

**बया**—बग आतां फार नको. छ चार दहा घे कीं, पलीकडली सोंगटी ठोकलीच ह्मणून समज.

**उमा**—( फांसे टाकते ) हात्तेच्या चार कानेच पडले.

**बया**—कांहीं चिंता नाहीं. ह्या तांबडीनें कुठली मारूं बोल. पुढची मारूं का हिरवीनं मागची मारूं?

**उमा**—पुढचीच मारा.

**ताई**—( फांसे खुळखुळाविते ) किती बरं घेऊं ? त्या ( बोटानें दाखवून ) दोन्ही जुगल्या पाहिजेत.

**बाजी०**—आधीं लागूं दे, मग जुगायचं पुढं पाहूं.

**ताई**—( फांसे टाकते ) छ चार दहा. ही पहा लागली. पुढल्या डावाला जुगवूं.

**उमा**—आतां किती पाहिजेत ?

**बया**—कांहींही पडो, सई झालीच ह्मणून समज.

**उमा**—( टाकते ) छ तीन नऊ.

**बया**—झाली सई का ताई ?

**बाजी०**—बरं आहे. तुमचं चालूं द्या. मी जरा वामकुक्षी करितों. ( लोडाशीं आडवे होतात ) डाव कुणाचा कुणावर झाला ह्मणजे सांगा.

**ताई**—मग काय झालं त्यांत ? आमचा डाव नाहीं का त्यांच्यावर होत कधीं ?

**वया**—महाराजांच्या तब्यतीला ठीक नाहीं वाटतं.. घालूं का वारा ? ( विंझणा घेऊन वारा घालिते. )

**उमा**—तूं तेवढा वारा घालणार, आह्मीं कोणीच का नव्हत ? ( पायांपाशीं जाऊन बसते व रगडूं लागते. )

**ताई**—मीही आल्यें हो. ( असें ह्मणून डाव आटपून येते व दुसऱ्या पायाशीं बसते. )

**बाजी०**—का अन्याबा, कोठवर आला डाव ? शेंडीणबाईनं गळ्यांत घोंगडं घातलं वाटतं.

**सीता**—पहावा तरी चमत्कार महाराजांनीं.. या घोड्याच्या मांडीनंच प्यादी करून देल्यें.

**अन्याबा**—इतक्यांत कांहीं प्यादी होत नाहीं रामाजीपंत आले तरी..

**सीता**—( लाजते ) हें हो काय मेलं अन्याबा ! तीन चार डावांत राजाला शह देऊन बेजार करिल्यें, मग पहाल्यें कशी होत नाहीं ती..

**अन्याबा**—माझा वजीर जोंवर शाबूद आहे, तोंवर तुमच्यानें कांहीं वांकडें होत नाहीं. त्या खेरीज

हात्ताड लांब असले ह्मणून काय झालें ? तेंही उपयोगाला येईल. येऊं द्या तर तुमचं पुढं घोडं सीताबाई, कीं बडवलंच.

**सीता**—( अन्याबाला खुणाविते ) मागं पहा मेलं तरी एकदां !

**अन्या०**—( पाहून ) जसे काय श्रीकृष्ण परमात्माच केवळ शोभत आहेत.

**सीता**—आणि भोंवतालच्या राही रुखमाई, सत्यभामे सारख्याच चमकत आहेत. नाहीं अन्याबा ?

**बया**—आणि तूं ग ? तूं तर राधेसारखी.

**अन्या०**—मग एकून मीच राहिलों.

**उमा**—अहो अन्याबा, तुह्मी पेंद्यासारखे.

**अन्या०**—बरें बुवा ? ( डाव देत देतच ) सरकार, आज गांवांत नवीन कथेकरी बुवा आले आहेत.

**बाजी०**—कोणते ?

**अन्या०**—नगरकर. यांच्यापाशीं असा लावण्याचा सांठा आहे कीं, आठ दिवस पुरे पडणार नाहींत. एकाहून एक अस्सल !

**बया**—तर मग एकदां वाड्यांत आणलाच पाहिजे.

**अन्याबा**—ऐका. बायकांनां देखील तमाशे आवडूं लागले !

**ताई**—याच बया बाई हो !. पहिल्यानें जेन्हां वाड्यांत

फुसलावून आणल्या, तेंव्हां काय हो लाजऱ्या होत्या! अगदीं नाकानंच वांगीं सोलीत. आतां आमच्यावर तान!

**बया**—पण बुधवारांतून भर बाजारांतून जाऊन पीतांबर उपटले नाहींतना?

**बाजी०**—आतां मागच्या उखाळ्या पाखाळ्या कशाला पाहिजेत. अन्याबा, आजच होऊंद्या तमाशा फुलबागेंत.

**अन्या०**—छेः आज तर रात्रीं ते अंबाप्रसादशास्त्री इथं घटकंचुकीचा समारंभ करणार ह्मणून प्रातःकाळीं आपली आज्ञा झाली, त्याप्रमाणें चारशें बायकांनां निमंत्रणें पाठविलीं आहेत. व आपले समस्त बालगोपालही बोलावले आहेत.

**बाजी०**—तरमग उद्यां हां!

**अन्या०**—जी वरं? उद्यां. (इतक्यांत शिपाई येतो)

**शिपाई**—बाहेर माणकेश्वराकडून रामचंद्र हरी आले आहेत महाराज.

**बाजी०**—जा मग त्यांनां आंत घेऊन ये. पण बरोबर कोणी आहेत काय रे?

**शिपाई**—होय सरकार. दोन शास्त्री आहेत बरोबर.

**बया**—मग आह्मी जातों मागल्या माडीवर. चल ग सीताबाई ऊठ, 'धडाना गोडाची.' काय अझून डाव नाहीं होत आणि कांहीं नाहीं.

**बाजी०**—बसा जाल. (तिचा हात धरून बसवितो) ते आले ह्मणून काय झालें?

**अन्याबा**—छेः भलतेंच सरकार, जाऊंद्या त्यांनां, रात्रींही आणखी आज गोंधळ आहेच. (सर्व स्त्रिया जातात व बाजीराव सांवरून बसतात) जा गणबा आण त्यांनां आंत. (तो जाऊन घेऊन येतो.)

**राम०**—या शास्त्रीबुवा, या हरदासबुवा, असे बसा. (हातानें महाराजांच्या बाजूची जागा दाखवितो. व आपण अन्याबा रहातेकरा शेजारीं बसतो.)

**बाजी०**—(शास्त्र्याकडे बोट करून) हे कोठून आले आहेत?

**राम०**—हे शास्त्री गोदातीरीं पैठणास असतात. हे महान् वैय्याकरणी असून न्याय व ज्योतिषही पढलेले आहेत. हे उत्कृष्ठ सामुद्रिकही जाणतात.

**बाजी०**—बसल्या ठिकाणाहून मनुष्याच्या खाणाखुणा सांगवतील?

**शास्त्री**—अस्मद्गुरुवर्यांच्या कृपाप्रसादलेशानें मी श्रीमंतांची मनीषा असल्यास कथन करितों.

**बाजी०**—बरें आहे. सांगा पाहूं?

**शास्त्री**—आपला जन्म शुक्लपक्षांत झाला.

**बाजी०**—कधींहो अन्याबा?

**अन्या०**—( विचार करून ) शिमगी पूर्णिमा, माही पूर्णिमा, व पुसांतील पूर्णिमा. ठीक, दशमीला जन्म झाला. एक जमलें.

**शास्त्री**—जन्मसमयींचा देश विदेश होता.

**बाजी०**—हो हो. धार. बराबर.

**शास्त्री**—शत्रूच्या जाचांत व त्रासांत पुष्कळ दिवस काढावे लागले व पुढें लाग:—( धोतरानें तोंड पुसतो व जरा गांगरतो ) १६ बायकांचा योग आहे. काशीयात्रा घडेल. परंतु सध्यां सगळे ग्रह प्रतिकूळ आहेत. सोनें धरलें तर माती व्हावयाची. मित्र ते देखील शत्रु होतील.

**बाजी०**—खरें, पण काय करावें ? दानें करवीत आहें अनुष्ठानें चालविलीं आहेत. आपल्या आढळांत एकादें जागृत दैवत असल्यास कळवावें.

**शास्त्री**—पैठणाच्या नजिक चोंढाळ्यास एक देवी आहे. फारच जागृत दैवत. नवसाला पावली नाहीं असें अज्ञान कोणाला झालें नाहीं. शत्रु संहनना विषयीं तिचा मोठा हातखंडा. निदान उच्चाटन तरी व्हावयाचेंच.

**बाजी०**—मग तर ठीक झालें. तुह्माला आतां फिरून पैठणाकडे जावयाचें आहेना ?

**शास्त्री**—नाहीं. मी यात्रेच्या उद्देशेंकरून श्रीक्षेत्र उ-

ज्जनीस जाऊन तेथून घडल्यास गोकुळ वृंदावन करण्याचा मनोदय आहे.

**अन्याबा**—आतां तुह्मी आपलें गोकुळ वृंदावन इथंच समजा.

**बाजी०**—पैशाविषयीं भिऊं नका. लागेल तेवढें होमाला हवनाला खर्च करा. ( अन्याबाला सांगतो ) हजार रुपये यांनां द्या. यांनांच खालीं घेऊन जा. शास्त्रीबुवा, रुपये पदरांत घ्याहो मोजून. मागून जो खर्च होईल तोही धाडून देऊं. पण काम फत्ते झालें पाहिजे.

**अन्याबा**—गणबा, यांनां खालीं घेऊन जाऊन रामराव चिटनीसाकडून हजार रुपये देवबा. इकडे ये. ( कानांत ) यांच्यापासून पांचशें आपले घे अं. ( उघड ) जा. ही चिठी घे तिजोरीवर. ( गणबाजवळ चिठी देतो. ) घ्या विडा शास्त्रीबुवा. ( देतो. )

**गणबा**—जी. चला शास्त्रीबुवा.

**बाजी०**—फत्ते हां. सातवे दिवशीं यानें तोंड वासलें पाहिजे. या हां संभाळून. यांनां विडे दिले रे ?

**शास्त्री**—भगवती जगदंबा सिद्धीस नेणार समर्थ आहे. ( नमस्कार करून जातो.)

**बाजी०**—त्यांचा चांगला शोध करून पैसे द्या असें सांगितलें आहेना ?

**अन्या०**—म्हणूनच त्याच्या कानांत सांगितलें तें.

**बाजी०**—ठीक. हे कोण ?

**राम०**—हे हरिदास गोपीपुरचे. यांचें नांव राधामोदवर्धनाचार्य. हे मोठे कथेकरी आहेत, म्हणून माणकेश्वर बोलले कीं, आपल्याकडे यांची हजरी असावी.

**बाजी०**—तुम्हांला गातां येतें काय बुवा ? ख्याल, टप्पे ? कटाव ?

**हरि०**—होय सरकार. अल्पमतीनें जें थोडें बहुत शिकलों आहें तें गातों.

**बाजी०**—बरें आहे. त्यांना सगळ्या अटी सांगून ठेवा अन्याबा.

**अन्याबा**—बोवा, कथा कसली लावाल ? उगीच रामायणांतील वेडीविद्री नको हो. छानदार श्रीकृष्णचरित्रांतील रासक्रीडेचा, कात्यायनीवृत्ताचासा भाग लावा. गोपाळ, गौळणी, राधा यांची गाऱ्हाणीं लावलींत तर फारच नामी.

**हरि०**—हें तर एक चांगलेंच झालें. कारण 'न कृष्णात्परदैवतं' कृष्णाहून मी श्रेष्ठ दैवत मानीतच नाहीं.

**अन्या०**—दुसरें ऐका. ब्रह्मज्ञान भारी लावूं नका हां. तें सगळें पानचट. पण हें कीं, सगळी कथा चार घटकांत आटपावयाची.

हरि०—त्यांतही आमचें बरें आहे.

राम०—पहा हरदासबुवा, आख्यान तेवढ्या वेळांत संपवून टाका. अर्धेमुर्धें टाकूं नका.

हरि०—आणि नाहींच संपलें तर ?

अन्या०—ह्मणजे ? संपवा मुद्दाम. हें हो काय ? मग हरदास कसले ? थांबा, आणखी काय सांगावयाचें आहे बरें ? ( विचार करतो ) हं, ठीक आठवलें; महाराज आल्यावर सभेकडे पाठ करून जात जाऊं नका बरें ? समजल्या सर्व अटी ? या उद्यां सायंकाळीं. लवकर या. ( हरिदास उठतो. )

बाजी०—रामराव, त्यांनां ह्मणावें मोरोपंत ह्मणूं नका.

राम०—हां, हां, खरें तें. राहिलेंच. हरिदासबुवा, कथेंत मोरोपंताच्या आर्या ह्मणावयाच्या नाहींत.

हरि०—( मनाशीं ) काय या लेकाची पीडा पहा ! हेंच करूं नका तेंच करूं नका. बरें आहे, काय करणार ? गरजूं पडलों. ( उघड ) येतों. ( नमस्कार करतो. )

बाजी०—( नमस्कार करून ) या, काय आपलें नांव ? गोपीकुचमर्दनाचार्य ?

हरिदा०—नाहीं. या देहाला राधामोदवर्धनाचार्य ह्मणतात.

अन्या०—ठीक आहे बुवा. रात्रीं लवकर या बरें ? पुढें तमाशा आहे.

**हरि०**—( मनाशीं ) हे बहुधा राज्याचा तमाशा कर-तात. ( उघड ) येतों. ( जातो. )

( इतक्यांत ताई पेठीण येते. )

**ताई**—सरकार, सायंस्नानाची वेळ झालीना? आह्मी चवदा पंधराजणी महाराजांनां स्नान घालावयाला तिष्ठत आहों! रात्रौ आणखी पूजन जेवणखाण होई तों मध्यान्ह कलंडेल.

**बाजी०**—उठतों तर लवकरच. तुह्मांला आणखी कांहीं कागदपत्र दिले आहेत काय माणकेश्वरांनीं?

**राम०**—होय सरकार. दोन तीन कागद दिले आहेत. दहिवडी, खानापूर आणि निंबगांव या गांवच्या कमाविशा द्यावयाच्या होत्या. पैकीं चिंतो वामन यांच्याकडे दोघांनां दहिवडी व खानापुरच्या दिल्या. आतां निंबगांवची कोणाला द्यावी, याबद्दल सरकाराला विचारायाला सांगितलें आहे.

**ताई**—कुठल्ली? ती निंबगांवचीना? ती कमाविशी माझ्या जांवयाला द्यायचीना?

**अन्या०**—तुमचा जांवई! अझून मुलीला नाहीं ठि-काण, तो जांवई कुठला?

**ताई**—का? माझ्या बहिणीचा जांवई तो आमचा जांवई. ती आवडी नाहीं का वाड्यांत येत, तिचा नवरा. ती माझी भाची.

**वाजी०**—बरें आहे. लिहा त्याचें नांव रामराव. काय नांव? काय हो ताई?

**ताई०**—त्याचें नांव चिटको मुरलीधर भातलंवड्ये.

**राम०**—( तसें लिहितो ) धारवाडची मामलत चिंतो-वामन यांनीं नागेश रुद्राप्पाला २२ लाखांला दिली.

**वाजी०**—बरें आहे. झालें?

**राम०**—होय सरकार. पागेच्या शिपायांचा सहा महिन्यांचा रोजमुरा थकला आहे, त्याबद्दल काय आज्ञा? दसरा जवळ आला ह्मणतात, गणपति तर येऊन ठेपले.

**वाजी०**—परवां प्रतिपदेला करतों ह्मणून सांगा. गंगथडीचे व पंढरपूरचे आले ह्मणजे देऊं.

**राम०**—येऊं तर? ( जातो. )

**वाजी०**—या. चला ताईबाई. ( तिच्या खांद्या-वर हात टाकितो ) चला अन्याबा. ( सर्व जातात. )

---

## प्रवेश—तिसरा.

**स्थळ**—बेट—इंग्रजांची छावणी.

( एल्फिन्स्टन साहेबांचा बंगला. )

**एल्फिन्स्टन**—श्रीमंतांची स्वारी आज मुद्दाम आली पाहून मला अत्यानंद झाला आहे. असाच कृ-पाकटाक्ष नेहमीं असावा.

**वाजी०**—मी परवांच येणार होतों, परंतु आज सकाळीं बाहेर रपेटीला घोड्यावरून गेलों होतों तेव्हां माणकेश्वर ह्मणाले कीं, मागें एकदां आपण मला बोलावणें पाठविलें होतें तेव्हां यावयाला झालें नाहीं तो आपण अगदीं खोळंबून वसले होते, मग मला ही स्मरण पडलें. नंतर जाऊन स्नान केलें आणि एकंदर सर्व उरकून जरा अंमळ तिसरा प्रहर झाला तेव्हां आधीं स्मरण पूर्वक आलों. परवां वेळेला आलों नाहीं ह्मणून संकोच वाटतो.

**एलिफ०**—कांहीं चिंता नाहीं. त्यांत आपल्याला कांहीं वाटावयाला नको. एवढ्या उन्हाची तसदी घेण्याचें इतकें कांहीं निकडीचें काम नव्हतें. कोण आहे रे, श्रीमंतांनां विंझणा घेऊन वारा घाल. ( शिपाई येऊन वारा घालतो. )

**वाजी०**—कशाला आमचे गहेनाजी वहेनाजी आहेत. तुमच्या लोकांनां कशाकरितां श्रम ?

**एलिफ०**—वा: आमच्या लोकांच्या हातून आपली सेवा केव्हां घडावी ? काय माणकेश्वर नवल विशेष खबर ? तुह्मी नानांच्या वाड्यांत रहावयाला आलेत. आतां ठीक आहे ?

**माण०**—नानांच्या वाड्यांत येऊन तीन महिने झाले. आपल्या व श्रीमंतांच्या कृपेनें ठीक आहे.

**एलिफ०**—आमच्या काय, श्रीमंतांच्या ह्मणा, नाना फडनीसा इतका इतमाम तुमचा आहेना ? ते नव-कोट नारायण होते ! ( हसतो. )

**माण०**—आतां तेवढे पैसे मात्र माझ्यापाशीं नाहींत; परंतु श्रीमंतांनीं नानापेक्षां कांकणभर ज्यास्त वा-ढविला आहे.

**एलिफ०**—तें काय ? कांहीं मुलुख जास्त दिला ?

**माण०**—छेः नाहीं. श्रीमंतांनीं मला चौघडा दिला तो हल्लीं वाड्यावर लावलेला आहे. नानानां कोठें होता ?

**एलिफ०**—खरी गोष्ट, परंतु आपला चौघडा आह्मांला वेटावर देखील ऐकूं येत नाहीं. पण नानांचा वि-लायते पर्यंत थडकत होता. ( बाजीराव व माणके-श्वर हिरमुसले होतात. इतक्यांत एक शि-पाई येऊन माणकेश्वरांच्या कानांत सांगतो. )

**माण०**—मी जातों साहेब, आमच्या घरांत फार आ-जारी आहे ह्मणून शिपाई आला.

**एलिफ०**—तुमच्या घरांत ? कोण ?

**बाजी०**—अहो, घरांत ह्मणजे बायको.

**एलिफ०**—हां, हां, हां, किती झाला तरी आमचा व्यासंग कोता पडतो. बरें या. ( सदाशिव माणकेश्वर जातो. )

**वाजी०**—वाहवा तुमचा बेत नामी. ( सभोंवार पाहून ) हा बागबगीचा मोठा सुंदर केला आहांत बुवा. तुमच्या देशांत अशीं हिरव्यावर तांबडा रंग येणारीं झाडें आहेत का ? यांहून मोठीं तऱ्हतऱ्हेचीं झाडें असतील नाहीं वरें ?

**एलिफ०**—होय. आमच्या देशाची लतावृक्षादिकां विषयीं फार प्रख्याति आहे. तिकडे कांहीं झाडें उलटीं आहेत. तीं बहुधा आपल्या पाहण्यांत इकडे नसतील.

**वाजी०**—पाहण्यात नाहींत खरीं, पण ऐकण्यांत आहेत. नाहीं हो नारोपंत, दादा अटकेला गेले होते तेव्हां राणूजी ह्मणाला नाहीं ? कीं, तिकडे काश्मीरांत अशीं झाडें आहेत.

**नारो०**—होय सरकार.

**वाजी०**—पण असे नामी ऐने, या सुंदर सुंदर इमारती, हीं उत्कृष्टचित्रें हीं सगळीं विलायतचींच काय ?

**एलिफ०**—नाहीं, वलंदेजी, फराशिस, फिरंगी यांच्या देशांतील होत. बाकी डाव्या हाताला टांगलेली ती तसबीर मात्र आमच्या पहाडी मुलुखांतील गरीब झोंपड्याची.

**वाजी०**—त्यांत ( बोटानें ) भारी दाट लवींत गुडुप झालेलें मांजरा सारखें काय दिसतें ?

**नारो०**—तो विलायती ससा असेल.

**एलिफ०**—छे: तें मांजरच आहे. आमच्या तिकडे थंडी भारी ह्मणून देवानें निवारणार्थ लव दिली आहे.

**बाजी०**—तिकडल्या माणसांना तशीच असते काय ?

**एलिफ०**—( हसून ) ते माझ्या सारखेच.

**बाजी०**—ह्मणूनच अष्टौप्रहर आपल्या आंगांत कपडे असतात ते.

**एलिफ०**—आणा रे अत्तरगुलाब. ( हार घेऊन स्वतः बाजीरावाच्या गळ्यांत घालतो व गुलाबपाणी शिंपडतो. )

**बाजी०**—नको, नको, नको, फार नको.

**एलिफ०**—घ्या हो. आपण आमच्या कंपनी सरकारचे परम दोस्त. आपला मात्र अकृत्रिम स्नेह असला पाहिजे.

**बाजी०**—उभयतांचा पाहिजे.

**एलिफ०**—आमच्या सरकारचा तरी आहे.

**बाजी०**—मग आह्मांकडून कोठें नाहीं ? आह्मी तरी तसेंच वागत आहों.

**एलिफ०**—तें मी जाणून आहें. परंतु आपल्या कामगार लोकांची तकशीर मी समजतों. कारण आपल्या सारख्या पुण्यशील पुरुषाला देवयात्रा,

तीर्थाटणें, स्नानसंध्या यांखेरीज कांहीं उद्योग असूंच नये. पण हे निमकहराम आहेत.

**वाजी०**—माझा जीव अगदीं त्रासून गेलो.

**एलिफ०**—बोलायची गोष्ट नव्हे, परवां एका आपल्या कामगारानें गाढवांवरून पैसे धाडले.

**वाजी०**—( जरा चरकतो ) गाढवांवरून? पहा खचित ठाऊक नाहीं. सांगा नांव. त्याचें चांगलें पारपत्य करतों. पैसे कुठें चालले होते?

**एलिफ०**—( मनाशीं ) जसे काय ठाऊकच नसतील याला. ( उघड ) कुणीकडे ह्मणजे त्रिंबकजी डेंगळ्याकडे, असें तो कुंभार पुष्कळ मारहाण केल्यावर कबूल आला. नंतर मीं ऐवज लगेच आणवून, मोजवून ठेविला. दीड दीड हजाराचे असे सात तोडे आहेत. ते ( नारोपंताकडे वळून ) नारोपंत, न्या हां.

**वाजी०**—पहा कसे हरामखोर आहेत. माझ्या नांवाला काळिमा आणावयाचा यत्न करावयाचा. मी एवढा जाहिरनामा लावला, तरी हे दुष्ट लोक असा माझा दावा साधतात. तो कुंभार काय ह्मणाला?

**एलिफ०**—तो ऐवज काय? मला वसईकर बाळाजीपंतानें दिला असें कुंभार कबूल आला. तो कार-

कून तर आपलाच. हुकूम ह्मणून नांव घेतो.

**बाजी॰**—लुच्चे हो लुच्चे सगळे. नारोपंत, ते तोडे यांनां देऊन टाका.

**एलिफ॰**—एवढ्यासाठींच ह्मणतों कीं, कारभार आमच्या हवालीं करा. आह्मी साफ पेंढार मोडून काढतों. त्रिंबकजीला धरतों आणि आमचे सहा आणे घेऊन दहा आणे बिनबोभाट आपल्या खजिन्यांत आणून भरतों.

**बाजी॰**—मी तरी त्याच विचारांत आहें. पण एवढी खटपट कशाला करितां ? आह्मी आपल्याला घरबसल्या मुंबईला सहा आणे आणून देतों. आपली छावणीही पण उठवून मुंबईला न्यावी. आमच्याकडून अंतर झाल्यास मग ह्मणतां तसें करूं.

**एलिफ॰**—अहो, मग तर हे बाराभाई अगदीं आपल्याला डोक्यावर घेतील. आह्मी रात्रंदिवस आपल्याजवळ आहों तर एवढे, मग नसल्यावर काय ? आपल्याला ही वेडी सल्ला दिली तरी कोणीं ? अन्याबा रहातेकरानें ? परवां आपला दरबार वैशाखांत भरला होता, तेव्हां कोणी सांगितलें कीं काय ? बहुधा गोविंदरावांनीसें दिसतें. महाराज पहा बरें किती भोळे, आणि हे पहा

किती लुच्चे ते ! कोण कोण तरी होते ?

**बाजी०**—( मनाशीं ) एकूण दरबाराची गोष्ट देखील याला कळली अं:. ती गाढवाची गोष्ट कळली व हीही. काय लेकाचें कर्णपिशाच याला साह्य आहे कीं काय समजत नाहीं. आतां कशाला चोरा ? हा कांहीं तितका वाईट नाहीं. ( उघड ) परवां दरबारांत ( इतक्यांत गहेनाजी बाजीरावांच्या धोतराचा पदर जरा ओढतो. बाजीराव मागें पहातात पण डोळे मोठे करतात. हा पदर सोडतो ) पुष्कळ जण होते. बापू, गोविंदराव, खरशेटजी वगैरे पुष्कळ मंडळी होती.

**एलिफ०**—बापूंचें मत बहुतकरून सहा आणे देण्याचें नसेल. मोठा शूर सरदार आहे खरा. त्याला पाहिलें ह्मणजे मला समाधान वाटतें.

**बाजी०**—साहेब अगदीं यथार्थ बोलले. तो पुरुष ह्मणाला, मला दोन लढाया करायाला सांगा पण पै देण्याची गोष्ट कांहीं बोलूं नका.

**एलिफ०**—काय जबर छाती ! शूर असावा तर असा. बरें, काळे काय ह्मणाले ?

**गहे०**—( पुनः पदर ओढतो व बाजीरावास दाबतो— मनाशीं ) काय करावें अशा बेहिमती धन्याला ? साहेब फुगवीत चालले व हे हरभऱ्याच्या झाडावर

चढत चालले. आतां यांनां काय ह्मणावें ? इतका वेळ बापू गोखल्याबद्दल सांगितलें, त्यास आह्मी भीत नाहीं. बापूंच्या हाताखालीं आज कसं झालं तरी लाख पन्नास हजार माणूस आहे. त्यांच्या केंसासही साहेबाच्या बापाच्यानें हात लाववत नाहीं; परंतु हीं गरीब बापडीं मात्र चिरडतील. असो. ( पुनः जोरानें धोतर ओढतो. त्या बरोबर महाराज रागावतात. )

**बाजी०**—कायरे ए गहेनाजी, हें काय आहे ?

**गहे०**—सरकार, पदराच्या शेवटाला झुरळ दिसलें ह्मणून झाडायला पाहिलें.

**बाजी०**—झुरळ ? ( तट्कन् उठतो व धोतर फेंकून देतो ) झुरळ, अरे कुठें ? ( कान झाडतो. )

**गहे०**—( धोतर बाहेरून झटकून आणतो. ) गेलें तें झटकल्यावर महाराज.

**बाजी०**—काळे फार कांहीं ह्मणाले नाहींत. कारभार आपण करूं, व इंग्रजांस घरबसल्या मुंबईत ६ आणे पावते करूं.

**एल्फ०**—यावर खरशेटजीनें कांहीं शक्कल काढली ?

**बाजी०**—छेः तो कांहीं फार बोलला नाहीं. बोलला काय हो नारोपंत ?

**नारो०**—मी तेव्हां तेथें नव्हतों. पर्वतीच्या दर्शनाला गेलों होतों.

**गहे०**—( मनाशीं ) कारकुनाच्या शतांश धन्याला अक्कल नाहीं.

**बाजी०**—तो ह्मणाला, गोविंदरावाच्या ह्मणण्या-प्रमाणें चाला. इतक्यांत मीही साहेबाची बद-ली करून आणवितों.

**गहे०**—( मनाशीं ) आतां काय डोंबल सांगायचं उरलं ? पण ही वर्दी तरी ताबडतोब दोघांस मिळाली पाहिजे. ( खिशेचांचपतो हां, हें जायफळच माझें काम करील. ( अंगरख्याचा बंद तोडतो व कोणाच्या नकळत बांधून शिपायापाशीं देतो ) जा गोविंदराव बावांनां ह्मणावें, खरशेटजीला बोलावून घ्या जा. ' ( चुटकी बाजवितो शिपाई जातो. )

**एल्फि०**—काय हा माझी बदली करणार ? आणि तो मुंबईला पोहोंचविणार ? पहा महाराज, लोक कसे लबाड असतात. होळकराचा एवढा दंगा झाला, तेव्हां आमचें सरकार साह्यास नसतें तर कसें झालें असतें ? हें पक्कें ध्यानांत ठेवा कीं, इंग्रज लोकांसारखे शूर जीवासजीव देणारे दुसरे लोक नाहींत.

बाजी०—पण मी कुठें नाहीं ह्मणतों ? ते काय ह्मणाले तें सांगितलें.

एलिफ०—त्रिंबकजीच्या बद्दल आपल्याकडे कांहीं वर्दी आली आहे काय ?

बाजी०—छे हो, माझा तुह्मी अंत पाहतां काय ? मी बक्षीस देखील लावलें. परवां त्याचे साथी नाना काळू यांनां देखील पकडण्यास हुकुम दिला, पण आपल्याला शंका येते. नशीब आमचें ! ( खिन्न होतात. )

एलिफ०—आपण श्रमी होऊं नये. सहज विचारिलें. अरे, जा यांच्याकडे तोडे पावते करून द्या.

बाजी०—नको, नको, नको. ते आह्मी आपल्या स्वतासः इनाम दिले आहेत. बरें, बसा येतों (सर्व जातात व साहेब त्यांनां पोहोंचवितो. )

एलिफ०—( मनाशीं ) आमचा वकील खरशेटजी आमच्या विरूद्ध बेत करतो याला ठाणें दाखविलें पाहिजे. गोविंदरावालाही हैदराबादचा दरबार अन्योपायांनीं दाखविला पाहिजे. राजा मात्र अन्याक खरा. असो आतां जबान पाठवून खरशेटजीला तांगडला पाहिजे. व काळ्यांनांही बोलवावें. बरें आहे पाहूं विचार याचा. ( जातो. )

---

## प्रवेश चवथा.

**स्थळ**—बारामती. वेशीचा रस्ता.

( दोघे भुई व दोन गृहस्थ येतात. )

**पहि०**—पाटील, तुह्मी चांगली चौकशी करा. मला यांचा संशय येतो.

**दुस०**—काय रे गडेहो, तुह्मी ईश्वर स्मरून सांगा. बाबा जेव्हां मेण्यांत बसायला आले तेव्हां कसे होते ?

**पहि० भुई**—न्हाइ ह्माराज अमाह्मी ठावं न्हाइ. पुन्यापुन आमी सायबा संगातीच खरं. पन् त्यासनी काइ झालं न्हवतं. बसायला आल तवा मातर बोलल्ये कीं, मेना अदीमदी कुटे टिवु नका, पुन बारामतीलाच बेगीबेगीदिनी न्ह्या. तवा बगा ह्माराज आमी आठ आसामी भुई रातबेरात करुनशिनी ईस बाईस कोस भुई चालत आलोया. त्याचं आमाला काई द्यायचं सोडूनश्यानं उलटा अमासनीच दंड व्हय पाटिलदादा ?

**दुसरा भुई**—पगा दादा, आमी जर वाटेच चोर असतो, तर बाबांच्या गादीखालीं आपल्याला तोडा कसा गवसला असता ? आमी वाटमंदीच तोडा घेऊनश्यानी जातो तर तुमासनी काय ठावं पडतं ?

**पाटी०**—पहा रामभटजी, तुमच्याच सांगण्यावरून

केवळ यांस शिक्षा करितां येत नाहीं. दुसरें असें कीं, जर खरोखरीच दुष्टाव्यानें यांनीं जीव घेतला ह्मणावें, तर रुपये मोहोरांचा तोडा उशाशीं तसाच आहे. यास्तव यांनां शिक्षा काय ह्मणून करावी ?

**राम०**—पण मग मेले कशानें ह्मणावें बोवा ! आंगांत अंगरखा तसाच आहे, डोक्याला शाल गुंडाळली आहे, पायांत पायजमा आहे, जसें काय कोणी ह्मणेल कीं, झोंपच लागली आहे. मग आतां पत्ता कसा लागावा ? ( विवंचनेंत पडतो. ) अरे, तुह्मी कोणी त्यांनां कण्हतांना ऐकिलें काय ?

**पाहि०भुई**—जी व्हय. पुन् मेना थोपवूनशेनं इचारताच हातानंच खून केली कीं, वेगीवेगी चालूंद्या. मंग आमी झपाट्यानं निंगालों पगादादा, आन चालन्याच्या नादामंदी अमास्नी ह्मोरं काय झालं तें ठावं न्हाइ.

**राम०**—अरे, धडपडले खडबडले कांहीं नाहीं ऐकलें ?

**पाटील**—अहो भटजी, तें तें काय ? त्यांनां एवढा तर्क कुठला ? असें असतें तर पहिल्यानेंच जेव्हां यांनां मेणा जलद जलद चालवायाला खूण केली, तेव्हांच थोपवून धरिते व वाटेंत कोठेंतरी जेजुरीकडे वगैरे रहाते तर चालतें. असो आतां.

( इतक्यांत एक मुलगा येतो. )

**मुल०**—अहो रामभटजी, अहो रामभटजी, "दादा ह्म-णाला जाऊंद्या भुयांला. त्यांच्याकडे अपराध नाहीं.

**राम०**—का रे बुवा ! असें काय झालें ?

**मुलगा**—बात्रांच्या उशाशीं तोडा होता तो तर तुह्मी पाहिलांतच.

**दोघे**—( माना डोलवितात ) त्यांत कांहीं चिठ्ठीच-पाटी नव्हती. मग ?

**मुलगा**—मग मेण्यांतून प्रेत खालीं काढलें, सर्व लोक जमून आंगांतील अंगरखा वगैरे काढूं लागले, तों शरीरांतून कांहीं निघेना. मग फाडून काढावा लागला अखेरीस.

**राम०**—बरें काय रे चिंतू, खिशांत कांहीं होतें कायरे ?

**चिंतू**—छे; एक चष्मा, एक जायफळ व त्याला बांध-लेला एक बंद एवढें होतें. दुसरें कांहीं नव्हतें.

**चिंतू**—मग पायांतला पायजमा काढूं लागलों, तों सटकन् निघाला. तेव्हां आंत पंचा असून कमरे-ला एक हमेणी होती.

**राम०**—काय ह्मणतोस हमेणी होती ? आणि त्यांत काय मोहोराच का होत्या ?

**चिंतू**—होय. थोडे होन होते, सात आंगठ्या होत्या, एक जोडवें होतें, चार हिरे सत्रंध होते, एक मात्र अर्धा फोडलेलासा दिसत होता. त्यावरून दादा-

चा अंदाज असा आहे कीं, बाबांनीं त्यांतलाच एकादा हिरा घेतला असावा. तेव्हां यांनां सोडून द्या व आपण नदीवर चलूं या.

**पाटील**—बरें आहे बाबानो, जा तुमच्याकडे कांहीं दोष नाहीं. ( ते दोघे भुई जातात. ) बरें, कांहो रामभटजी, बाबांनां अगदीं हिरकणी खाण्याचा प्रसंग कां आला ?

**राम०**—अहो, या बाजीरावाच्या राज्यांत कशाचा नेम नाहीं. पहिल्यानें पंधरा दिवसांपूर्वीं पत्र आलें होतें त्यांत लिहिलें होतें कीं, बाजीराव साहेबांनीं दिवाणगिरी पतकरितां का ह्मणून विचारलेलें आहे. पण बुद्धि अशास्वत ह्मणून रुकार देववत नाहीं, लौकरच घरीं येतों, मग सर्वत्रांचे विचारें काय करणें तें पाहूं. तें हें पुढें ओढवून ठेवलें होतें. चला आतां नदीवर जाऊं या. तूं पंच्या घेतला आहेस रे चिंतू ?

**चिंतू**—होय भटजी चला लवकर. ( चालूं लागतात व पड्याकडे पाहून ) भटजी हें हो काय ? ह्या पहा बायका पाण्याच्या घागरी टाकून तशाच पळत आल्या !

**राम०**—( पड्याकडे पाहून ) अरे खरेंच. अगे ए चिटके, लंवडीचे पळतीस कां ? ( पड्याकडे कान

करून ) काय ? अं: काय ह्मणतेस ? धरणें आलें आहे ? कुणाचें? बोल सटवे बोल, कुणाचें ? पेंढाऱ्यांचें ? तुला कशावरून समजलें ? काय ? काय, लोक ह्मणतात ? अग गाढवे, लोक ह्मणतात ह्मणून तूं आपली घागर टाकून धूम पळत आलीस. घागर गेली ह्मणजे बसशील रडत. ( तोंड वळवून ) काय पाटीलबुवा सुटलें आहे हें खरें काय ?

**पाटी०**—पेंढार सुटलें आहे हें खरें. पण पेशवे सरकारच्या राज्याला उपद्रव नाहीं त्याचा. पण त्यांचा काय नेम ? खरें असलें तर चावडीवर जाऊन सर्वांनां हुशार करतों. तुमच्या मागोमाग येतों. ( जरा वळतो व दचकतो ) अरे इच्या. हे दोघे गांवांत देखील आले ! आतां हो रामभटजी ?

**राम०**—आतां काय, येऊंद्या त्यांनां. आधीं ते पेंढारीच आहेत कशावरून ? मी ते आले ह्मणजे गोड बोलून विचारतों पहा.

( दोघे इंग्रजी पलटणींतले शिपाई येतात. )

**एक शि०**—ये, तुमारा पटेलका मकान कहां है ?

**राम०**—( लवून ) सलाम जमादार, आपल्याला काय पाहिजे महाराज ? या ठिकाणीं हरजिन्नस मिळतो. आज बारामती शहरांत शेहेर, खेड्यांत

खेडें आहे. घोड्याला चंदी वैरणही पुष्कळ आहे.

दुसरा शि०—ये तो दिवाना अदमी है. अरे साब, तुमसे कुच चंदीबिंदी नहि मंगते है, लेकिन तुमारी जो चावडी है तो हम्कु बतलाव. गांवका कोइ पटेल है ?

राम०—हां, हां. (मान डोलवितो) हो, हो. पाटील आहे तर काय ? पण तो परसाकडला गेला आहे. तुह्मांला काय पाहिजे.

पहि० शि०—क्या ? वो क्या कहता है ?

दुस० शि०—कहते के, वो हाजतको गया.

पहि० शि०—अब् क्या करना ? मऱ्हाटी जबानमे पूच्छो.

दुस० शि—०अहो, तुह्मालां गोविंदराव काळ्यांचें घर माहित आहे काय ? ( तिघे एकमेकांच्या तोंडाकडे पाहतात. ) बोला, तुह्मांला त्यांचें घर ठाऊक आहे काय ?

राम०—बरें झालें जमादार, आपल्याला मराठी बोली येते तो. आपल्याला गोविंदरावाचें घर कशास पाहिजे ? तिकडे काय काम आहे ?

दुस०—अहो, आधीं कुठें आहे तें सांगा ह्मणजे आह्मी तिकडे जातों.

**चिंतू**—( भटजीच्या कानांत ) भटजी, हे लुटायलाच आले हो आले. आतां?

**राम०**—( कानांत ) चिंतू, तूं घरीं धांवत जाऊन आंतून कड्या अडसर लावून घे. ओटीवर कोनाड्यांत माझी संवळी पडली आहे, ती आंतल्या खोलींत उतरंडीच्याखालीं डेऱ्यांत घालून ठेव.

**चिंतू**—( हळूच ) जाऊं तर?

**राम०**—थांब. ( उघड ) अहो, तुह्माला काळ्याच्या इथें कोणाकडे काम आहे?

**दुस०**—खुद्द त्यांच्याकडे. त्यांची भेट झाली ह्मणजे झालें.

**पाटील**—आतां त्यांची भेट या लोकीं होणार नाहीं.

**दुस०**—ह्मणजे?

**राम०**—ह्मणजे ते वारले. त्यांचें शव नदीवर गेलें देखील. आह्मीही तिकडेसच चाललों आहों.

**दुस०**—अरे, रे, रे!! केव्हां? अहो काल संध्याकाळीं अलिपन्स्टन साहेबानें सांगितलें कीं, काळ्यांनां बोलावून आणा. तेव्हां आह्मी त्यांच्या बिऱ्हाडीं शोध केला. तेव्हां समजलें कीं, ते तिसऱ्या प्रहरींच निघून बारामतीला गेले. आणि तुह्मी आतां सांगतां ते वारले. खरें तरी कसें

घाटावें ? साब, ( पहिल्या शिपायाकडे वळून ) ये कहते है, वो मरगया जहरके.

**पहि०**—अये खुदा तुनें मुझपर कितना गजब किया है. अगर पारशी मोदी जिंदा पकडा जाता तो बेहेत्तर होता. लेकिन् वोभी नहिं हुवा. और अब् येभी जेहर खाकर मरगया. अब् साहिब मुझपर खफा होगा. लेकिन् खरशेटजीको और कालियाको साहेबोंके और दौलतमन्तका गुफ्तगो किस् तऱ्हासे जाहिर हुवा. हमेंभी मालुम नहीं. ये बडी अज्जबकी बात है. अच्छा चलो भाई.

**दुस०**—जातों तर मग महाराज. साहेबांचा हुकूम त्यास धरून आणणेविषयींचा होता. परंतु तो निष्फळ झाला. आझी मघांशीं नदीवर प्रेत पाहिलें तें त्यांचेंच. बरें येतों. चला जमादार. ( दोघे शिपाई जातात.)

**चिंतू**—गेली एकदांची पीडा.

**पाटील**—सुंठी वांचून खोकला गेला. आतां वेशी पाशीं वेसकराला सांगतों कीं, धरणें आलेलें गेलें. पुन्हा कोणीं घाबरूं नये मग मी नदीवर येईन. ( जातो. )

**राम०**—लंवडीचा मी होतों ह्मणून या पाटलाची

डाळ शिजली. नाहीं तर यांनां धोतरांत * * झालें असतें. असो. आतां साहेबानें घरणें कां पाठविलें याचा शोध लवकरच लागेल. चलरे चल, पाय उचल चिंत्या. ( सर्व जातात.)

## दुसरा अंक समाप्त.



## अंक तिसरा.

### प्रवेश—पहिला.

**स्थळ**–पर्वतीचा वाडा.

( दसऱ्याचा दरबार. )

**बाजीराव**—बापू, संपूर्ण लोक आले आहेत काय ?

**बापू०**—बहुतकरून झाडून सर्व लहान थोर मंडळी आली आहे वाटतें. अक्कलकोटवाले राजे फत्तेसिंग भोसले, निंबाळकर, जाधवराव, घोरपडे, निपाणकर, पटवर्धन मंडळ, राजे बहादर, भोइटे, पुरंदरे, वगैरे सरंजामी, विंचूरकर आदिकरून सगळे आले आहेत. यांखेरीज नाना, तुह्माला कसें वाटतें ? कोणी यावयाचे राहिले आहेत काय ?

**मोरदी०**—होय सरकार, सर्व मंडळी आली आहे.

**बाजी०**—तर मग बापू, काल रात्रीं ठरलेला निश्चय सर्वांना कळवा. दरबारास उद्देशून आपल्याला बोलायाचें आहे तें बोला.

**बापू०**—जी सरकार, आज्ञेप्रमाणें. ( पेशव्यास वंदन करतो ) समस्त राजे, मांडलिक, सरदार, संस्था-

निक, दरकदार, एकांडे, गैरसाळ, बारगीर, शेट सावकार, पंडित, शास्त्री, शूर, वीर, दौलतीचे खांबहो, सांप्रत आपण सीमोल्लंघन करावयास आज सुमुहूर्तानें एकत्र जाहलों आहों ही त्या जगन्निवास परमेशाची अपार कृपाच आहे. मागच्या ह्या प्रसंगीं त्रिंबकजी डेंगळे, चिंतोपंत देशमुख, गोविंदराव काळे व सदाशिव माणकेश्वर अशी एकापेक्षां एक धुरंधर राज्यकार्य तत्पर मंडळी होती. परंतु दैवें त्यांस आजचा प्रसंग पाहवयास ठेवलें नांहीं. ( सगळे उसासा टाकतात ) भगवदिच्छा ! काळाची गति अशीच विलक्षण आहे. क्षणानें काय होईल याचा नियम नाहीं. यास्तव सर्वांनीं त्या एक भगवंताचें स्मरण केलें पाहिजे. तोच प्रभु सर्व संकटांतून पार पाडून नेण्यास समर्थ आहे.

अस्तु, ‘ गतं न शोचे ’ या न्यायाला अनुसरून पाठीमागील दुःखविमोचनच सर्वांनीं केलें पाहिजे. कारण, सांप्रत जो प्रसंग आपल्या या मराठी राज्यावर येऊन गुदरला आहे तो सर्वांना दिसतच आहे. यामुळें श्रीमंतांच्या जिवाला सुद्धां क्षणभर चैन पडत नाहीं. आपली ही पंजरस्थशुकाप्रमाणें पारतंत्र्य स्थिति राहणार तरी किती दिवस ? पूर्ववत् काशीपासून रामेश्वरपर्यंत यशाचे

डंके कधीं वाजतील याविषयीं रात्रंदिवस त्यांस मोठा घोर लागला आहे. यास्तव सरकारांनीं हें चित्तांत आणून माझ्या स्वाधीन कोट रुपये केले. त्याचे मी अरब, रोहिले, पठाण व सिद्दी असे भले मस्त मस्त रांगडे, हिंदुस्थानी पुरभय्ये, गोसावी असे उमदा उमदा मनुष्य गोळा केले आहेत. व त्यांस हमेष कवाईतही चालविली आहे. आतां आपण ह्मणाल, एवढें सैन्य कशासाठीं ? तर ऐका. नुकताच जो तह श्रीमंतांपासून सही करून घेतला त्याची शाई कांहीं वाळली नाहीं. त्यांतलीं मुख्यमुख्य कलमें मी तुह्मांस सांगतों. "इतउत्तर राव पंडित प्रधान यांनीं नामदार आनरेबाल ईस्तइंदिया कुंपिनी सरकारच्या आज्ञेबाहेर कोणाही संस्थानिकाशीं छत्रपतीचे मुख्य पेशवे या नात्यानें पत्रव्यवहार करूं नये. कोणच्याही दरबारीं वकील धाडूं नयेत व आपल्या दरबारीं इतरांचे घेऊं नयेत. दक्षिणेस तुंगभद्रा व उत्तरेस नर्मदा यांच्या मधील मुलुखावर काय तें, पेशवे यांचें स्वामित्व. अहमदाबाद, भडोच वगैरे कडला खटला ४॥ लाखांत तोडावा. गायकवाडाकडून ४ लाखांत फेड करून घ्यावी. अहमदनगरची सोडचिठी द्यावी." अशीं पुष्कळ क-

लमें त्यांत आहेत तीं कोठवर वर्णावीं ? सारांश दर कामांत आह्मांला साहेबाची मखलाशी पाहिजे. कोठें स्वारी शिकारीला निघायचें झालें तर परवाना साहेबाचा. वाड्यांत कोणी पाव्हणा आला तर त्याची वर्दी आधीं बेटावर गेली पाहिजे. हे मर्द हो, अशी शोचनीय स्थिति होण्यास कारण कोण ? तर आपणच बरें काय ! ! आपसांत फाटाफूट असल्यानें कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं सारखा झाला. चाकर धन्याला गुरकावूं लागले, बायका आह्मांलाच धुडकावूं लागल्या. इतक्या सगळ्या गोष्टींनीं आपलें हें तारूं कोणीकडे तरी भडकलें आहे. तेव्हां मोठ्या वादळांत सांपडून याचा आज नाहीं उद्यां चुराडा होणारच. तर इतक्यांतच दैवाचा नांगर टाकून पाहूंया. व मी जी आस्थापूर्वक भिक्षा मागतों ती सर्वजण मिळून द्या. ( पदर पसरितो. )

**सर्व**—आह्मी देऊं देऊं.

**बापू०**—पहा, मला भारी जोखमीचें काम सांगावयाचें आहे. व तें एकदां ऐकिलें कीं, ब्रह्मास्त्रासारखें पाठीमागें चिकटून राहील. यावज्जीव तुह्मांला सोडणार नाहीं. यास्तव ज्याची मर्जी नसेल त्यानें आधींच स्पष्ट सांगावें कीं, तुह्मी जें सांगणार

तें ऐकण्याची आमची बिलकुल इच्छा नाहीं. ह्मणजे हें माझें बोलणें मीं आंखडलें.

**सर्व**—नका, नका, सांगा, सर्व सांगा.

**बापू०**—हें पहा, आपल्या राज्याची शत्रूंनीं अगदीं दैना उडवून दिली. व वाघासारखे तुह्मी सांपळ्यांत कोंडून गेलां आहां हें तर तुह्मी पहात आहां, नाहीं काय? तुह्मांला वाटत नाहीं काय कीं, पंचाक्षऱ्याच्या अभिमंत्रणानें महान् सर्प जसा त्रस्त होऊन जातो तशी अवस्था झाली. नाहीं? मोठ्या कर्दमांत धेनु जशी गुंतून जावी, तसेंच येथें झालें नाहीं काय? नसलें तर उघड सांगा, आतां भीड धरूं नका, श्रीमंतांपुढें कसें बोलावें ह्मणून लाजूं नका. तुमच्या कोणाच्या बालाग्रास जर धक्का लागला तर त्याचा जामीनदार मी आहें. बोला, हा मी थांबतों. ( कांहीं वेळ थांबतो ) यावरून मी ह्मणतों हें सर्व खरें आहे, तर पुढें सांगणार आहें तो प्रसंग याहून कठीण आहे.

**सर्व**—असूंद्या. सांगा.

**बापू**—बरें तर; तुमच्या नशीबीं ऐकावयाचें व माझ्या नशीबीं सांगावयाचें असेंच विधीनें लिहिलें असल्यास तें कांहीं टळत नाहीं. वीरहो ऐका. "या महाराष्ट्रजन्म–भूमातेचें, या हिंदुपदबादशाहीचें,

या श्रीमत्सकलजगोत्सर्ग—संगोपन—संहननादिकर्त्या श्रीपार्वतीशाचें, या रायगड प्रतिष्ठित संपूर्ण म्लेंच्छ यवननिर्दलनदक्ष जो ब्राह्मण प्रतिपालकाग्रणी त्या श्रीमच्छिवरायाचें, ज्या शुभदायक कुलांत तुह्मी उत्पन्न झालां त्याचें, ज्या जननीची कुशी शोभिवंत केलीत तिचें व ज्या शुद्ध व निर्मल कुलांत जन्मून जलतर्पणें करून उद्धार कारितां त्या पितरांचें आणि काळासही वांकविणारे हे माझे प्रतापी बांधव हो, त्या स्वतः तुमचें ब्रीद राखावयाचा वेळ हाच आला आहे. सिंहगडावर सरदार तानाजी पहिल्याच गफलतींत ठार झाल्यानंतर त्यांचे बंधु सूर्याजी यांनीं आमच्या राज्याचे मूलाधार-स्तंभभूत जे मावळे व हेटकरी यांनां जो थोडा उपदेश केला कीं, "दोर तर कापून टाकिला व पुढें हीं बाप आजांचीं प्रेतें पडलीं आहेत, व तुह्मी जर धीर सोडून पळून जाल, तर महार म्लेंच्छ हे तुमचीं प्रेतें ओढून फेंकून देतील त्याची लाज धरा." महाराज, हें ह्मणण्याचा अवकाश, तों तीनशें साडेतीनशेंच किं हो मावळ्यांनीं 'हरहर महादेव' गर्जून सात हजार रजपूत व मुसलमान कापून काढिला. काय त्यांची छाती! ती त्यांच्या वंशजांत आज आपणांत नसावी काय?

असावी; तर व्हा तयार. हें विड्याचें ताट तुमच्यां समोर ठेवलें आहे. आजवर तुह्मी ज्यांचें अन्न खाल्लें, ज्यांच्या नांवावर विकलेत, ( पेशव्याकडे बोट करून ) ज्याचे वंशाचा अभिमान बाळगिलात, ज्या गादीला पूज्य मानलीत, त्या ह्या प्रभुचरणास स्मरून स्वामिकार्यार्थ कोठेंही प्राण जावो अथवा राहो ह्मणून मनाचा धडा करून एक एक विडा उचला. विलंब कशाला लावता? भगवान् अर्जुनास ह्मणालेच आहेत 'हतोवा प्राप्स्यसि स्वर्गं, जित्वा वा भोक्ष्यसे महीं' तसे तुह्मींही युद्धाचे ठाईं समरभूमीवर पतन पावले असतां स्वर्गीं अक्षय्य सुख पावाल. व येथें यशस्वी झालेत तर पृथ्वी तुमचीच आहे. महाराज केवळ शेर अच्छेर पिठाचे मालक आहेत. तितक्यांतून मर्जीस नसलें तर नका बापडें. परंतु हें पक्कें लक्ष्यांत बागवा कीं, 'अंतवंत इमे देहा:' हे देह, अर्थात् ही शरीरें आज नाहीं कधीं तरी लयास ह्मणून जावयाचींच. कारण असा अमरपट्टा कोण घेऊन आला आहे? 'जातंहि ध्रुवं मृत्युः। ध्रुवं जन्म मृतस्यच।' ज्याला जन्म त्याला मृत्यु हा ठेवलाच आहे. विचार कसला करता? आपला निश्चय विडे घेण्याचा झाला ह्मणजे पुढील कर्तव्य काय तें

सांगतों. उठा नारोपंत पाहतां काय ? तुह्मी आरंभ केल्यावांचून कोण करील ? रूपरामजी, तुमची कट्यार बाहेर पडण्याचा प्रसंग हाच आहे. काय मोहनगीरबोवा, आंतां स्वस्थ कां ?

**मोर दी०**—मीच आधीं उचलतों ह्मणजे झालें. मी ह्मातारा आहें. ( उठतो व ताटांतील विडा उचलतो इतक्यांत पागोट्याचा पदर सुटून एक दोन पट्या गळ्यांत येतात. )

**बापू०**—अहो, ह्मातारे काय आणि तरणे काय. युद्धीं सर्व समान आहेत. अहो नाना, पदर सुटला आहे. पागोटें गळ्यांत येईल.

**मोर दी०**—आतां सगळेंच गळ्यांत आलें आहे. मग त्यांत पागोट्याची विशेष मातबरी काय ? ( बसतो. )

**वापू०**—ऐका. नानांचा हात प्रथम ताटाला लागला आहे तर हेच आपले सेनापती भीष्म. उद्यांपासून सगळ्या फौजा यांच्या हुकुमांत चालावयाच्या. वस्त्रें मात्र आज्ञेप्रमाणें. ( बाजीरावाकडे वळून. )

**बाजी०**—बरें आहे. तुमच्या समस्तांच्या विचाराबाहेर मी नाहीं. खाजगीवाले, यांस पोषाक, कंठी, शिरपेंच, कट्यार आणा.

**बापू०**—कां आतां ? आरंभ झाला. पाहिजेल त्यानें

उचलावें. (सगळे पाळीपाळीनें उठून विडे उचलितात. त्यांत निपाणकर, पटवर्धन व विंचुरकर यांच्या हातांतून पडतात व ते पुनः घेतात.) झालें? सगळ्यानीं घेतले? आतां ऐका. पेंढाऱ्यांवर जाण्यासाठीं ह्मणून वाह्यात्कारी तयारी आहे हें आपणां सर्वांस माहित आहेच. तशीच आवई अखेर पर्यंत ठेवायाची. ह्मणजे आपण काय करतों याचा मागमूस कोणास लागूं नये. आजच्यासाठीं शहराबाहेर डेरे, राहुट्या दिल्याच आहेत. आजचा हा साडेतीन मुहूर्तांतला एक मुहूर्त आहे. तेव्हां आतां निराळें प्रस्थान ठेवण्याची गरज नाहीं व एकदां तिकडे गेल्यावर मागें यावयाचें नाहीं. इंग्रजांकडील कोणीही विचारलें, तर पेंढार मोडण्यास जातों ह्मणून सांगावें. व पुढल्या वद्यांतल्या एकादशीस एकदम सर्वांनीं छापा घालून येथचा इंग्रज पार करावा. तसेंच शिंदे, होळकर, गायकवाड, यांसही पत्रें गेलीं आहेत. नागपुरास ही सेनाखासखेल आप्पासाहेब भोंसले यांसही त्याच दिवशीं इंग्रजावर चालून घ्यावयाला सांगितलें आहे. त्याप्रमाणें त्यांनीं व आह्मी तेथचा व येथचा इंग्रज मोडून अशीरीच्या मुक्कामावर फौजा एकत्र करून हिंदुस्थानांतून चोहोंकडून दामटीत

नेऊन समुद्रपार हांकून देऊं. धुळपांला ही आरमाराची कडेकोट तयारी ठेवण्याविषयीं हुकूम गेले आहेत. याखेरीज आणखी काय तजविजी केल्या आहेत त्या नाना सांगतील.

**मोरदी०**—मला सांगावयाचें ह्मणून कांहीं नाहीं इतकेंच कीं, कापदापोलीचा पोटसाहेब याजकडे आपली पलटणें शिकावयाला ठेवलीं आहेत, तीं आणण्याची तजवीज केली आहे. खुद्द साहेबास टोपी घालावयाचा पुष्कळ यत्न केला. पण तो ह्मणतो एल्फिस्टन व आपण एका बादशाहाची रयत, तेव्हां त्यावर चालून कसें जावें ? परंतु त्याचेंही ह्मणणें अजून गुळमुळीत आहे. 'द्रव्येन सर्वेवशाः' हीच कायती मख्खी.

**बाजी०**—मग लागेल तितका पैका घेऊन जायाला तुह्मांला नको कोणीं ह्मटलें आहे ?

**मोरदी०**—ठीक आहे तर मग. तिकडल्या व येथच्या फौजेंत फितूर एवढा केला आहे कीं, ते ह्मणतात उद्यां लढाई सुरू होऊंद्या. आह्मी येऊन तुह्मांला मिळूं. आणि पहिल्या लढाईला जरी उभे राहिलों तरी तुमच्या डोक्यावरून गोळ्या सोडूं. सहाव्या पलटणींतला शेख हुस्सेन जमादार मोठा लढवय्या आहे. दहा हजार रुपये मागतो. त्या

चाही निकाल लावतों. आतां दारुगोळा मात्र मुबलक पाहिजे.

**गणपतरावपानशे**---माझ्यापाशीं दारूगोळा, बाण गोटा इतका तय्यार आहे कीं, लाख फौज तीन वर्षं झुझत असली तरी हटणार नाहीं.

**बापू०**---झालें तर मग. याप्रमाणें सगळी सिद्धता आहे. अझूनही कोणाच्या मनांत कांहीं शंका असतील तर विचारा अगर स्पष्ट बोला.

**आप्पा०**---इतका वेळ तुमचें सगळ्यांचें बोलणें झालें. आतां बापू वरचेवर खोंचून बोलतात कीं, कोणाला कांहीं शंका असल्यास विचाराव्या. शंका आमच्या मनांत पुष्कळ आहेत. आह्मी सरकारच्या अन्नाचे तेव्हां आह्मांस विरुद्ध बोलतां येत नाहीं. परंतु इंग्रज सर्वस्वी मोडून काढण्याचें माझे चित्तास येत नाहीं. काय हो गणेशपंत सहस्त्रबुद्धे, तुह्मी पटवर्धनांचे कारभारी आहां, तुमच्या ध्यानाला कसें येतें ?

**गणेश०**---( मनाशीं ) हा बाजीराव इंग्रज मोडूं पाहतो पण याच्या वडिलाला तरी ते बधतील काय ? यानें पहिल्यानें सगळ्या पटवर्धनांच्या जहागिरीचा आपस्वार्थ करण्याचें मनांत आणिलें व आतां त्यांची मदत मागतो. आपल्याला काय होहो,

करावयाचे धनी. ( उघड ) मलाही असें वाटतें कीं, ते शूर असून न्यायी आहेत. आणि अगदीं अन्यायाऽसहिष्णु आहेत.

**आप्पा०**—उद्यां जर शिंदे मस्त झाले, अगर होळकर जर अमीरशाही करूं लागले, अथवा सातारच्या महाराजांनीं उठून बंड केलें, किंवा नबाब भागानगरचे चालून आले, तर आयत्या वेळेस उपयोगी पडतील असे एक इंग्रजच आहेत. माझें ह्मणणें खोटें असलें तर बोला.

**बाजी०**--बापू, देसायांचेंही बोलणें खरें दिसतें. नाहीं विठ्ठलराव विंचूरकर?

**विठ्ठल०**—( मनाशीं ) इथं पारख आणि अक्कल असेल तर? जिकडे वारा वाहील तिकडे पाठ करावयाचे. मी हजारों प्रमाणांनीं खातरी करून दिली कीं, हा आप्पा फितूर आहे. तरी अझून महाराजांची संशयनिवृत्ति होत नाहीं. माझ्या सैन्यांतही फितूर! मला वाटतें लढाई करून फायदा नाहीं. असो, जसें नशिबीं असेल तसें होईल. ( उघड ) कांहीं यांचेंही खरें आहे कांहीं त्यांचेंही खरें आहे. बापूंचा आवेश पाहिला ह्मणजे वाटतें जय आपला होईल. पण इंग्रजांचे कवाइतीचे पंचवीस लोक व आपले चारशें पुरे पडणार नाहींत.

**बापू**—असो. मला तरी हेंच पाहिजे होतें. असें पहिल्यानें कां नाहीं बोललेत? आप्पा ह्मणतात शिंदे मदोन्मत्त होतील, बरें झाले तरी ते आपलेच आहेत. होळकराचा सख्खा भाऊ महाराजांच्या नजरचुकीनें मेला, तर त्याबद्दल शिद्यावर त्याचा दांत होता, गादीवर कांहीं वांक नव्हता. परंतु सगळ्यांनीं हुत् हुत् करून त्यांत खंडेरावरास्ते व त्यांचे कारभारी बाळाजीपंत नातु यांनीं बाबासाहेबांनां इंग्रजाकडे नेलें. हें पहा खुद्द होळकराकडील पत्र. (खिशांतून कागद काढितो) मजकूर तेवढाच वाचतों ऐका. "गादीचे चाकर आह्मी. जसा हुकूम होईल तसें चालूं. येथें मालकम व हिस्लाप यांचा पेंच भारी आहे, तरी दहा हजार स्वारांची मांड देऊन रामदीन परदेशी पाठविला आहे." याखेरीज काय पाहिजे? (पत्र खिशांत घालतो) तिसरें छत्रपति महाराजांविषयीं अप्पांनीं अगदीं अप्रगल्भ उद्गार काढिला! ते सर्व राज्याचे खाविंद, त्यांचे सर्व आह्मी अंकित; श्रीमंत शाहुमहाराज काय बोलले? "वंशाचा मान राखून कामकाज तुह्मी पाहणें." त्याअन्वयें हा कारभार येथें चालत आहे. विंचूरकर कवाइतीची प्रौढी सांगतात. बरें, मी आपल्या मारुतीला टांच मारून निघालों ह्मणजे तुमच्या कवाइतीच्या दहा फळ्या

फोडतों कीं नाहीं पहा. इतक्या उपर तुह्मी सगळे विचारवान व अक्कलवंत आहांत त्यापक्षीं आह्मीच मतिहीन. तुह्मांस उपमर्द सहन होतो, आह्मांस होत नाहीं. अशाच भागूबाईपणामुळें ही दशा आली. व पुढें याहूनही बिकट येईल. असो, समजला दम कोठवर आहे तो. सरकार, मला कर्नाटकांत जहागिरीवर जाण्यास हुकूम व्हावा. अथवा मला ब्राह्मणाला जहागीर तरी कशाला पाहिजे ? मी काशीसच जातों.

**सर्व**—( गडबड करितात.)

**मोह॰**—कांहीं नाहीं बापूसाहेब. लढाई द्यावयाची. माझ्या नंग्या पलटणी अशा आहेत कीं, काळाच्याही थोबाडींत मारतील.

**नारोपक्षी**—बापूसाहेब, लढाईच व्हावी.

**सर्व**—होऊंद्या, लढाई होऊंद्या. आह्मी मागें घेत नाहीं.

**बाजी॰**—बरें आहे. सर्वांच्या मर्जीबाहेर मी नाहीं.

( इतक्यांत शिपाई येतो व नौबती वाजतात. )

**शिपाई**—सरकार, खालीं हत्ती तयार आहे. शिलंगणाला यावयाचेंना ?

**बाजी॰**—हो, चला सर्वजण. ( सगळे उठून अदबी अदबीनें चालतात. ) ( सर्व जातात. )

## प्रवेश दुसरा.

**स्थळ**—पर्वती-गच्ची.

(दोन हुजरे व एक गडी येतो.)

**पहि०हुज०**—राम्या, चांगला गालिचा आणून हंतर. असा मळका कशाला? (गडी बिछायत टाकतो व दोघे दुर्बिणी घेऊन पाहतात. )

**दुस०हुज०**—गड्या, ह्या दुर्बिनींतून साफ दिसतें. (बघतो) वाः काय मजेशीर हो देखावा! दोहीं कडल्या तोफा मांडल्या. आतां पहा आपलें सैन्य मुंग्यांच्या हारीवानी पसरत चाललं. तिकडे साहेबाचीही लालभडक फौज टेकडी घेरून आहे. पहारे पहा इस्तामा.

**विश्राम**—फारच मौज दिसते. पहा ग्यानबा, आपले स्वार मैदानांत आले. पन सांग तुला त्यांचीं तोंडें कशीं दिसतात तीं?

**ग्यान०**—झोंकदार नाहीं दिसत. कारे, अगदीं फिकट कशानं दिसतात?

**विश्राम**—दुसरी एक गोष्ट तुझ्या लक्ष्यांत आली?

**ग्यान०**—ती काय?

**विश्राम**—सर्वांच्या फेट्यांचे खोवायाचे समले सुटले आहेत.

**ग्यान०**—गड्या, आतां लडाई सुरू झालीच ह्मनून स-

मज. हा पहा आपल्या कडला नगारा अरे, अरे, (दुर्बीणींत पहातच) ते पहा नाना मराठे आले, बापूगोखलेही आले. (इतक्यांत बाजीराव व बरोबर रामचंद्रपंत सुभेदार येतात, त्यांस पाहून हे दोघे हुजरे चपापतात.)

बाजी०—कायरे, लढाई सुरू झाली काय ग्यानबा?

ग्यान०—नाहीं सरकार, वखत् आहे. नाना, बापू वगैरे मंडळी शहराबाहेर पडली.

बाजी०—बरें आहे. तुह्मीं खाली पहाऱ्याचा बंदोबस्त ठेवा. विश्राम, तूं दारावर बैस. (इतक्यांत धडाधड तोफांचे बार होतात.) झाली वाटतें सुरू. कोठें आहेरे दुर्बीण? आणा इकडे. (दुर्बीण घेऊन पाहतात) हो, हो, हो, हो! केवढा धूर झाला हो रामचंद्रपंत! आपल्या इकडल्याच तोफा सप्पाटून सुटताहेत.

रामचंद्र—(दुसरी दुर्बीण लावून) पहा महाराज, हा कडाखा सगळा आपल्या महांकाळीचा. ती परवांच पुरंदराहून येथें आणली नाहीं का? पहावें सरकार, पानशांची कोण घाई उडाली आहे! एकसारखे घोड्यावरून इकडून तिकडे दौडत आहेत.

बाजी०—पानशे गणपतराव मोठा दिमतीचा माणूस खरा. माझ्या मनांत त्याच्याही सरंजामाचा अपहार

करावयाचा आला होता. पण त्यानें जेंव्हां एकजात त्याचे कुळांतले लढाईंत मेलेले यांच्या बायका माझ्यापुढें उभ्या केल्या, तेंव्हां मी विरलों, आणि त्याला धक्का लावला नाहीं. त्याचें हें फळ. तो फार झटतो.

**रामचंद्र**—असेच महाराजांनीं सगळे सरदार राखले असते तर असा प्रसंग येतांना. (दुर्बिणींतून पहातो) इंग्रजाच्याही तोफा सुरू झाल्या. पहा महाराज, तीनच तोफा आहेत पण काम काय मोठ्या कुशलतेनें चालविलें आहे. एक गोळा देतो, दुसरा कुचतो, तिसरा बत्ती देतो. असें झट् झट् काम होत आहे. यामुळें अखंड तोफ सुरूच आहे. तसें आपल्या कडे नाहीं. एकदम साऱ्यांचे बार होतात, नाहीं तर मध्यें पाव घटिका घटिका कांहींच नाहीं. पुनः धडाका, पुनः कांहीं नाहीं.

**बाजी०**—डाव्या बाजूच्या आपल्या तोफा मुळींच बंद पडल्या वाटतें. पहा बरें पहा.

**राम०**—खरेंच. नारायणराव बक्षींच्या पुढला तोफखाना अगदींच लटपटला! अरेरेरे! हे गोलंदाज लोक कपाळावर हात मारून घेत आहेत. काय बरें झालें? (जरा पाय उंच करितो) काय बरें? महाराज दारूचे बोधच्या बोध ओतून टाकूं लागले,

व कोणी त्यांस बत्तीही देत आहेत. छें: पेट-तच नाहीं. सरदली वाटतें दारू. काय चमत्कार हा !

**वाजी०**—पानशे कुठें दिसताहेत तुह्मांला? पहा बरें पहा.

**राम०**—(वांकून पहातो) नाहीं सरकार ते कुठें दिसत नाहींत. अं-हो-हो-ते-ते पहा. (बोटानें दाखवितो) त्या आंब्याच्या झाडाखालीं खालीं मान घालून उभे आहेत. जवळ त्यांची जर्दी घोडी पडली आहे. मला वाटतें तिला गोळी लागली असावी.

**वाजी०**—त्यांची घोडी मोठी चांगली होती.

**राम०**—पण त्यांनीं आपलें तोंड शेल्यानें झांकलें आहे. कां हें दारूचें काम फसलें ह्मणून कीं काय? पहावे आपटे पुढें सरले. तोफा मागें ओढल्या. बापूंनींही मधून घोडे पिटाळले.

**वाजी०**—त्यांच्याही तोफा झाल्या? ऐकूं येत नाहींत त्या?

**राम०**—होय सरकार, हे घोडेस्वार अंगावर येतात पाहून त्यांनीं ही आपल्या तोफा मागें घेतल्या. व आपलें पलटण पुढें घातलें. पोट साहेब वगैरे मंडळी तिकडेसच जाऊन मिळाली. आतां दोघांची

अगदीं झटापट लागली वाटतें. बापुगोखल्यांनीं येरवड्याची टेकडी आटोपलीशी दिसते. तो पहा जरीपटका किंचित् चमकत आहे. (बारीक डोळे करून) ते पहा; गोसावी ही चालले मोर्च्या चढवींत. (पडद्यांत हर हर महादेव, दीन दीन, व सेंट जॉन् अशा आरोळ्या व धडाधड बंदुकांचे बार होतात, खण् खण् तरवारी ऐकूं येतात.) अगदीं झोंबले वाटतें एकमेकाला. आतां ढगही आले व तिनसांजा ही झाली. आतां दिसणार नाहीं. (दुर्बिणी खालीं ठेवतात.)

**बाजी०**—मला मोठी चिंता पडली आहे. पहा रामचंद्रपंत, एक एक बार निघाला ह्मणजे जीव धस्स होतो. उगीच लढाई हवी कशाला? मी जाऊन भेटतों अल्पिन्ष्टनाला आणि सांगतों कीं, वृथा रक्तपात करण्याचें कारण काय? (इतक्यांत शिपाई येतो.)

**शिपा०**—सरकार, बेटावरून शिपाई आला आहे.

**बाजी०**—त्याला घेऊन ये. (तो जाऊन आणतो.)

**राम०**—कोणाकडून आलास? काय काम आहे?

**शिपा०**—मी बेटावरून साहेबाकडून आलों आहे. साहेब ह्मणतात, एवढा फिसाद होण्याचें काय कारण? आणि तुमचें आमचें कधीं भांडण झालें

नाहीं, तेव्हां आपलें सैन्य माघारें न्यावें. आह्मीं आपलें सैन्य मागें घेतों.

**वाजी०**—बरें आहे. विश्रामा, खालीं जाऊन देवढीवरून जवान धाड कीं, बापूला ह्मणावें मागें या. ( जी ह्मणून तो जातो. )

**राम०**—थांबावें सरकार. इतकी उतावळी करूं नये. ( कानांत ) हा निरोप्या खरा कशावरून ? मी तपासतों बघा ( शिपायाकडे पाहून ) तुझें नांव काय ?

**शिपा०**—महादू रामजी.

**राम०**—तूं कुठें राहतोस ?

**शिपा०**—येरवड्यास.

**राम०**—तूं आलास तेव्हां साहेब काय करीत होते ?

**शिपा०**—निजले होते.

**राम०**—निजले होते ?

**शिपा०**—नाहीं. लिहीत होते.

**राम०**—मग तुझ्यापाशीं चिठ्ठी नाहीं दिली ती ?

**शिपा०**—ते लढाईवर गेले होते.

**राम०**—मग तुला कोणीं पाठविलें ? खरें सांग नाहीं तर ठार करतों. ( तरवार उपसतो. )

**शिपा०**—एं, एं, मला म-ला-भिवा जमादारानें सांगितलें.

**वाजी०**—अरे, अरे, मी निरोप उगीच पाठविला.

परंतु तो गेला नसेल अझून. विश्राम, विश्राम, जवान पाठविलास काय ?

**विश्रा०**—होय सरकार.

**बाजी०**—मग आतां धाड दुसरा. 'नको नको' ह्मणावें. लवकर.

**राम०**—अरे गुलामा, तुला शिक्षा पाहिजे. (ह्मणून त्याला घेऊन जातो, परत एकटा येतो.)

**बाजी०**—त्याला काय मारायला सांगितलें काय ? साहेब रागावेल हो.

**राम०**—आतां साहेबाच्या बापाचें आपण काय लागतों. बापू आज फत्ते केल्याशिवाय सोडीत नाहींत.

**बाजी०**—ब्राह्मणाच्या तोंडांत साखर पडो. पहा रामचंद्रपंत, या लढाईंत फत्ते झाली तर लक्ष ब्राह्मण भोजन चुट्टी चुम्र्याचें घालीन. जेजुरीच्या खंडोबाला टाक सोन्याचा देईन. पंढरपुरच्या तिन्ही वाऱ्या करीन. आषाढी, कार्तिकी आणि चैत्री. माझें मन अगदीं भांबावून गेलें आहे. (इतक्यांत शिपाई येतो.)

**शिपा०**—बापू साहेबांकडून सरकार विसाजी मानाजी आले आहेत.

**बाजी०**—बापूकडलें मनुष्य आलें कीं तावडतोब आणीत जा. आणूं काय ह्मणून काय विचारतोस ?

(तो घेऊन येतो. ) या विसाजीराव लढाईची काय खबर आहे ?

**विसा०**—सरकार, बापू ह्मणाले अझून रणाची खबर बरी आहे.

**बाजी०**—अरे विसाजी, इत्थंभूत हकीगत सांग. नाना, आपटे, पानशे, रूपराम हे खुशाल आहेतना ?

**विसा०**—बापूंनीं असें सांगितलें कीं, आपल्या चरणाच्या कृपेनें सर्व शरीरेंकरून खुशाल आहेत.

**बाजी०**—असें संदिग्ध बोलूं नकोस. आह्मांला सगळें वर्तमान सांग.

**विसा०**—(लवून मुजरा करतो ) मला जसें बापू ह्मणाले तसें सांगतों. ते ह्मणाले "आज रविवार ह्मणून कापांत देवाची प्रार्थना करून सगळीं लाल डगलीं तिसरा प्रहरां येरवड्यावर जमा झालीं. जरणाल इसमिटही आला. हजार, दीड हजार टोपीवाला व ३।४ हजार आपला लोक होता. प्रथमतः आमच्या व त्यांच्या तोफा सुरू झाल्या, परंतु कांहीं वेळानें आपल्या तोफा मुळींच उडेनातशा झाल्या. तेव्हां मी व पानशांनीं दारू आणून तपासली. ती सगळी बाजरी काळी मिचकट केलेली पाहून पानशांनीं ऊर बडवून घेतला. व रागानें

भिव्याजमादारानें एवढा घात केला असें जाणून त्यास धरणें पाठविलें; तो फरारी झाला.

**राम०**—तरीचरे तरीच तोफा बंद झाल्या. आणि आतां रांडलेकानें साहेबाकडला ह्मणून मनुष्य इकडे पाठविला. त्याची चांगली लेंव्र झाली असेल. बरें पुढें.

**विसा०**—पुढें मी, आपटे व दीक्षित तिघेही सरसावून गेलों. गोळ्यांची मोठी फैर झाली. उजव्या बाजूनें मोहनगिरानें गोसाव्यांची नंगी पळटण दहादां अलिपन्स्टनवर नेली; पण एकदां इंग्रजांची फैर झडली कीं, पांखरांसारखे पटा पटा मरत. अगदीं हंतरूण झालें. मग मींच त्यास नको ह्मणून सांगितलें. बक्षी आपले गैरसाळ घेऊन डाव्या अंगानें चढून गेले. पण साहेबांच्या बंदुकीनें टिपला नाहीं असा एक नाहीं. आणि पोट साहेबाच्या पळटणीवर नाना दीक्षित चालून गेले; पण एकाच गोळी सरसे निजले!

**बाजी० व राम०**—अरेरेरे रे! नाना पडले आं; चुः चुः चुः!

**राम०**—आणि ते पांडोबा नाईक?

**विसा०**—तेही पडले. एका बापूच्या मारुती घोड्याला

अकरा गोळ्या लागल्या. व बापूही इंग्रजांनां हट-वीत हटवीत चालले आहेत.

**बाजी०**--साहेबाकडे गहेनाजी पहिल्यानें धाडला होता तो भेटला काय तुह्माला ?

**विसा०**—होय. विंचुरकराची फौज इंग्रजाच्याजवळ फरा धरून उभी होती. एल्फिन्स्टन मेण्यांतून जवळून गेला. पण कोणी बार काढला नाहीं. तेव्हां हा रागानें स्वतःच मेण्यावर घोडा उडवीत गेला; व दोन तीन हात त्यानें मेण्यावरच केले. इतक्यांत तलवार मोडली ह्मणून उलटला, तों त्यांच्या पैकीं एकानें भाला मारला तो यांच्या डाव्या कोंपराला बराच लागला. मग आह्मीं त्याला घरीं पोहोंचवून दिला.

**बाजी०**—नाना मेले ही मोठी वाईट गोष्ट झाली. (इतक्यांत पडद्यांत "मोर दीक्षित पडले, नारायण राव बक्षी मेले, पेशव्यांची फौज उधळली इंग्रज आले. धांवा धांवा दुकानें बंद करा. बापू गो-खले देखील धरून नेले" ह्मणून एकच हलकल्होळ उडतो) रामचंद्रपंत, पहा खालीं जाऊन. मी जातों दिव्याच्या घाटानें सासवडावरून माहुलीला. बापूनां ह्मणावें या. त्यांनां धरून नेलें ह्मणतात खरें कायहो ? तरी माझा धीर नाहीं होत. तुह्मीं च-

ला; मी जातों. विश्रामा, दोन तीनशें मशाली पेटवा. चला आतां. (सर्व जातात.)

---

## प्रवेश--तिसरा.

**स्थळ**--पर्वतीचा वाडा.

( कोंकणा कारभारी येतो. )

**कार०**—(मनाशीं) काय करावें ? सगळीच धांदल ! ज्या कोणास हाक मारावी तो 'ओ' देखील ह्मणत नाहीं. अर्धं मुर्धं सामान तर रवाना झालें. अर्धं व्हावयाचें आहे. सगळे झटून कामाला हात लावतील तर शफत्. त्यांना वाटतें आतांच आमचें राज्य गेलें. बारगीर लोक काल 'जी' 'जी'करून तोंडें एं एं करीत होते. ते आतां कोणीकडेसच नाहींसे झाले. अरे गुलामा हो, इतक्यांत आटपलें ? थांबा बच्च्यानों, उद्यां तुमचा समाचार घेतों. अगदीं हड्डी नरम करून सोडतों परती. पण लेकांनां ह्मटलें ह्मणजे आतांच्यावेळ बाकरा दम धरा, तर गधडीचे चालते झाले मज विचारल्या वांचून ! (इकडे तिकडे फिरतो) श्रीमंताचा अ-अगदींच आपला अधीरी स्वभाव. इतक्यांत पळून जायास झालें

काय ? पण पुढें बोलेल कोण ? सामान सुमान राहूं द्या परतें, धाडीन उदईक ह्मणालों ; तों मजवरच डोळा एवढा एवढा केला. जामदारखान्यांतील कांहीं संदुक उंटावर लादून नेले. कांहीं तसेच उघडे पडले आहेत. कांहीं बासनें आहेत कांहीं बासनें नाहींत. राम शिवा गोविंदा ! त्याची कांहीं मोजदाद पाहिजे कीं नको ? तीही नाहीं. थोरल्या वहिनीसाहेब आपल्या दागिन्यांच्या पेट्या पहावयास आल्या तों पेट्या नाहींत ! अरे, आतांच्या आतां दिवसा ढवळ्या चावडीवर दरवड्या सारखें झालें. मी जरा इकडे वळलों कीं, चाकर धांवले सणंगाकडे. गुलामांनीं पैठण्या, शालू सर्व नाहींसे केले. ( पडद्याकडे तोंड करितो ) हा पहा, चिम्या अगदीं लेकाचा वेड्या सारखा दिसत होता. तो पहा झराझर पाऊल टाकून रस्ता पहातो आहे. बरें आहे. खालीं देवढीवरतीं शिपाई असतील, त्यांस सांगतों कीं, या मादरचोदाच्या मुसक्या आंवळा. ( डोकावून पहातो ) छेः देवढीवर आहे कोण ? घड्याळावर नाहीं व देवढीवर नाहीं. बरें, आपण तरी जरब देऊन पहावी. ( पडद्याकडे पाहून ) चिम्या, अरे चिम्या, गाढवा, इकडे ये. ऐकतो

कशास आतां? (मोठ्यानें) अरे इकडे ये रांडलेका. पाहिलेन एकदाचें. न पाहून सांगतो कुणास? (हातानें खुणावितो) ये, रे, ये. पैठण्या टाकूं नकोस. काय पहा लुच्चा. एवढा भारा होता तो सगळा टाकलान. बरें ये.

(चिम्या अंगावरील पैठणी फरफटत आणतो.)

**चिम्या**—जी काई काम हाय ऱ्हय? मला इवायाच्या हथं जायचें हायना?

**कार०**—लुच्चा, तुला कोठें जायाचें आहे? आणि पैठणी कशास घेतलीस?

**चिम्या**—बाहेर लोळत्याती ह्मनूनश्यानी पेटाऱ्यांत टिवायला ऱ्हेत व्हतो तों जामदारखान्यांत कुट्ट गवसना. मग बाहेरच्या कोठीमंदी मोटा संदुक हाय त्यांत टिवतों पगा दादा. तुमचं काय काम हाय?

**कार०**—पहा कसा लुच्चा आहे! सदरेवरच्या कोठींत ठेवायचें ह्मणतोस आणि मागल्या दाराकडे धूम धांव घेतोस. अरे, बाबासाहेब जाऊन घटका झाली नाहीं, तों इतका गोंधळ? गुलामा, तुझे कान उपटून हातांत देईन. जाः पुरे तुझा शहाणपणा.

**चिम्या**—दादा, हीं सनंगं काइ सरकारची नव्हत. पहा. (उघडतो) हा शेला मला सरकारांनीं जात

वक्ती दिला. आन् बोललं कीं आपुन् पंडरीला जातों. आन ही पैटनी पगा ताइसाहेबांनीं माझ्या बायकोला दिलीया.

कार०—( हंसतो ) अरे गाढवा, इतक्यांतल्या इतक्यांत तूं खोटें बोलतोस ? कांहीं नाहीं. तुझें थोतांड आहे सगळें. जा हरामखोरा, फार बयादी लावूं नकोस. जा त्या कोपऱ्यांतल्या संदुकांत ठेव. आणि त्याला घट्ट टाळें मारून किल्ल्या माझ्यापाशीं आणून दे.

चिम्या—पुन् माझा सात महिन्याचा पगार द्यायचा हायना ? म्हनूजे पगा दोन इसा, योक धा आन् तेतला योक कमी. म्हून मी आपला शेलान्, पैटनीच घेतली. बाकीच्या समद्यांनीं तसंच केलं. म्हनूनशानी मीं बी केलं.

कार०—पहा, पुनः तिसरीच गोष्ट सांगतोस. तुझा पगारना ? जा, त्याचा हिशेब काय तो उद्यां सांगेन.

चिम्या—उंद्यां, उंद्यां हाय कान हथ ? मला न्हाइ न्हायचं चाकरीवर. मला मुलकाला जायचं हाय.

कार०—( रागावतो ) लुच्चा, गुलामा, तोंड करतोस फार ? थोबाड थोबाड थोबाडीन. त्रेपन्न टिक-

लीचा. अगदीं बावळी मुद्रा होती, पण बराच किरे आहेस ?

**चिम्या**—बगा दादा हां. शिव्या बिव्या देऊं नका. तोंड संभाळून बोला.

**कार०**—( रागावून त्याच्या आंगावर जातो ) अरे, हो, हो. मजच पुनः दरडावितोस ? ( त्याच्या पाठीवर मारतो व तो दूर दूर होतो. इतक्यांत रणवेष धारण केलेले बापू येतात. )

**बापू गोखले**—अरे, अरे आहे काय हें ? गंगाधर पंत, त्याला कां मारतां ? त्यानें काय केलें आहे ? ही वेळ भांडणाची नव्हे. तुह्माला दुसरीं कामें नाहींत वाटतें ?

**गंगा०**—( त्याला सोडतो व तो नजर चुकवून पळून जातो ) कांहीं नाहीं. जिकडे तिकडे चोरापोरी कारखाना झाला, ह्मणून बंदोबस्त करण्यास पहात होतों, तों हा लेकाचा तोंड करूं लागला. ( पहातो ) पहा खरें कीं खोटें ? गेला पार पळून आतां.

**बापू**—जाऊंद्या हो. आभाळ फाटलें आहे, त्याला कोठें ह्मणून ठिगळ द्याल ? बरें, बाबासाहेबांना जाऊन तरी किती वेळ झाला ? मला नि-

रोप आला आणि मी लढाई सोडून इकडे आलों. तों जरा तरी थांबायाचें होतें. कोण घाई ?

**गंगा०**—मीं तरी सरकारास सूचविलें कीं, बापू आल्यावर जावें; परंतु धीर आला नाहीं. ते ह्मणाले, मी दिव्याच्या घाटानें सासवडावरून माहुलीस जातों ह्मणून आपल्यास सांगा.

**बापू**—एकूण स्वारी माहुलीला जाणार ; पण काय हो गंगाधरपंत, तिजोरीच्या किल्ल्या तुमच्यापाशीं आहेत काय ?

**गंगा०**—बापूसाहेब किल्ल्या आहेत पण घेऊन काय करतां ? फार फार तर पन्नास हजार शिलक असेल.

**बापू**—मग बाकीचे ? अहो, तेरवाच्या दिवशीं सतरा लाखाचे तोडे मीं आपल्या हातानें मोहोरबंद करून ठेविले होते. काल साठ लाखांचा ऐवज आणला होता. व परवां तुह्मीच होतेत ना कीं, हुकेरी १२॥ लाख आहेत ह्मणून सांगितलें. आणि आतां ह्मणतां सारे पन्नास हजार !

**गंगा०**—आपण ह्मणतां त्या रकमा खऱ्या. पण मराठे दीक्षितांनीं पोट साहेबाला १० लाख रुपये द्यावयाचे आहेत ह्मणून नेले. पंचवीस लाख त्यांच्या फौजेंतल्या अंमलदारांसाठीं नेले. यशवंत

राव घोरपड्याला ४ लाख दिले. व श्रीमंतांनीं जातांना १९ । २० सांडणी भरून नेल्या.

**बापू**—काय दीक्षीतांचा वेडेपणा पहा. पोट साहे-बाला मरायला रुपये दिले कशाला ? तो फितला नाहीं तो नाहींच पण त्याचें सैन्यही नाहीं.

**गंगा०**—अगदींच नाहीं ?

**बापू०**—आलें तसें थोडें ह्मणून काय आलें ह्मणा-वयाचें ? पण आतां मी आपल्या शिपायांला काय दांत पाडून देऊं ? तोबा तोबा करून घ्यावयाची वेळ आली. आणखी कांहीं सांगितलें आहेका ?

**गंगा०**—बापू आले ह्मणजे मागोमाग लावून द्या.

**बापू**—बरें आहे. संध्येचीं दोन आचमनें टाकतों आणि जातों. परंतु काय हो, आज 'बुवा' पाहिलेत काय ?

**गंगा०**—कोण ? ठाकूरदास बुवा ? ते विष्णूच्या मंदिरांत आहेत.

**बापू**—त्यांचें दर्शन घेऊंया चला. (दोघे चालूं लागतात, पडदा उघडतो, विष्णूचें मंदिर दिसतें. )

**गंगा०**—ते पहा बुवा आहेत व आपले नानाभट अग्निहोत्रीही आहेत. ( जातात व बुवांच्या पायां पडतात. )

**बापू**—महाराज मी अपराधी आहें. मी रणांतून परत आलों. आजवर शत्रूला कधीं पाठ दाखविली नाहीं. परंतु आज प्रसंग आला. असें मात्र नव्हे कीं, मी रणांत हार खाल्ली. काय करूं? बाबा साहेबांचे निरोपावर निरोप कीं, इंग्रज तह करवीत आहेत पुढें पाऊल टाकूं नका. दुसरें दारूगोळा बिलकूलच कामीं पडेना. असली कसली दारू कळेना. मुळीं बारच होईना. ह्मणून लगट करून तलवार चालवीन ह्मणून दोनदां चढाई करून गेलों. त्यांचेंही पुष्कळ मनुष्य जायां झालें. तिसऱ्यानें हल्ला चढविला इतक्यांत निरोपांनीं पिच्छा पुरवला. रण सोडून येणें भाग पडलें. मग काय मोर दीक्षित पडले. मी आलों तशी फौज उधळली. असा प्रकार झाला. बरें इथें येऊन पाहतों तों कोणी एक नाहीं.

**ठाकूर०**—बेटा, कांहीं चिंता नाहीं. परमात्मा पांडुरंग तुझा साह्यकारी आहे. तूं घाबरूं नकोस. जय पराजय हे हातचे मळ आहेत. आतां तुला बाजीरायासारखा धनी मिळाला हा पूर्वजन्मींचा ऋणानुबंध. कारण त्याचें पाप हें तुला नडत आहे. जसा दुष्टबुद्धि दुराचारी दुर्योधन होता. तद्वत् श्रीमंत हे होत व तूं त्याला अमोल रत्न कर्ण

सांपडला आहेस. आतां संसर्गजनित दोष तुला भोगले पाहिजेत. जीवित हें जल बुद्बुद्वत् आहे. तूं स्वामीसेवेंत तत्पर असून स्वराज्याकरितां युद्ध करितोस याबद्दल तुझी कीर्ति अजरामर राहील. तूं आहेस तोंवर मराठी राज्य जात नाहीं हा माझा पूर्ण आशीर्वाद आहे. बाकी हें लक्षांत ठेव कीं, तुमचा हा कौरवपक्ष आहे, व इंग्रजाचा पांडव पक्ष होय. कारण तिकडे नीति आहे. अस्तु. विषाद करण्याचें किमपिही प्रयोजन नाहीं. तूं एकाकी काय करशील ? जें झालें तें ठीकच झालें. आतां सान्निद्ध बोलावितात जा. सडा जाऊं नको. येथें जेवढी मंडळी बरोबर असेल तेवढी घेऊन जा.

**बापू**—आज्ञा प्रमाण. ( पायीं मस्तक ठेवितो. )

**ठाकू०**—पुनरपि तुमची आमची भेट. ( बोट आकाशाकडे करतात ) अस्तु. भगवन्नामचिंतन अक्षय्यीं असो दे. ( पडदा पडतो ).

**बापू**—बरें, येतों तर.

( सर्व जातात. )

## प्रवेश—चवथा.

### स्थळ—वेटावरचा वंगला.

**एलिफ०**—पहा राबर्टसन, या प्रमाणें कालचें मोठें काम तर उरकलेंच. नामदार कंपनीचा दक्षिणेंतील अति मोठा कांटा आज उपटून निघाला. पुणें सोडून पळून गेला हें आपल्या आयतेंच पथ्यावर पडलें. आतां त्याचा पाठपुरावा करण्याच्या आधीं हें शहर पुनः त्याच्या तावडींत न सांपडेल अशी खबरदारी घेतली पाहिजे. बाकी आपल्याला यांच्या सैन्याचा दम समजला आतां. पण पुणें जर कां पुनः कब्जांतून जाईल तर सगळी मसलत फसली ह्मणून समजा. पेशव्याच्या खेरीज इतर सरदार कोणी चालून येईल असें होणार नाहीं; कारण सर्वांस त्यानें डंवचून सोडलें आहे. आणि दरएक थोर मोठ्या कुळाची हुर्मत घेण्याचा त्याचा भारी तडाखा, करितां हे पटवर्धन, विंचुरकर, रास्ते, सगळे लोक विरुद्ध आहेत. झालेल्या गोष्टीबद्दलची हकीगत मुंबईला लिहून धाडलीत? केव्हां?

**राव०**—केव्हांच. रात्रीं मशाली लावून स्वारी पळाली त्या उजेडांतच लिहून ॲडजुटंट टॉमसन यालाच खुद्द धाडलें आहे. व आणखी लोक पाहिजेत ह्मणून लिहिलें आहे.

एलिफ०—तुह्मी टाम्सनला पाठविलें ही चांगली गोष्ट केली. व मदत मागीतली हेंही बरें केलें. असो, आतां जनरल स्मिथ वगैरेंना पाठवितों बाजीरावाच्या पाठीवर. व तुह्मी असा शहर संभाळून.

राव०—मला याची बिलकुल माहिती नाहीं. लोक वगैरे सर्वच अपरिचित. त्याची काळजी आहे.

एलिफ०—त्याची काळजी, तुह्मांला नको. त्याबद्दल मी एकाची सोय करून ठेविली आहे. तो दिला ह्मणजे तुह्मांला काडीइतकें नडणार नाहीं. तो एक अमोल्कि रत्न आहे. बाजीराव गाढव ह्मणून हातचें घालविलें, नाहींतर तो आपल्या पक्षास मिळतांना. तो मोठा स्वधर्माभिमानी आहे. त्याचे आप्त, संबंधी, स्त्रीजन यांला बाजीरावाकडून पीडा पोहोंचली. व बाजीरावाला होळकरी दंग्यानंतर ह्या पुण्याच्या गादीवर स्थापावयाला मूळ तो. तर बाजीरावानें त्याची बिलकुलच दाद घेतली नाहीं. यामुळें चिडून तो माझ्याकडे आला. तरी कधीं अभद्र भाषण नाहीं. व्यसन काय तें त्याला एक अंगवस्त्र आहे. दुसरें कांहीं नाहीं. जरा द्रव्य लोभ आहे. पण दिलेल्यांत तो संतुष्ट असतो. तो ह्मणे, 'मी बाजीरावाला नित्युपदेश करून थकलों.' पण कालच मला ह्मणाला कीं, 'राज्य जावें अशी

आपली इच्छा नव्हती.' आतां बाजीरायानें आपल्या हातानें आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला, त्यामुळें त्याला भारी वाईट वाटत आहे. मी त्याची समजी अनेक प्रकारानें केली. तो जरा भोळा आहे. बाकी दुर्गुण कांहीं नाहीं.

राव०—त्याचें नांव काय ?

एलिफ०—त्याचें नांव बाळाजीपंत. ते पलिकडल्या दिवाणखान्यांत आहेत. त्यांची तुमची गांठ घालून देतों. दुपारपासून तिकडल्या कामाला जा. कोण आहेरे ? जा बाळाजींना इकडे बोलावतों आहें ह्मणून सांग. ( बाळाजी येतो ) या असे बसा. तुह्मी आमचे परम दोस्त. आतां एवढा वेळ संभाळलें, तसें तेवढें राबर्टसन साहेबांना मार्गास लावून द्या ह्मणजे झालें. साहेब नवा आहे. त्याला तसदी पाडूं नका. बरें आहे. राबर्टसन साहेब हे तुह्मांला मग भेटतील.

राव०—बरें आहे. येतों. ( दोघांशीं शेकह्यांड करून जातो. )

एलिफ०—कांहीं नवल विशेष बातमी ? रात्रीं कांहीं गडबड बिडबड झाली काय ?

बाळा०—कांहीं नाहीं. बापूगोखले मात्र गांवांत येऊन, पर्वतीचें दर्शन घेऊन गेले. आपल्या स-

रकास्चा प्रताप उदंड ह्मणून हे दिवस पाहिले. आपलें न्यायी राज्य चिरकाल चालो.

**एलिफ०**—आपल्या सारख्यांनीं योग्य मदत केल्यामुळें हा घाट घडून आला. कंपनी सरकाराला जयाचें वर्तमान लिहून धाडलें आहे, त्यांत तुमच्या बद्दलही लिहिलें आहे. आपल्याला कांहीं गांव वंशपरंपरा इनाम मिळतील. कालच्या लढाईचेंही वर्तमान लिहून ठेवलें आहे. पण त्यांचा दारूगोळा तीन वर्षें पुरण्याचा ह्मणून आवाई त्याचा अगदींच कसा वाजा वाजला ह्मणून मोठें नवल वाटतें! तुह्माला कसें वाटतें? पावसानें एवढी नासाडी झाली? पानशे गडबडा लोळतांना मी पाहिला. तेव्हां तुह्मी मला गडबडीनें ह्मणालेत कीं, हा सगळा खेळ भिवानें केला. तो कसा?

**वाळा०**—तें काय महाराज, साधलें ह्मणून साधलें. व वेळही पथ्यावरच होती ह्मणून सर्व ठीक झालें. कारण पानशांनीं तयारी मोठी घनचक्कर केली होती, कीं चार वर्षें लढाई चालली तरी दारूगोळ्यांचा पुरवठा व्हावा. दारूचे तमाम वोधच्या वोध भरले होते. परंतु दारूखान्याजवळ दाऊदभाई भुसारी व आपाजी रावजी

मोडके या दोघांनीं एक वखार बांधली. • शिवाय भिवा हा जमादार यामुळें त्यांनीं गंवडी मजूर लावून आंतून कोठीला जायाला एक भुयार केलें. मग बाजरीचीं पोतीं वरून दारू घालून वर वर चोंहीकडे ठेवून दिलीं. मग जेव्हां काल लढाईचें तोंड लागलें, तेंव्हां भोत भराभर लढाईच्या जाग्यावर जाऊं लागले. मग पहिले थोडे वार झाले. परंतु पुढें बाजरी वरून दिसायला दारू सारखी होती पण उडेनाशी झाली. आतां ती मंडळी बाहेर बक्षीसाच्या आशेनें बसली आहे. हुकूम होईल तर आंत आणतों.

**एलिफ०**—आणा पाहूं. ( ते तिघे येतात व सलाम करून उभे रहतात ) कोण हो तुह्मी?

**पाहि०**—मी भिवा हवालदार आहें साहेब.

**एलिफ०**—हवालदार कोणाचा? आमचा कीं पेशवे सरकारचा?

**भिवा**—पेशवे सरकारचा हा काळ होतों. आतां आपल्या पायांचा गुलाम आहें.

**एलिफ०**—ठीक आहे. आजपर्यंत आमच्या नोकरींत होतां काय?

**भिवा**—नाहीं. आतां याउप्पर राहण्याचा मानस आहे.

एलिफ०—चिंता नाहीं. असे एकीकडे उभे रहा. दुसरा तूरे कोण ?

दुस०—मी दाउदभाई भुसारी आहें.

एलिफ०— तुमचा धंदा काय आहे ?

दाउ०—मी मूळचा भुसाचा व्यापारी होतों, पुढें धान्य घेऊन तो व्यापार करितों.

एलिफ०—तुमचें दुकान रेसीदेन्सींत होतें किंवा छावणींत होतें ?

दाउ०—नाहीं साब, आमचा व्यापारधंदा सगळा पेशवे सरकारच्या राज्यांत.

एलिफ०—तुह्मी आतां येथें कशासाठीं आलां ?

दाउ०—भिवा जमादारानें सांगितलें कीं, बंगल्यावर चला ह्मणून आलों.

एलिफ०—कशाकरितां ह्मणून विचारूं नये ?

दाउ०—विचारलें. तो ह्मणाला इनामें देणार आहेत ह्मणून.

एलिफ०—इनामें कोणाला ?

दाउ०—ज्यांनीं कालच्या लढाईत बहादुरी केली त्यांनां.

एलिफ०—तुह्मी काय केलें ?

दाउ०—आह्मी महाराज, पहिल्यानें मोदीखान्या

जवळ दुकान घेऊन धान्य आणून भरलें, व तें पुढें युक्तीनें दारूंत मिसळलें.

एलिफ०—वा: शाबास! तिकडे उभे रहा. तिसरे तुह्मी कोण ?

तिस०—माझें नांव अप्पाजी. बापाचें नांव रावजी. व उपनांव मोडके, जात ब्राह्मन.

एलिफ०—ब्राह्मण! ( मान डोलवितो ) आपलें राहण्याचें मूळ ठिकाण कोणतें? व पुढें कोठें होतां ?

आपा०—मूळ ठिकाण व्हय ? तिकडे मोंगलाईत गांडापूर आहे नाहीं ? तकडले आह्मी. शिरिमंत व आमी कोपरगांयीं एके ठिकानीं खेळलेले, बसलेले, उठलेले.

एलिफ०—आपण कोण ? ब्राह्मण ? आपली भाषा अशी कशी ?

आपा०— आमी यजुर्येदी. आमाला गरिबाला काय शुद भाशा घेऊन करायचं हाय? गाडवीचं काय शिकेल हाओं ?

एलिफ०—आतां इकडे कशाला आलां ?

आपा०—आपन विणाम वाटनार ह्मनूण.

एलिफ०—तुह्मी आमची नोकरी काय बजाविलीत ?

आपा०—एवढा शत्रूचा मार वांचिवला.

एलिफ०---शत्रू कोणाचे ?

आपा०---तुमचे आमुचे दोघाचे बी.

एलिफ०---तुमचे कसे ?

आपा०---अहो, अन्याबा रहातेकराला सुव्हेदारी दिली बाजीराय सायबांनीं. आन् म्यां भेटुनशेनं इचारलं तवां काईच उत्तर नाहीं.

एलिफ०---तुह्मीही तिकडे दूर उभे रहा. बाळाजी पंत यांनां काय बक्षीस द्यावें ?

बाळा०---यांनां कडीं, तोडे, शेला, पागोटीं द्यावीं.

एलिफ---तुह्मी चुकतां. मी तुमच्या प्रत्ययास आणून देतों. यांनां दोन तीनच प्रश्न करतों. या असे पुढें. ( ते तिघे समोर येतात ) तुह्मी प्रजा कोणाची ? तुमचा धनी कोण ?

तिघे---आह्मी प्रजा पेशवे सरकारची आमचे धनी बाबासाहेब.

एलिफ०---त्यांनीं तुमचें अकल्याण केलें ?

दोघे---नाहीं.

एलिफ०---जमादार, तुह्मी बोलले नाहींत ? तुमचें काय त्यांनीं वाईट केलें ?

जमा०---मला एकदा छड्या अन्यायानें दिल्या होत्या.

एलिफ०---पण मी पुढें न्याय करून तुह्माला चाकरी वढतीची देवविली कीं नाहीं ?

**जमा०**—देवविली.

**एलिफ०**—पुढें त्यांनीं तुह्माला तोशीस कोणेतरी प्रकारें दिली होती काय ?

**तिघे**—नाहीं.

**एलिफ०**—पण तुह्मी आपल्या राजाचें पुष्कळ नुकसान केलें कीं नाहीं ?

**तिघे**—केलें.

**एलिफ०**—तेंव्हां तुह्मी राजद्रोही झालां ?

**तिघे०**—होय.

**एलिफ०**—बाळाजी, राजद्रोह्यास काय शिक्षा असावी तुमच्या शास्त्राप्रमाणें ?

**वाळा०**—मी शास्त्र पढलों नाहीं. ( मनांत ) साहेब मोठा कठीण झाला.

**एलिफ०**—कोण आहेरे ? शास्त्रीबुवांनां मी बोलावतों आहें ह्मणून सांग. ( पडद्यांत जी ह्मणून शास्त्री येतो शास्त्रीबुवास ) राजद्रोह्यास तुमच्या शास्त्रांत काय शिक्षा आहे ?

**शास्त्री**—शुक्रनीतींत असें सांगितलें आहे कीं:—

स्वभाव दुष्टा नेतान्हि ज्ञात्वा राष्ट्राद्विवासयेत् ॥
द्वीपेनिवासितव्यास्ते बध्वा दुर्गोदरेथवा ॥

अशांनां राष्ट्राच्या बाहेर घालवून द्यावें अगर का-

ळ्या पाण्यावर पाठवावें किंवा बेड्या घालून किल्यावर टाकून द्यावें.

**एलिफ०**—आमच्या कायद्यांत अपराधाच्या मानानें देहांत दंडही सांगितला आहे. हे जे आज आपल्या पुढें अपराधी उभे आहेत, यांनीं निष्कारण पेशव्यांचा घात केला. उद्यां वेळ बनली तर आमचाही घात करावयास चुकणार नाहींत. तेव्हां यांस देहांत शिक्षा अगर काळें पाणी न देतां फारच सौम्य ह्मणजे शास्त्रीबुवा, तुह्मी ह्मणालां तशी बेड्या घालून आजन्म किल्यावर टाकण्याची सजा देतों. शिपाई, यांनां तुरुंगांत न्या. व पुढें बेड्या ठोकून पुरंदरावर टाकून द्या. ( शिपाई येऊन खेंचून, नेतात. ते बाळाजीकडे पाहतात. ) चला बाळाजी, चला शास्त्रीबुवा,

**बाळा०**—( मनांत ) असें आधीं समजतें. तर मग फुशारकीनें आणलेंच नसतें. असो नशीब !

( सर्व जातात. )

## प्रवेश—पांचवा.

### स्थळ–शनिवारचा वाडा.

( एक शिपाई पहारा करीत आहे तों एक साहेब व कांहीं लोक येतात. )

**साहे०**—बाळाजी, सर्व प्रकारचा बंदोबस्त तुमच्या साह्यानें निर्विघ्न पार गेला पाहून फार संतोष होतो. आतां फार भानगडीच्या अशा दुसऱ्या कांहीं गोष्टी राहिल्या नाहींतच.

**बाळा०**—नाहींत साहेब. ( विचार करून ) तीनही वाड्यांत चकत्या पाठविल्याच आहेत. व लगेच बंदोबस्तही करून टाकला. देवालयांत चोरांपोरी सामान जाऊं नये ह्मणून पूजाऱ्यांचे जात मुचलके घेतले आहेत. खेरीज दागिने वगैरे मोजून ठेविले आहेतच. दर चौकीला पहारे बसवून कारकून लावून नीट व्यवस्था झाली आहे. आतां कांहीं राहिलें नाहीं साहेब.

**साहे०**—सर्व झालें. पण पेशव्याचे बाव्हटे काढून नामदार कंपनी सरकारचीं निशाणें कोण लावील याचीच पंचाईत आहे. कारण लोकांनां विनाकारण चेव येण्याचा संभव आहे.

**बाळा०**—त्याला फार पंचाईत करूं नये. नाक्या

नाक्यांनीं स्वार शिबंदी आहेच. तेव्हां कोणी उठून दांडगावा करील ही गोष्ट नाहीं. कायरे भगवान, तूं वाड्यावर व कोतवाल चावडीवर निशाण लावशील ?

**भग०**—नाहीं महाराज. लोक अंगावर आले तर ?

**बाळा०**—अरे, अगदीं भित्रा आहेस. बरें तर. पहिल्यानेंच शनिवारच्या वाड्याला निशाण चढलें ह्मणजे लोकांवर आपोआप वचक बसेल.

**साहेब**—आधीं कोतवाल चावडीकडे येतां कीं वाड्याकडे ?

**बाळा०**—अगोदर वाड्याकडे.

**साहेब**—बरें. बाळाजी, हे दोन शिपाई तुमच्या जवळ देतों. खेरीज नाक्यावर २९ स्वार आहेत. मी जातों बेटावर.

**बाळा०**—बरें आहे. (साहेब जातो व बाळाजी व शिपाई चालूं लागतात. लोक ऐकावयाला जमतात) जमादार, तुह्मी असे उभे रहा आणि हा जाहिरनामा वाचा.

**जमा०**—ऐका हा जाहिरनामा. "तमाम लोकांस जाहिर करण्यांत येतें कीं, राव पंडित प्रधान बाजीराव बाबासाहेब यांनीं नामदार ईस्ट इंडिया कुंपनी सरकार बहादुर यांच्या आश्रयावर आज

दिन पावेतों १९ वर्षें राज्य केलें. आतां वें राज्य कोणत्या प्रकारचें झालें हें सांगण्याची येथें जरूरी नाहीं. परंतु तमाम सरदार संस्थानिक जाहगिरदार यांचीं वतनें, जहागिरी, मुलुख, प्रांत, गड, किल्ले वगैरे अन्यायानें खालसा केलीं, राज्यांत बहुत अनर्थ झाले, पेंढारी, पुंड, पाळेगार, लुटारू वगैरेंनीं घाटमाथा व कोंकणपट्टी यांत प्रळय मांडिला, दिवसां राज्यांत दरोडे पडूं लागले, खून होऊं लागले, लोकांचीं जीवितवित्तें सुरक्षित राहिनासारखीं झालीं, अनाचार बहुत वाढला, याच्या कागाळ्या विलायतेंत नामदार कुंपनी सरकारच्या कानांवर गेल्या. तेव्हां या समस्त गोष्टींचा जाबसाल राव पंडित यांस पुशिला असतां तिकडे दुर्लक्ष्य करून राज्यांत रयतेच्या कल्याणाची अनास्था केली. इतक्यांत त्यांचे सल्यानें ह्मणा, किंवा कोणत्याही कारणांनीं मुक्काम पंढरपुर येथें आमचे कंपनी सरकारचे परम दोस्त सेनाखासखेल गायकवाड सरकार यांचेकडून आमचे मार्फतीनें या पुण्याच्या दरबारांत रा. गंगाधरशास्त्री पटवर्धन दिवाण बहादुर आले होते, त्यांचा घात झाला. तेव्हां त्याची पूर्ण व बारीक चौकशी केल्यानंतर त्रिंबकजी डेंगळे हे मूळ अदावतीला कारण झाले.

ही आगळीक झाली असून पेशवे यांनीं त्याला पाठीशीं घालून ज्या बहादुर कंपनी सरकारांनीं राज्यस्थानीं आणून स्थापिलें त्यांवर परतोन उठले असतां ईश्वराचे कृपेनें असत्पक्षाचा मोड होऊन पंडित प्रधान हे जागा सोडून पळत सुटले आहेत. तेव्हां पुढें दुसऱ्या व्यवस्था होई तों, भीमा आणि नीरा यांच्या मधचा सर्व मुलुख कप्तान हेन्री दंदास रॉबर्टसन साहेब बहादुर यांच्या बंदोबस्ताकडे दिल्हा आहे. त्यांत न्याय मनसुबी निवडणें, जाब जाबसाल लिहिणें, वसूल बाकी गोळा करणें, इत्यादि संपूर्ण कामें त्यांच्यावर सोंपविलीं आहेत. यांत कोणाची तसनस होणार नाहीं. कोणाची जहागीर, सरंजाम आदिकरून यांस तिळप्राय धक्का लागणार नाहीं. लोकांनीं पूर्ववत् चालावें. पेशवे सरकारचें राज्य अभिलाष करण्याची मुदलींच नामदार कुंपिनी सरकारास इच्छा नाहीं. परंतु धनी एकाएकीं शहर, राज्य टाकोन गेले, तेव्हां अनाथांचें पाळण करणें हें कुंपिनी सरकारचें ब्रीद आहे. यास्तव नगरवासी जनहो, भिण्याचें कांहीं कारण नाहीं. 'गेले ते इंग्रज व राहिले ते पेशवे' असेंच सर्वांनीं समजावें; व आजपासून "पंडित प्रधान बाजीरावसाहेब यांची द्वाही व

नामदार आनरावल ईस्त इंदिया कुंपनी॰सरकार यांचा हुकूम" मान्य करीत जावा. मित्ति कार्तिक शु॥ ९ रोज सोमवार शके १७३९ ईश्वर नाम संवत्सर तारी॰६ माहे नोव्हेंबर सन १८१७.

गव्ह॰ ज॰चे हु॰ व॰

(Sd.) MOUNT STUART ELPHINSTONE.

माउंट स्टुअर्ट अल्फिन्स्टन.

**पहि॰ प्रेक्षक**—जाहीरनाम्यांत फार चांगलें सांगितलें आहे.

**दुस॰प्रे॰**—ते ह्मणतात आपल्याला राज्य नको. असें कोण ह्मणणार आहे ?

**तिस॰प्रे॰**—खरेंच. एकून श्रीमंताला पुनः आणून गादीवर वसविणार तर ?

**पहि॰प्रे॰**—पहा. त्यांत देखील ह्मटलें आहे कीं, अनाचारानें राज्य गेलें. धडधडीत लोकांवर जुलूम होत होते. नाहीं काहो ?

**तिस॰प्रे॰**—आह्मांला वाटतें हेच राजे असावे. वेटावरच आपण पाहतों. ते आपला धर्म राखून आहेत. कधीं कोणावर जुलूम ही गोष्ट नाहीं.

**दुस॰प्रे॰**—पण यावरूनच केवळ फसूं नका. बाजीरावसाहेब पुनः येण्याची गोष्टच बोलूं नका.

त्यांनीं जो वृक्ष एकदां उपटला त्याचें पुनः रोपण करितील असें वाटतें तुह्मांला ?

**तिस० प्रे०**—वाटतें बुवा. ( पहिल्यास डंवचतो ) खरें कीं नाहीं हो ?

**पहि० प्रे०**—थांबा, बाळाजीपंत आतां पुढें काय करतात पाहूंया. पहिल्यानें शिपाया शिपायांचीच हुजत झाली. आतां बाळाजीपंत स्वतः जात आहेत.

**दुस० प्रे०**—मरूंद्या त्याला. ( पाहिला व तिसरा याच्या तोंडाकडे पाहतात.)

**पहि० प्रे० तिसरा०**—( दोघे ) असें ह्मणूं नका, पीडा होईल. गप्प रहा.

**बाळा०**—अरे कदीमा, व्यर्थ भांडण कां करतोस ? तुझा दुराग्रह मोठा चमत्कारिक आहे. अरे, तूं कशासाठीं जाऊं देत नाहींस ?

**कदी०**—महाराज, मैने आजतक् शिरिमंत पेशवा का निमक खाया है. उन्का होकम मुझे चाहिये. बाद बेफिकर उपर चढो. क्या तुमारे पास उन्की इजाजत है, अगर नहीं है तो मै किस् तऱ्हासे तुझे जाने दो.

**बाळा०**—अरे वेड्या, सरकार तर पळून गेले. आतां तुझे श्रीमंत पळाले.

कदी०—खबरदार, एक दफा बोला बस्स. जिस् तिसूनें आपना काम संभालना. तुमारा काम फक्त् कलम घसनेका है. और कामसे तुझे मतलब नहीं. ( तरवार उपसतो व दारावर फिरतो ) मेरा काम इस् तल्वारसे है. हमेशा तुम् झूटे लोग ऐसी आफवा उठाते हो. महाराज फुलबागमे है. उनके पास परवानगी लाव्, पीछे अंदर जाव्.

बाळा०—अरे वेड्या, आह्मांला आंत जाऊंदे. हा लेकाचा निशेंत आहे वाटतें.

कदी०—ज्यादा मत् बोलो. (तरवार पडताळतो. सगळे चपापतात. )

बाळा०—अरे, काल लढाई झाली खडकीवर. तुला माहित नाहीं काय ?

कदी०—मुझे सब् मालुम है. ( मानेला हासडा मारतो. )

बाळा०—अरे, तर मग त्या लढाईंत बापू गोखले वगैरे सर्व मंडळी पळून गेली.

कदी०—अब् देखो, तूं यहां ऐसी बक् बक् मत् करो. सरकारकी चिठ्ठी ले आव. हम् किल्ला खाली कर देंगे.

बाळा०—( मनांत )आतां हा असा वळत नाहीं.

यालां घेऊन घेऊन घेतला पाहिजे. ( हळूच ) जारे तुह्मी दूर. खूण करतांक्षणीं या. आजू बाजूला उभे रहा. ( लोक फांकतात व हा फि-रत रहातो. )

**कदी०**—बंमन, तू किस्लीये इदर खडा है ? तमाम लोग आपने आपने कामपर गये है. तुभी क्यंवू नाहिं जाता ? तुने जो साहेब लायाहै उनसे मै नहि डरता. ऐसें हजारों वाक्यें मुझपर गुजरे है. लेकिन् मेरी इस जिंदगीमे मैने कभी शिकस्त नाहि खायीं.

**बाळा०**—वा: ! तसेच तुह्मी शूर वीर आहां. असे प्रसंग पुष्कळ येऊन गेले. नाहीं ? कुठें कुठें आले ?

**कदी०**—ये वक्त अदना बात हैं. दिल्लीमे सिंदिये सरकारके महेलपर मै निगेहे बानथा. उसूवख्त कई लोगनें आफवा उठाईके दरबारमे गुलाम कादरनें शिंदियेका कतल किया. और उस्का लष्कर गा-हबी नेस्तना बूद किया. बाद मुझको ( छाती-वर हात ठेवून ) हजारो अदमी ओसे लढना हुवा. बाद थोडे वखत के श्री महादजी साहेब खुद आये. और जब उन्होने मुझे लढते देखा, वो निहायत राजी हुवे. और सके इवजमे मुझे एक कंठी और एक तोड और ये समशेर बक्षी.

बाळा०—एकून कंठी, तोडा, व तरवार बक्षीस मिळाली अं: ! कोणची तरवार ती ?

कदी०—ये समशेर, ये. (दाखवितो)

बाळा०—पाहूं, या तरवारीवर जास्त काय आहे ? नक्षी ? (हात पुढें करतो)

कदी०—हां देखो, इस समशेरपर कैसी उमदा नक्षी निकाली हुईहै. (बाळाजीच्या हातांत तरवार देतो. बाळाजी ती पहात रहातो व डोळ्यानें आपल्या शिपायाला खुणा करितो. शिपाई येऊन मुसक्या आंवळतात.)

कदी०—हाय ! हाय ! बंमनने मेरा घात किया. (त्याला खेंचून पडद्यांत नेतात.)

पहि० प्रे०—पहा. बाळाजीनें कशी युक्तीनें तरवार काढून घेतली.

दुस० प्रे०—मग त्यांत काय मोठा पराक्रम केला ?

तिस० प्रे०—आपल्याला सूचलें नसतें. (दुसऱ्याला) तुमच्या हाताला काय झालें ?

दुस० प्रे०—काल वरून भाला पडला.

पहि० प्रे०—त्याला काय लावलें आहे का ?

दुस० प्रे०—हो. पट्टी बांधली आहे.

तिस० प्रे०—पहा हो पहा. बाळाजीपंत वर चढले. तें आपलें भगवें निशाण काढून तांबडें लावलें.

दुस० प्रे०—लावलें कुठें ? लावताहेत. ( आपल्या पायांतील जोडा काढून अचुक त्याच्या कानशिलां-वर मारतो. बाळाजी मट्कन् खालीं बसतो. मारणारा पळून जातो इतक्यांत शिपाई धांवत ये-तात. )

पहि० शि०—कायरे झालें दादांनां ? शुद्धि गेली वाटतें.


दुस० शि०—या तमासगिरांपैकीं कोणी जोडा हां-णला. हा पहा जोडा नाल मारलेला आहे.

पहि० शि०—यांनांच पकडा.

दुस० शि०—पण दादांनां आंत घेऊन चला.

( सर्व जातात. )

**तिसरा अंक समाप्त.**



## अंक चवथा.

### प्रवेश—पहिला.

स्थळ—अष्टी.

( बाजीरावसाहेब व त्यांच्या पत्नी वाराणशी बाई येतात. )

**वाराणशी बाई**—राधा गोखली एवढी पोर होऊन महा साध्वी खरी. इकडून एवढं गांवांचं आमिष दाखविणं झालं, पण तिचा निश्चय अणुरेणु तरी ढळला काय? नाहीं तर त्या मेल्या आपल्या उंडारलेल्या त्यांतली एक तरी मेली आली आहे?-

**बाजी०**—आतां तें काढूं नकोस बघ. या दुःख दग्ध अंतःकरणाला डागावर डाग आणखी देऊं नकोस. मनुष्याला अनुभव हा एक वेळ येत असतो. किती ठेंचा लागल्या आहेत ह्मणशील याची सीमाच नाहीं.

**वारा०**—मग आधींच मी न्हतें का आपल्याला सांगत? कीं हें बरं नाहीं हो. कुठली ती मेली बयाक्का, कुठली ती ताईपेठाण, सगळ्या रांडा उनाड मेल्या. आतां कसं काळं करून गेल्या.

**बाजी०**—मला त्याचें पर्यवसान येथवर येईल हें मा-

हित असतें, तर मूळापासूनच सुयंत्र चाललों असतों.

**वारा०**—का ? पुण्यांत गायकवाडाकडून शास्त्री वकील आले. तेव्हां आपल्या कानांवर त्या मेल्या अन्याबा रहातेकरानें त्यांच्याकडे फक्कड पांखरें :—‘ अझून मेले ते शब्द आठवतात ’ आहेत असं जेव्हां ह्मटलं; तेव्हां बुधवारांतून त्यांनां पाहण्याकरितांच मुद्दाम विश्रामबागेंत नाहीं का यायाचं झालं ? तेव्हां सांगा मीं काय बरं ह्मटलं ? कीं, रावणादिकांचं दिखीत कल्याण झालं नाहीं. सगळे यामुळेंच पालथे पडले. ही बरी गोष्ट नव्हे. रावणाचें राज्य का थोडं होतं ? मेलं चौदा चौकड्याचं ! नवग्रह पायऱ्याला घातलेले ! त्याचं सामर्थ्य केवढं बरं असेल ? पण एका सीतेच्या पायांत एवढा गोंधळ झाला. तसंच दुर्योधनाचं राज्य जायाला मूळ कारण सभेंत द्रौपदीची विटंबना. झालं ? नाश रोकडा ठेवलेला. पुनः मी आपल्याला सांगितलं कीं, पंढरपूरच्या यात्रेला शास्त्र्यांनां बरोबर नको. पण यात्रेला जायचं तिथं मेलं हें लचांड कशाला हवं होतं ? पण मेला तो त्रिंबकजी पडलाना शनीसारखा छळणुकीला ! दुपारींच

नाहीं लिमयांच्या. वाड्यांत दिवाणखान्यांत मेला 'असा घाट केला आहे तसा घाट केला आहे' असें नाहीं ह्मणाला ? तेव्हां मी नाहीं आपल्याला सांगितलं ? कीं, हें कांहीं वरं लक्षण नाहीं. पण माझं मेलं वटकीचं कोण ऐकतो ? लगेच उठून खासगीवाल्यांच्या वाड्यांत चालतं व्हायचं. आतां कांहीं त्याची आठवण आहे ?

**बाजी०**—मला आतां तें फारसें आठवत नाहीं. पण तूं मला ह्मणालीस, कीं शास्त्र्यांचीं बायकापोरं मी पुण्याला नेईन. त्यांना आमच्या स्वाधीन करणार नाहीं.

**वारा०**—का ? मी आणखी नाहीं का सांगितलं ? कीं, तीर्थाच्या ठिकाणीं अशी गोष्ट बरी नव्हे. ढुप्पट पाप आहे. पण माझं गरिबाचं कोण ऐकतो ? त्रिंबकजी काय तो गळ्यांतला ताईत. प्रक्षाळपूजा व्हावयाच्या आधीं गुलामानें भर प्रदक्षिणेच्या वाटेवर मारेकरी घालून तुकडे तुकडे केले. आणि एक अवाक्षरही इकडून बोलणं झालं नाहीं ! मेले मराठभाई. निसंतान होवो मेल्यांचं (बोटें मोडते.) पहा राज्याची कशी दैना उडाली !

बाजी०—हें बग. तूं त्या बिचाऱ्या त्रिंबकजीला कां बरें शिव्या देतेस ? होणार तशी गति झाली.

वारा०—हो, होणार ? सगळे पोक्त, शाहणे कारभारी घरीं बसविले, आणि हे डेंगळे, फिंगळे आणले. जो पहावा सरदार त्याचा आपला सरंजाम जप्त ! त्यांचा अपराध काय ? तर ह्मणाले वाड्यांत त्यांनीं आपल्या बायका पाठविल्या नाहींत ! पाठिवतील कशाला ? त्यानीं काय आपली लाज वेशीवर बांधली आहे ? हे मेले सोरटभैरव अक्षयीं भोवतालीं घिरट्या घालणार. दिवस नाहीं, रात्र नाहीं, वेळ नाहीं, काळ नाहीं ! या मेल्यांचीं संगतिच जर जडतीना तर बरं होतं. पण तसं कुंठ व्हायचं ? कोंपरगांवीं बेटांत कचेश्वराच्या दर्शनाला स्वाऱ्या निघाल्या ह्मणजे आधीं त्या त्रिंबकजीला शोधून आणा. विष्णूचं देऊळ मेलं टीचभर आहे. तिथंच तासनतास या गलिच्छ लोकांबरोबर गोष्टी करीत बसायचं. ह्मणतात कीं, सासूबाई कधीं बोलल्या नाहींत. मामंजीचीही इकडे बहाल मर्जी. ( बाजीरावाकडे बोट करून ) कारण फार नवस सायासानं व्हायाचं. तेव्हांच ही संगमनेरी मंडळी तोडली असती, तर आज असा भयंकर प्रसंग गुजरताचना. वा-

सोटयाहून आई राणीसाहेब आणल्या आहेत. त्यांनां कधीं उन्ह नाहीं ठाऊक, तहान नाहीं ठाऊक ! त्या पळण्याखालीं बेदम झाल्या आहेत. त्यांचं ह्मणणं राज्य जावो परतं पण पळणें नको. रोज उठून संथपणा जिवाला बिलकुल नाहीं. छत्रपति देखील असेंच ह्मणत होते ह्मणतात.

**वाजी०**—एकून माझ्यासाठीं त्यांनां एवढा त्रास आं ! मी त्यांनां जाऊन सांगतों कीं, तुमच्या राज्याच्या रक्षणासाठीं मी एवढा मरी मरतों. नाहीं तर मला काय ब्राह्मणाला चौखुंटीची तयारच आहे. आह्मी कारभार कधींशी करून रडलों, ते आतां दिग्विजय थोडाच करणार आहों ? देतों उद्यां पावते करून त्यांनां इंग्रजांकडे. ते करतील त्यांची तरतूद हवी तशी. आमचा दावा इंग्रजांशीं व त्यांचा आह्माशीं. ते छत्रपतींला तोशिस लावणार नाहींत.

**वारा०**—आणि आपणही.

**वाजी०**—आपण काय ? आपण त्यांच्या स्वाधीन व्हावें ?

**वारा०**—मला वाटतं लढाई करून येश येणार नाहीं.

**वाजी०**—कशावरून ?

**वारा०**—इतका वेळ नाहीं का पाहिलें ? एका तरी

लढाईंत आपला पगडा त्यांच्यावर कधीं बसला आहे? उलटी आपल्यालाच पुष्कळ ठोकर बसली. व मजल दरमजल पुणें दूर होत चाललें.

**बाजी०**—आतां त्याला काय करावें? सगळाच बेत फसला. शिंदे, होळकर, भोंसले नागपूरकर, म्है-सूरचे राजे, चंदी चंदावरचे राजे, बुंदेले सर्वांचा निश्चय कीं, एके दिवशीं सर्वांनीं उठावें. त्याप्र-माणें सांडणीस्वार रवाना करावे. परंतु एक आह्मी व नागपूरकर बाहेर पडलों. व बाकी चे जागचे जागीं ठाम आहेत. परंतु आतां ना-गपुरचे गणपतराव दिवाण व होळकराकडून राम-दीन परदेशी हे दोघे फौजा घेऊन आले आहेत. आतां धास्ती नाहीं. त्याशिवाय निपाणकर आ-हेत व पटवर्धन आहेत.

**बारा०**—काय ह्मणावें या भोळ्या स्वभावाला! अ-जून अमुक मनुष्य कसा आहे याची पारख नाहीं! शिंदे एवढें हत्तीचें जोत. त्यांचा कंपू ह्मणजे अस्सल. असं आह्मी आजवर ऐकत आलों. इकडे गादीवर यायच्या वेळेला केवढा भरंवसा होता. 'दवलतराव माझा जीव आहे' असें नेहमीं ह्मणायचं. मग आज नाहीं कुठं प्रकाश पडला तो? फार लांब कशाला? परवांच्या

कोरेगांवच्या हल्ल्यांतच लक्षांत आलें असेल कीं, तो भिकार वांकड्या इंग्रजांनां जागा देणार नाहीं. पण बापूंनीं इंग्रज गांवांत कोंबतांच दोन तास तर वांकड्याच्या दारापाशीं तुंबळ युद्ध झालें. आपल्या लोकांचा सडा झाला. बापू थांबा थांबा ह्मणतच असतात, तों आपली पळण्याची तयारी होऊन रहाते. मला वाटतं इंग्रजांनां अझून ही समजूत करून दिली, तर ते न्यायी विचारवंत आहेत. ते एकाएकीं अन्नावरून उठविणार नाहींत.

ाजी०—तूं ह्मणतेस तें खरें. पण बापू ऐकावयाचे नाहींत. त्यांनीं ह्या युद्धांत मारूं किंवा मरूं असाच दृढ संकल्प केला आहे. व माझ्या कडूनही हातावर हात मारून घेतले आहेत. नाहीं ह्मटलें, कीं तो आकाश पाताळ एक करील, आपल्याला तरी मारून घेईल, नाहींतर मलाच पार करील. मग त्याला मी कोणत्या तोंडानें बोलूं ? असो, आतां यापुढें हारि आहे. जें होणें असेल तें होईल. या उप्पर फार लटांबर बाळगायाचें नाहीं. करितां रायगडावर तुझी रवानगी करून देतों.

वारा०—जिकडे पाय तिकडे मी. मला रायगड घेऊन काय करावयाचें आहे ?

**बाजी**०--असें नको ह्मणूं. समजलीस ? सरदार लोकांचीं कुटुंबें, पोरेंबाळें घेतल्यानें जलदीनें कुच करण्यास कठीण पडतें. तिथें तुह्मांला कोणाकडून उपसर्ग होणार नाहीं. तिथला तो अरब किल्लेदार इंग्रजांच्या बापाला दाद देणार नाहीं. .( इतक्यांत बापूकडून शिपाई येतो. )

**शिपा**०--( सलाम करतो ) बापूसाब सांगत्याती सरकार, कीं हेर आल्याती. तवा बातमी लागली कीं, दोन मजल्यावर योळापुरला इंग्रजाची तुरुपं पधीतलीं. तवा बापू साहेबांचं ह्मननं कीं बेगी बेगी आटपूनश्यान जाऊंया. न्हाईतर मग अष्टयाच्या रानांत ते तुटून पडत्याल.

**बाजी**०--पहा ऐकलेंस ? इंग्रजांचीं तुरुपें दोन मजलांवर आलीं. जा स्वयंपाकाची जलदी करायला सांग. व जेवण झाल्यावर तुमची तिकडे रवानगी करून देतों व आह्मी खानदेशांत उतरतों. ( ती जाते इतक्यांत कारकून येतो ) कोण तुह्मी निपाणकरांचेना ?

**कार**०--( नमस्कार करून ) मी-ई-रुद्रप्पा-आ-( मान डोलवितो ) आप्पा साहेब बोलले-ए-कीं, महाराजाला ह्मणावं, घाबरण्याचा कांहीं कारण नाहीं. बापूंचा बोलणीं हलकाऱ्यानं त्यांला सांगितला.

इंग्रजाचा फौज अजून साताऱ्यावरच आहे.

**बाजी०**—मला तर तुमच्या या दोघांच्या भिन्न भिन्न निरोपांवरून कांहीं कळत नाहीं. एक ह्मणतो इंग्रज अगदीं तोंडावर आले आहेत. एक ह्मणतो साताऱ्यास आहेत. काय रुद्राप्पा, अप्पा देसायाला कशावरून समजलें कीं इंग्रज साताऱ्यास आहे ?

**रुद्रा०**—यंकणमल्लीचा मुद्देबिहाळचा कारकून बसाप्पा आला तो सांगतो.

**बाजी०**—अरे, बापू कशावरून ह्मणाले कीं, इंग्रज दोन मजलांवर आहेत !

**शिपा०**—हं ( मान डोलवितो. )

**बाजी**—अरे, मान काय डोलावितोस ? चांगल्या हुशार मनुष्याला पाठवून बातमी आणली आहे काय ? कोणी विश्वासू पाठविला होता ?

**शिपा०**—हं जी सरकार.

**बाजी०**—अरे कोण पाठविला होता ?

**शिपा०**—हं, जी सरकार, आपला मानाजी राऊत धाडला व्हता. त्यानं खबर आनलाया. आन् त्याला येऊनूशन् एक घटकाबी झाली न्हाई. तो ह्मंगाला आपुन झुंझुरका काळ्या तट्टावर बसून शानी जें दामटलें अन् आला. बापूसायबाचं

ह्मननं सनानसंद्या पुढंच करावी.

**वाजी०**--मोठें ल्चांडच झालें. दोघेही तुह्मी वापूला व आप्पाला माझ्या दरबारच्या डेऱ्यांत पाठवून द्या. (जी ह्मणून सर्व जातात.)

---

## प्रवेश—दुसरा.

**स्थळ**–अष्टींचें रण–ओढा.

(एक खुरडत खुरडत येतो.)

**कण्हणारा**—अग आई! आतां ही मांडी कशी सांवरून धरूं? जरा कुठें पाणी मिळेल का? हं, अहं.! (श्वास टाकतो व मागे पहातो) आले, आले, आले वाटतें. आतां कुठें जाऊं? जरा जर शाबुद असतों, तर टोपीवाल्यांचा समाचार घेतला असता. पण आतां काय लोल झालों आ-हें. हं-अग-अग-आई! माझे जिवाचे कलिंदे बापूसाहेब रणांत एकटे सोडून मी आजवर असा कधीं खबदाडांत येऊन पडलों नाहीं. (दूरवर पहातो) दोघे इंग्रजाकडलेच येत आहेत. तर त्या या दरडी खालीं दडून बसावें. (खुरडत खुरडत जातो तो एका खाड्यांत पडतो.) अगाई अगाई! अंः अंः!

रामा रामा रामा !   पाणी, पाणी.  अं: अं: !

( इतक्यांत दोघेजण येतात )

**पाहि०**—कायरे खंड्या, बापूसाहेबांच्या तूं कोठवर बरोबर होतास ?

**खंडू०**—सायब लोकांच्या मदल्या पळटणीवर तोफा बंद पाडून एकदम घुसले व पळटणाची नासाडी करून दिली तंवर व्हतों. मग मला तुह्मी पाहतां. हा वार डोक्यावरच लागला तसा मट्टदिशीं खालींच बसलों पगा. तरवार बिरवार गेली हातांतली कुणीकडच्या कुणीकड ! मग अंमळ तासाभरानं सुदीवर आलों. पाहिलं तो आपलेच लोक पळत हायती. मंग काय करावं ? हळूहळू खुरडत खुरडत वड्यांत गेलों. डोकं साफ धुतलं. पट्टी बांदली. आतां या घळींतून पुढें पंडरपुरला जायचं मनांत व्हतं. कारन तात्या, शिरिमंतांकड आतां कोन हाय ? आपल गोइन्दराव न्हाइत, राधाबाई बी न्हाई. आन् आतां बापूबी नाहींती ! त्यासारख धनी व्हायच नाहींत. ओ-अं: ( रडूं लागतो. )

**विठ्ठल०**—अरे, आतां रडून काय उपयोग ? पुण्यास आपल्या यमुनावहिनी आहेत. या चला त्यांच्याकडे जाऊं. पंढरपुराकडे असा वांकडा कशाला ?

**विठ्ठ०**—त्यांनां वातमी आधीं होती. पण ती आमच्याकडून ! नेहमींप्रमाणें रामचंद्रपंत सुभेदार हे आपल्या व इंग्रजांच्या मध्यें हमेशा असत. पण काल बुधवारीं त्यांचा मुक्काम भलत्याच ठिकाणीं ह्मणजे विश्यास झाला. व विंचूरकरांचें ही घोडदळ मागें राहिलें. तेव्हां श्रीमंतांला बापूंनीं वर्दी दिली कीं, इंग्रज वेळापुरावर आहे. आपण रात्रौ मेखा उपटून १९ । २० कोसांचा छाटा ठेवावा. मग तेथें स्नानसंध्या यथास्थित करावी. पण श्रीमंतांपाशीं तेव्हां निपाणकर होते, ते ह्मणाले ही बातमी खोटी आहे. माझे लोक पाळतीवर आहेत. येथेंच स्नानादि विधि उरकून घ्यावा.

**अन्या०**—काय लुच्चा निपाणकर तरी! आतां तो आहे कोठें ?

**विठ्ठ०**—ते, नारोपंत आपटे व चिमाप्पासाहेब खालीं निपाणीकडे वळले. तिकडे जाऊन काय रडणार आहेत ! तें त्यांचें व्यर्थ आहे.

**अन्या०**— बरें, इंग्रज आल्याची आवई पहिल्यानें कोणीं आणली विठ्ठलपंत ?

**विठ्ठ०**—गोविंदराव घोरपडे व आनंदराव बाबर हे दोघे सकाळीं लष्करांत दौडत आले आणि

**कण्हणारा**—अं: मला पाणी! पाणी! अं: ( असा आवाज होतो. हे दोघे इकडे तिकडे पाहतात )

**खंडू**—( दचकतो ) तुमास्नी काई ऐकूं आलं?

**विठ्ठल०**—हो. कोणी, कण्हत आहे पहा. ( खंडू फिरून फिरून खाड्यापाशीं येतो व न्याहाळून पाहतो व ओळखल्यासारखें करून ह्मणतो. )

**खंडू**—आन् आन्याबा, तुह्मी हकड कुणीकड? इटलपंत, पानी आना जरा वंजळी वंजळीनं. मी यांनां वर काढतो. ( विठ्ठलपंत पाणी आणतो व त्याच्या तोंडांत घालतो. )

**अन्या०**—( सावध होऊन ) कोण ते पुणेकर? मला जरा बसता करून माझी मांडी जरा सारखी करा, आणि वरून पट्टा लपेटा. मग औषधें पाहूं. माझा तहानेनें जीव अगदीं व्याकूळ झाला होता.

**विठ्ठल०**—अरेरेरे! जबरदस्त जखम झाली आहे. आंता इथें रामबाण कणसें मिळतीं तर उत्तम झालें असतें. बरं, खंड्या, पट्या तयार करून ठेव. मी जवळच्याच दरडीच्या बाजूला कांहीं वनस्पति पाहिल्या आहेत, त्या आणून देतों. ( जातो व येतो ) अरे, अगदीं जवळ सांपडली. तुमच्या मांडीच्या हाडाला कांहीं इजा झाली आहे?

अन्या०—मग ?

विठ्ठ०—मग काय. मधल्या टोळीवर बापूंचा एवढा गहजब झाला पाहून बाजूच्या दोहोंपैकीं एक तुकडी बापूवर तुटून पडली. मग हें पाठबळ आलें असें पाहून पळत होते ते देखील उलटले. आणि मोठा हल्ला सुरू झाला. इकडे बाकीची सरलष्कर निपाणकराची फौज होती, पण तिनें एक बारही काढला नाहीं! आणि गोऱ्या पळटणींनें मराठी सैन्यांत गोंधळ करून टाकिला.

अन्या०—बाजीरावसाहेब कुठें होते ?

विठ्ठ०—ते लढाईचें तोंड लागल्याबरोबर छत्रपती सुद्धां दोन कोसांवर पळाले होते. पण या अष्टीच्या लढाईत फत्ते झाल्याबराबर साहेबी तुरुपें पाठीमागें लागलीं. व आईसाहेब, व बुवा साहेब व आप्पासाहेब महाराज ही सर्व मंडळी इंग्रजांचे हातीं लागली. कारण छत्रपति पुढें पळेचनासे झाले. श्रीमंत जे एकदां घोड्याला टांच मारून निघाले ते केवढाही पाठलाग झाला तरी थांबले नाहींत. डेंगळे त्रिंबकजीही पळून गेले!

अन्या०—कायहो, असा गफलतीचा प्रकार झाला तरी कसा! नाहींतर श्रीमंतांनां आधीं खबर नसावी काय ?

ह्मणाले, इंग्रज दोन कोसांवर आले आहेत. आह्मांलाही पाहून कांहीं स्वार पाठीशीं लागले. पण रानांत त्यांनां झुकांडी देऊन आलों. बापूंनीं गोविंदरावाला बाजीरावाकडे धाडलें, तेव्हां निपाणकर देसाई उलटे घोरपड्यालाच रागें भरले आणि ह्मणाले, तुह्माला स्वप्न पडलें असेल. तेव्हां घोरपडे हिरमुसले होऊन परत आले. घोरपडे व बाबर दोघे बिचारे आज पडले बापूं बराबर इतकें होत आहे तों, सव्वाप्रहर दिवसाला यमस्वरूप पळटणें आलीं. त्यांचा धुरळा देखील अर्ध कोसावरून दिसूं लागला. मग श्रीमंत घाबरले व बापूंला डेऱ्याला बोलावून नेलें. आणि 'आतां प्राण वांचविणें तुह्मांवर आहे' ह्मणून विनविलें. निपाणकरासही संतापून सरकार ह्मणाले, कीं 'तुह्मी फार योग्य डाव साधिला. अस्तु. पुनरपि भेटीची इच्छा नाहीं.' तेव्हां निपाणकर उठोन गेले. बापूसाहेब तडक आपल्या डेरियांत येवोन सज्ज होऊन एका आंगरख्यानिशीं त्यांच्या त्या मारुती घोड्यावर स्वार होऊन अडीचशें स्वारांनिशीं गोट आंवळून उभे राहिले. बाबासाहेब व छत्रपतिसाहेब पळाले. मग अखेरीस लढाईंत बापूंचा शोध लागला नाहीं.

**अन्या०**—नाहीं. नुसता मांसाला घाव बसला पुणे-
कर.

**विठ्ठल०**—खंड्या, ही घे ती वनस्पति. हिचा रस काढून जखमेवर पीळ मग पट्टी बांधूं. (त्याप्रमाणें करतात.)

**अन्या०**—(कांहीं वेळानें जखम चांचपून) आतां जरा मला ठणका कमी वाटतो. काय लढाईचें झालें तुह्मांला माहित आहे?

**विठ्ठ०**—तुह्मी कोठवर होतां?

**अन्या०**—आपली पहिली बंदुकीची मारागिरी चालली तेव्हां मी होतों. नंतर हल्ला चढला. तेव्हां मला मांडींत वार बसला व घोड्यालाही गोळी लागून तो ठार झाला. तेव्हां मी एकदम खालीं पडलों. पण आपला बाजूला होतों ह्मणून वांचलों. नाहीं तर गच्छंतीच होती. बरें, पुढचें कांहीं तुह्मांला ठाऊक आहे काय?

**विठ्ठ०**—होय. जेव्हां तोफा बंद पडल्या, तेव्हां दोहींकडले स्वार एकमेकांवर आवेशानें चालून गेले. काटाकाटी सुरू झाली. बापूंची फळी फोडून जाण्याचा इंग्रजी स्वारांचा मतलब होता. पण जितक्या वेळेला हल्ला आला तितक्या वेळां झोडपून काढलें आहे.

**अन्या०**—मग काय त्यांतून पार निघून गेले ह्मणावयाचे ?

**विठ्ठ०**—छे: तिसऱ्या प्रहरानंतर मेण्यांतून एक भव्य प्रेत आणून इंग्रजांनीं महाराज छत्रपति यांस दाखविलें. त्यांनीं तें ओळखून आपल्या वांकनिसास अग्नि देण्यास सांगितलें ? हें इतकें पाहिल्यावर दिलगीर होऊन पुण्याला जाण्याच्या हेतूनें छपून छपून ओढ्यांतून चाललों होतों, तों हा खंड्या भेटला. तो व मी मिळून इकडे आलों. तों तुमची आयतीच गांठ पडली.

**अन्या०**—अरेरे ! एकून बापू गेले ! हे फरजचि गेले ह्मणावयाचे ! आतां काय प्यादे मात झाली.

**विठ्ठ०**—तुह्मी आजारी आहां तर तुह्मांला अष्टींत ठेवतों पाहिजे तर ?

**अन्या०**—मला बहुधा एक दोन दिवसांत चांगलें चालण्याचें सामर्थ्य येईल वाटतें. तर तुह्मीही ज़रा थांबा. आपण तिघे मिळूनच जाऊं आतां. पाहिजे तर पुण्याच्या वाटेला शेटफळला चला अगर निवांत जागा हवी असल्यास करकंबेला चला. जवळ आहे.

**विठ्ठ०**—पण आज रात्रीच्या रात्र अष्टींतच मुक्काम करूंया. तुह्मांला चालायची पंचाईत प-

डेल,. तर खंड्याच्या पाठिंगुळीला बसा. तो नेईल तुह्माला अलगच.

**अन्या०**—खरेंच. ओढ्यांत नको रात्रीचें. जरा पाय जप बरं रे खंडू ?

**खंडू०**—अक्षी फुलातल्या वानी नेतो पगा. (त्याला उचलून पाठीशीं घेतो. सर्व जातात.)

---

## प्रवेश—तिसरा.

### स्थळ–सिंदवें.

(बाजीरावसाहेब पेशवे येतात.)

**बाजी०**—(मनाशीं) हर हर हर! हे देवा, हे परमेश्वरा, कोण हा दुर्धर प्रसंग या दासानुदासावर आणला आहेस! किंचित् देखील शीत व उष्ण सहन करण्याचा प्रसंग आजन्मांत यावयाचा नव्हे तोही येऊन चुकला. अक्षयीं साता मजल्याच्या हवेलींत बसून हुकूम करणारा अशाला दैवयोगें या वटवृक्षाखालीं उन्हांत तळपत बसण्याचा प्रसंग आला! नुसता नेत्रानें संकेत व्हावयाचा अवकाश तों, शेकडों मनुष्य लोटणार; त्या मला आतां स्वतःच घोड्यास चुचकारून धरावें लागतें! प्रत्यहीं

पंक्तीस हजार पांचशें पान झाल्याशिवाय राहवयाचेंच नाहीं; त्या मला आतां स्वतःला भात मिळण्याची पंचाईत आली. जे वाड्यांत माझ्या जीवावर उड्या मारीत होते. ते सर्व आतां आणीबाणीच्या प्रसंगीं खुशाल मला टाकून गेले. जे माझे जीवश्च कंठश्च ह्मणत होतों त्यांनीं पारडें फिरलें असें पहातांच आपला रस्ता स्वीकारला. माझा बापू गोखला नसता तर इतकेही प्रसंग पण आमचे हातून होतेना. आतां तरी हे बिचारे दोन सरदार आपल्या तनु, मन, धनानिशीं माझी सेवा करीत आहेत. त्यांचे उपकार कोठें फेडूं? निपाणकरांचा अखेरपर्यंत मला मोठा भरंवसा होता. पण कड्याळ अंगाशीं येत आहे हें पाहतांच त्यानें व पटवर्धनांनीं गांशा गुंडाळला. देवा, मित्र ते शत्रु व शत्रु ते मित्र झाले. हाय, हाय!!

असो, परंतु इतक्या सर्व आपदांस मूळ कोण मी व माझा राज्यलोभ. काय मी आईच्या नादाला लागलों आणि नाना कारस्थानें केलीं. ह्मण आहे आधीं बुद्धि जाते व मग भांडवल जातें. तशी माझी अवस्था झाली. म्यां जारणमारणें करून सवाई माधवरावाचा घात चिंतावा काय? बापाचा घात दादांनीं केला व मुलाचा घात मींच

केला ह्मणावयाचा! (कपाळाला बोट लावतो) झालें, या दोन ब्रह्महत्या बोकांडीं बसल्या त्या काय आह्मांस राज्य पचूं देतात? हेंच मूळ बीज झालें. बरें, मगतरी सव्वा हात गादीसाठीं दीड कोट रुपये शिंद्याला कबुल केले! मला वाटलें दिल्ली अटकेचा खजिना जवेरखान्यांत भरला असेल. परंतु गादीवर आल्यावर तो भ्रम अगदीं गेला, उलटे लक्षावधि रुपयांचे कर्जाचे रोखे पाहिले. तेव्हां राज्य करणें फुकाचें नाहीं असें कळून आलें. मग शिंद्याची तुंबडी भरण्यास्तव सरजेराव घाटग्याला पुण्यांतल्या लोकांवर पोळ सोडला. त्यानें पुष्कळ निरापराधी जनांस विनाकारण पीडा केली. त्यानेंच ह्या विषवृक्षास सिंचन झालें. यशवंतराव होळकराचा भाऊ विठोजी, बाळोजी कुंजराच्या सांगीनें हत्तीचे पायीं निष्कारण दिला तेंच यास खत झालें. यशवंतरावानें आमची धिंडका काढून सुवर्णदुर्गाकडे लावून दिलें व तेथून वसईचा तह करून हात पाय बांधून घेऊन बसलों हाच आपत्तीचा अंकूर फुटला. परस्त्रियांचें पातिव्रत्यहरण, प्रजाजनांचें वित्तापहरण व ज्यांनीं मला आणून सुखानें पंचामृत चारिलें त्यांच्याशींच द्वेषवर्धन केलें यांहींकरून हा वृक्ष वाढविला. व त्याच्यावर

गंगाधरशास्त्रीवधाचें नवें कलम केलें. आणि त्रिंबकजीच्या चिथावणीनें सगळ्या कापट्याच्या शाखा आणविल्या. तेव्हां त्याला निःसीम शूर-पुरुष-मरण, गहन-कांताराटन, व राज्यच्युति हीं विषमय फळें आलीं आहेत. त्यांतलि कांहीं सेविलीं आहेत व एक शेवटचें परम कटु एकदां घेतलें ह्मणजे सुटलों या यातनांतून. (उठून इकडे तिकडे फिरतो.) काय, आतां जर कोणी मला विचारील तर मी त्याला असा कित्ता घालून देईन कीं ज्याचें नांव तो. परंतु हातचा ससा गेल्यावर पारधीची मात काय बोलावी. (खिन्न होतो) तोंड देखल्या बोलण्याला फसूं नको. स्नेह्याशीं कृत्रिमपणें वागूं नको; परस्त्रीचा छळ करूं नको; अयोग्य मार्गानें चालूं नको. भरंवसा दिल्यावर तोंडघशीं पाडूं नको. असे ठोकळ ठोकळ नियम त्यास सांगेन. परंतु वाघ जसा सांपळ्यांत जखडून जातो तशीच केवळ स्थिति झाली आहे. आणि तापीकांठ ओलांडून या अशा मुलखांत येऊन पडलों आहें कीं, नदी, नाला, ओढा, गांव, शिव वगैरे मुदलींच ठाऊक नाहींत. आज चोहोंकडून घेरलों आहों असें सगळे सांगतात; तेव्हां आतां लढाई देऊन काय परिणाम लागणार?

(इतक्यांत पुरंदरे व विंचूरकर येतात.)

**आबा**—तुह्मीं कुठें पाहिलेत ह्मणतां !

**विठ्ठ०**—अहो मघांशीं तो रामसिंग येऊन सांगूं लागला कीं, उत्तर, पश्चिम, दक्षिण, सर्व दिशा त्यांनीं बांधल्या.

**आबा**—बांधल्या! आं-(श्रीमंतांस पाहून चपापतात) सरकार स्वारी इकडे डेरा सोडून केंव्हां आली ?

**बाजी०**—दिवस जरा कलंडल्यावर अंमळ मोकळेपणें फिरण्यासाठीं येथें आलों. डेऱ्यांत राहून राहून अगदीं कंटाळा आला. काय तुह्मांला कांहीं जायाला लाग लागतो का ?

**आबा**—नाहीं सरकार, गणपतराव नागपुरवाले यांच्याकडे चोहोंकडून वर्तमान आलें कीं, हुषंगाबादेवरून जरणाल अदाम व वऱ्हाडांतून दिवठाण हे साहेब बरोबर फौजा घेऊन आपल्याच रोखें आले आहेत. आणि सेनापति आपासाहेब भोंसले यांचा सिताबर्डीवर पराभव होऊन ते कोठें फरारी झाले आहेत.

**बाजी०**—अरेरेरे! एकून आपाची ही तीच अवस्था झाली काय ? एकंदरींत जयश्रीनें इंग्रजालाच माळ घातली. तर मग ठीक आहे. आपण आनंदराव चंदावाडकर यास महूस धाडलें आहे, त्याचा ते काय जबाब घेऊन येतात पहावें. मग सगळाच

णार ? पुरंदरे व विंचूरकर, मला तुमच्याबद्दल फार वाईट वाटतें. तुह्मी मोडक्या भिंतीशीं पाठ दिली आहांत हें ठीक नाहीं. ही इतकी जीर्ण झाली आहे कीं, अर्धी अधिक ढांसळली आहे. याहून जास्त अंत पहाल तर तुमच्या पदरीं चार कच्चींबच्चीं आहेत त्यांचीही दैना उडेल. माझे पाय पुनरपि पुण्याला लागतील असा आतां बिलकूल रंग नाहीं. यास्तव मी खुषीनें होऊन तुह्मांस आज्ञा देतों कीं, तुह्मीही जा आणि इंग्रज टोपीवाल्याचा जवळचा गोट पकडा, आणि सांगा कीं प्रधान पेशवे यांची तब्यित स्थितीवर नाहीं. ते तुमचा मरातबच करतील. जा शुष्कपर्णपादपाला वेंगाटून कांहीं मिळणें नाहीं. माझा राग नाहीं. खरोखर सांगतों लोभच आहे.

आबा—नाहीं सरकार, असें आपण ह्मणूं नये. आतां आमचा सोक्ष मोक्ष काय तो आपणाबराबरच. आपण जेथें तेथें आह्मी. आजवर मीठ खाल्लें आतां थोडक्यासाठीं हरामखोर होणें कपाळीं नको. वैभव नशिबीं असल्यास राहील. अगर पुढेंही मिळेल. परंतु स्वामिभक्तीची घडी पुनरपि बसणें नाहीं. पोराबाळांविषयीं आपलें

ह्मणणें आहे. परंतु तीं कोणाच्या नशिबावर का जन्मलीं आहेत ? आपण आमची काळजी निखालस करूं नये. हाच प्रसंग असा सदोदित राहील असा नाहीं. तो 'चक्रनेमिक्रमेण' फिरताच रहाणार. संपत्ती ही काय दुपारची सांवली आहे. आपण आमच्याबद्दल अगदीं खिन्न होऊं नये.

**बाजी०**—विंचूरकर, तुमचाच सल्ला पहिल्यानें ऐकून जरा दम धरतों व काळे ह्मणत होते तसें सहा आणे करभार देतों व सर्व समर्थ इंग्रजांशीं लढाई घेतोंना तर आज अशा पल्ल्यास गोष्ट येतीचना.

**विठ्ठ०**—सरकार, त्यांत कांहीं दुःख करून उपयोगी नाहीं. होणारासारखी बुद्धि झाली. नाहीं तर आह्मीं सूचविलेल्या सामान्य गोष्टी सिंहदृष्टीच्या गोखल्यास दिसूं नयेत काय ? सोन्याचा मृग कोठें तरी असेल काय ? परंतु श्रीरामचंद्रजी त्याचे पाठीमागें लागले. द्यूत खेळल्यापासून महान् अनर्थ ओढवतील हें कुंतिपुत्र युधिष्ठिर जाणून नव्हता काय ? परंतु होणाऱ्या अनर्थाला करतात काय ? झालाच. तद्वत् आहे.

**बाजी०**—नाहीं हो. माझ्या हातून घोर कृत्यें भारीं घडलीं. त्याचें हें प्रायश्चित्त देव येथें देतो आहे व परलोकींही याहून कठीण शासन करील.

**आबा**--नाहीं महाराज, ती गोष्ट काढूं नये. झालें तें झालें. ( इतक्यांत शिपाई येतो. )

**शिपा०**--सरकार, महूपुन आनंदराव, आन् दोन साहेब आल्याती. त्यासनी कचेरीच्या डेऱ्यामंदी बसवून ह्यानीं आनंदराव बोलले कीं, आपल्या पायांपाशीं जाऊन वरदी दे. ह्मूनशेनं मी आलोंया.

**विठ्ठ०**--काय ह्मणतोस आनंदराव व बरोबर दोन इंग्रज आले आहेत? बरें आहे. सरकार चलावें डेऱ्यामध्यें. बहुधा हे त्यांचे वकीलच असतील.

**आबा**-- पाहूं त्यांचें काय ह्मणणें आहे तें. नाहीं तर तीन दिवस घनचक्कर लढाई मारूं असा इतका सरंजाम बापूचा व माझा आहे.

**बाजी०**--पण कायहो, ते मला धरणार नाहींत ना?

**विठ्ठ०**--छे;, ते वकील असतील बहुधा. तितक्यांतून वलकुवलीचा प्रसंग आल्यास आह्मी नमचे चढवून तयार ठेवतों. आपण स्वस्थ असावें. जारे माझ्या गोटांत जाऊन लालासिंगाला घेऊन ये. मी तिकडे सदरेच्या डेऱ्यांत आहें. ( 'जी' ह्मणून तो जातो. )

**बाजी०**--बरें आहे. तुमच्या मर्जीबाहेर मी कोठें आहे? चला. ( सर्व जातात )

## प्रवेश—चवथा.

### स्थळ—वोरी.

( दरबार—भेट. बाजीरावसाहेब व मालकम साहेब यांची. )

**मालकम**—आपल्या ध्यानांत सर्व गोष्टी आल्या ?

**बाजी०**—महाराज, माझ्या ह्या आधींच येऊन चुकल्या आहेत. ते असें चोहोंकडून अडवून कशाला धरितात ? मी सांगतोंना सगळी आगळीक माझी आहे. या माझ्या ( जीभ चावतो-अरेरेरे ! माझ्या ह्मणण्यास सत्ता राहिली नाहीं. ) ह्या महाराष्ट्र देशावर संकट रूप काहूर जर कोणीं ओढवून आणिलें असेल तर तें मींच. मी गुन्हेगारांतला गुन्हेगार आहें. मी दासांतला दास आहें. मी ( छातीस हात लावून ) आधमांतला अधम आहें. शास्त्री मेला माझ्याचमुळें. रेसिदेन्सी लुटली गेली माझ्यामुळें. आपण ह्मणतां रामदिनाचा पक्ष सोडा, सोडला. आपण डोनाल्दबलो याजबरोबर निरोप धाडिला कीं, बोलणें सवरणें येथें करूं, त्यास आज दोन तीन दिवस गुजरले आह्मी आपल्या आज्ञेनें ( असेंच आतां ह्मटलें पाहिजे ) येथें आलों. झालेल्या गोष्टीवरून अपराध आमचाच

सर्वस्वी आहे. तेव्हां तुह्मांला अशा कृतघ्नाला पुनः गादीवर नेऊन बसविण्याचें मनांत येत नाहीं ना?

**मालकम**—नाहीं सरकार, आपण अझून मोकळे आहां. आपण स्वेच्छेनें येथें आलां आहां. आमचा शक आपणांवर नाहीं. माहुलीस आपल्यास सर्व राजचिन्हांनीं मंडित आज सात महिन्यांपूर्वी ज्या वैभवश्रींत आह्मी पाहिलें होतें. त्या आपली आज अशी दैन्य दशा उडावी व ती आमच्या सारख्या अभाग्यांनीं पहावी याचें आह्मांस फार दुःख होतें आहे. तथापि आतां गोष्ट इतक्या थरावर आल्यावर आपली माझी गांठ पडली. तेव्हां मला माझ्या वरिष्ठांच्या आज्ञेबाहेर जाववत नाहीं. एवढा वेळ जी हकिगत ऐकिली त्यावरून सर्वस्वी आपल्यावर अपेशाचें खापर ओढून घेतलेंत याचा प्रतिकार आधीं मी केला असता. परंतु आतां मी बांधला गेलों आहें.

**बाजी०**—महाराज, इतर साहेब लोक का थोडे आहेत? परंतु मनाचा असाच निश्चय कीं, आमचे पूर्वापार दोस्त तिघेजण. ( बोटें करतो ) एक बसलीसाहेब याला माझा केवढा अभिमान? बापू आमचे सांगत, आसईच्या लढाईच्या आधीं बापू व बसली रात्रीच्या रात्री बोलण्यांत घालवीत. तेव्हां त्यांनीं ह्मणावें

कारभाऱ्यांची पैरवी मोडून बाजीरावानें सुखानें राज्य करावें व मित्रत्वानें असावें अशी आमच्या धन्याची ह्मणजे तुमच्या विलायतच्या बादशाहाची इच्छा आहे. दुसरा तो भोळा विचारा कर्णेल कलुष साहेब त्याचाही माझ्यावर मोठा लोभ. आणि तिसरे आपण माझे दादासाहेब समक्ष पुढें आहां. ही तरवार ( पुढें करतो ) घ्या आणि माझी मान कापा.

**माल०**—( गहिंवरतो ) छे, छे, सरकार आपला दर्जा आपली योग्यता मी पूर्ण जाणून आहें. आपल्यावर असा प्रसंग येऊं नये आला. ही देवाची मर्जी. आतां माझ्या हातांत जास्त सत्ता राहिलीच नाहीं. नाहीं तर त्यांतल्या त्यांत सवड काढली असती. आतां आपण आपले बंधु चिमाजी आपा यांविषयीं बोललां आहां. त्याबद्दल माझे ध्यानांत आहे. मी वरिष्ठ सरकारांत व अल्पिष्टन साहेबाला पुण्याला लिहितों. ते त्यास ज्या उपायानें तेथें स्थापतील असें करवीन.

**बाजी०**—बरें आहे. एवढी जरी भिक्षा घातलीत तरी आह्मांवर महदुपकार होणार आहेत. ( पदर पसरतो. )

**माल०**—छे, छे, असें करूं नये. आह्मी काय कोण-

त्या झाडाचा पाला. आपण माझे अन्यायी नाहीं. आमचे सरकारचे संशयी आहां. आपल्यास निवांत स्थळ पाहून द्यावें एवढी आह्मांस आज्ञा आहे. त्याप्रमाणें जसा निदेश होईल तसें करीन. द्वारकेस पाहिजेल द्वारकेस, अगर पुरीस पाहिजेल पुरीस अथवा गयेस, प्रयागास अगर काशींतही मर्जी असल्यास रहावें.

**बाजी०**—नको नको. मला गया, काशी कांहीं नको. जेथें कोणाचा विशेष उपसर्ग नाहीं असें एकादें गांव भागीरथी तटाकीं पाहून द्या. ह्मणजे तेथें सुखानें कालक्षेप करीन.

**मालकम**—आह्मी स्वतः तिकडील जागा पाहिल्या आहेत. तर कानपुरानजिक बिठूर ह्मणून लहान टुमदार गांव आहे. भोंवतालीं तरुवरांचीं घट्ट वनें लागून गेलीं आहेत. भागीरथी ही अगदींच जवळ आहे.

**बाजी०**—कायहो आबा, 'बिठूर' तुह्मी हिंदुस्थानांत गेले होतेत तेव्हां पाहिलें होतें काय ?

**विठ्ठ०**—होय सरकार. मीं पाहिलें आहे, आबांनीं पाहिलें नाहीं. ते लहान होते; जागा खाशा आहे.

**बाजी०**—बरें, तेथें मी आपल्या मुलांमाणसांसुद्धां जाऊन राहूं काय ? जशी आपली आज्ञा होईल तशी.

**माल०**—ठीक आहे. तिकडे सुखरूप पोंहोंचविण्याची तजवीज करतों. मात्र फौजफांटा जवळ बाळगावयाचा नाहीं.

**बाजी०**—छे, छे, छे, मला आतां कांहीं नको. ही घ्या माझी देखील तरवार. मला त्या भानगडीची पुनरपि गरज नाहीं. माझा चरितार्थ त्या गांवावर चालला ह्मणजे झालें.

**माल०**—नाहीं सरकार, गांवाशिवाची खटपट आपल्यावर ठेवली नाहीं. अपल्यास नक्त नेमणुक कांहीं तरी जी आपण सांगाल त्याजबद्दल विचार करण्यास सांगितलें आहे.

**विठ्ठ०**—सरकारांनीं खुद्द या बाबतींत बोलणें ह्मणजे कठीण आहे. आपली आज्ञा होईल तर मी बोलतों.

**माल०**—बोला बोला. तुह्मी बोललेत ह्मणून कांहीं वावगें नाहीं.

**विठ्ठ०**—सरकारच्या बरोबर हजार पांचशें मनुष्य चाकर प्यादें ह्मणून सहज राहणारच. आतां सैन्याला जरी फांटा दिला तरी इतकीं मनुष्यें अवश्य नकोत का ?

**माल०**—जुजबी लागतील तेवढीं ठेवावीं. त्यास आमची मनाई नाहीं.

**विठ्ठ०**—दानधर्म पूर्वीं कोट्यावधि रुपयांचा करीत. आतां थोडा तरी केला पाहिजे.

**माल०**—धर्माआड येण्याची आमची इच्छा नाहीं. तो वेतवात पाहून करावा.

**विठ्ठ०**—बरें तर. एक कोट रुपये सालिना निवळ खर्च येईल तेवढा जरी मिळाला तरी बस्स आहे.

**माल०**—अबबब! (तोंडास हात लावितो) अहो, एवढा आमच्या बादशहाचा विलायतेस खर्च नाहीं! तुह्मी कांहीं अघटित सांगतां. कांहीं जर कमी सांगाल तर आमचा निभाव आहे. कारण वरिष्ठ सरकारानें कोणताही ठपका ठेवूं नये असें झालें पाहिजे. आपण सांगाल तें तरी आमच्या आटोक्याच्या बाहेर नसावें.

**बाजी०**—तर मग काय ह्मणतां आह्मी पोटालाही कांहीं मागूं नये? अहो, एवढी आमची १८ कोटींची दवलत जाऊन अगदीं फांक्या मारण्याचा दिवस देवा आणलास काय! आज लोकांपुढें दांत विचकणें आलें! (श्रमी होतात.)

**माल०**—महाराज, माझी फार नाजुक स्थिति आहे. मला ताजव्यांत राहून काम केलें पाहिजे. तिकडे आमच्या सरकारचें हित पाहिलें पाहिजे. इकडे आपल्यावर असा दुर्धर प्रसंग पाहूनही काळीज करपतें. मला आपण बचावा ह्मणजे झालें.

**विठ्ठ०**—बरें तर. निमी रक्कम द्या. ५० लाख रुपये. (मालकम साहेब हुंकार देत नाहीं.)

बाजी०--तर काय लाख रुपये देतां ?

माल०--नाहीं सरकार, असें अनुचित कसें बोलेन ? पांच लाख रुपयांपर्यंत जोखीम मी आपल्या अंगावर घेतों. मग त्याबद्दल जबाबदार मी. ते आपल्याला हप्त्या हप्त्यांनीं पोहोंचविण्याची हमी माझेकडे लागली.

विठ्ठ०--( पेशव्यांच्या कानांत ) अमृतराव रावसाहेबांना जेवढे आहेत तेवढे मागूं का ? कारण येथें तितके देखील मिळण्याची मारामार.

बाजी०--बरें आहे. मागा तर. ( मनाशीं ) हे देवा, अन्याय व अविचार यांचें असें अगदीं कडूफळ तें हें. नशीब ! ! हरीची मर्जी.

विठ्ठ०--बरें तर. रावसाहेबांना काशींत ठेवले आहेत. त्यांचे एवढा तरी खर्च मिळेल ?

माल०--हें फार चांगलें सांगितलेंत. सालीना आठ लाख रुपये देण्याविषयीं सरकारांत मी लिहितों.

विठ्ठ०--ह्मणजे तेवढे देखील मिळण्याबद्दल वानवा झाला! आपण लिहिणार, मग मंजूर होणार. ह्मणजे लांबणीवर प्रकरण पडलें.

माल०--नाहीं. कायदेशीर आमच्या दरबारी रीती प्रमाणें केलें पाहिजे. बाकी वस्तुतः ऐवज बिठ्ठरास जावयाच्या आधीं पोंचता करून देऊं.

बाजी०--परंतु वरील अटीला कबूल होते वेळीं या हत

भाग्याला कांहीं मागणें असेल तें तेवढें कृपा करून मान्य होईल का ?

**माल०**---काय सरकार, आमचें सरकार योग्य तें केल्या वांचून राहणार नाहीं.

**बाजी०**---आमच्याबरोबर हे दोन सरदार पुरंदरे व तात्या विंचूरकर आले आहेत, यांचे सरंजाम यांना चालवावे. व दुसरे ज्यांचीं संस्थानें आजवर चालत आलीं आहेत त्यांना तशींच यावच्चंद्र दिवाकर चालवावीं.

**माल०**---ठीक आहे. या कामांत आमच्याकडून कसूर होणार नाहीं. कारण ते जसे आजपर्यंत आपल्यास राजनिष्ठ राहिले तसेच पुढें राहतील तर आह्मी आपलें राज्य त्यांच्या जोरावर तितकें दृढ समजूं.

**बाजी०**---दुसरें, देवस्थानें, अन्नछत्रें, तक्ये वगैरे जीं आजवर चालत आलीं आहेत तीं तशींच ठेवावीं. त्यांचा उच्छेद व अपहार होऊं नये. ह्मणजे तीं आजवर जसें आमचें अभिष्ट चिंतून आहेत तसेंच आपल्याहीं राज्याचें चिंतितील.

**माल०**---त्यांतही हो ह्मणावयाला आह्मांला कांहीं अडचण दिसत नाहीं. कारण आमचें सरकार धर्माच्या बाबतींत कोणावर ही जुलूम किंवा अन्याय करणारें नाहीं.

**बाजी०**—बरें हजारों कोसांवरून ब्राह्मण श्रावण मासीं येतील आणि विन्मुख जातील तर त्यांची कांहीं सोय होईल तर वरें.

**माल०**—खरें तें. पण आपल्या वेळेला हवे तेवढे लोक देशादेशांहून येत. आणि आतां तसें आमच्या हातून होणें नाहीं. मागच्या नमूद केलेल्या प्रमाणें दक्षिणा देण्यांत येतील.

**बाजी०**—बरें, मर्जी आपली. परंतु सर्वांत सांगावयाचें मुख्य कलम तें हें कीं, माझ्या निःसीम सेवेंत राहून ज्यानें आपला जीव देखील घातला व जो परमोदार, धीर, शूर, वीराग्रणी तो माझा सरदार बापू गोखले याचा नष्टांश झाला आहे. त्याची पत्नी साध्वी यमुनाबाई इच्या मांडीवर दत्त देऊन बापूचे नांवें जी जहागीर चालत होती ती त्या दत्तपुत्राचे नांवें चालावी.

**माल०**—ठीक आहे. मला ही गोष्ट सर्वांत पसंत पडली. स्वामिकार्यार्थ प्राण वेंचणारे त्यांचा परामर्ष घेण्याविषयीं इतकी उत्कंठा पाहून आह्मांसही परम संतोष झाला आहे. यास्तव त्याबदलचीं सनदापत्रें येथूनच करून पाठवून देतों. कारकून, लिहा जसें सरकार सांगतील तसें.

**बाजी०**—मग आधीं त्यांचें नांव ठरविलें पाहिजे. कारण त्याशिवाय कसें लिहावें.

**माल०**--तें आपणच ठरवावें.

**बाजी०**--काय हो मुतालिक, नांव काय द्यावें ?

**पुरंदरे**--सरकार, बापूचे पितृव्य धोंडोपंतनाना मोठे लढवय्ये होते. त्यांची नक्कलच झाली आहे. तर त्यांचें नांव सरकारांनीं चालवावें.

**बाजी०**--बरें आहे. तर 'धोंडू बापूजीच्या' नांवाने सनदा लिहवा.

**माल०**--लिहा सरकार ह्मणतात तसें. बरें, हीं पाठवायाची सोय काय आहे ? त्यांचे लोक कोणी बरोबर आहेत काय ?

**बाजी०**--आहेत कांहो कोणी आपल्याजवळ ?

**त्रिं०**--नाहींत सरकार. त्यांचे कारभारी विठ्ठलपंत पुणेकर होते. पण अष्टीच्या लढाईनंतर त्यांचा थांग नाहीं. तरी बात्रा पाच्छापुरकर व दाजीबा खांडेकर हे त्यांच्या आश्रितांपैकींच आहेत. त्यांना पाठवावे.

**बाजी०**--ठीक आहे; तर वस्त्रें, शिरपेंच, कंठी, नगारा निशाण, पागा, हत्ती, सर्व त्याजबरोबर देऊन पाठवा.

**माल०**--ठीक. आपलें सर्व यथास्थित झालें पाहून मी बहुत खुषी आहें. आतां माहूली मुक्कामीं सात आठ महिन्यांपूर्वी आपली व माझी भेट झाली होती तेव्हांचें आपलें ऐश्वर्य पाहून व आ-

तांची ही अवस्था पाहून ईश्वराची करणी अगाध आहे असें खचित दिसून येतें. आतां तरी निर्वेध स्नानसंध्या करून ईश्वर चिंतनीं आयुष्य क्रमण करावें.

**बाजी०**——आतां गतगोष्टीचा शोक करून काय उपयोग! जें भवितव्य होतें तें हें झालें.

(पान सुपारी, अत्तर गुलाब, होऊन बाजीराव आपल्या गोटाकडे जातात व मालकमही जातो.)

## भरतवाक्य.

### श्लोक.

अन्यायानें अज दिन जरी राज्य तें भोगियेलें ॥
पातिव्रत्या करुनि छलना साध्विना दूषविलें ॥
त्यांच्या शापें खरतर अशा सर्व पुण्यें जळालीं ॥
राज्यश्रीवैभवमददशा संप्रति प्राप्त झाली ॥ १ ॥

आणखी—

अविश्वासी बाजी प्रभुसम नहो भूप पुढती ॥
असो इंग्रेजांची अनुदिन जगीं कीर्ति चढती ॥
फलो धात्री सस्यें, अमित गुण वर्षो घन कला ॥
सुखें नांदो येथें प्रकृति धन संयुक्त सकला ॥ २ ॥

(पडदा पडतो.)

**समाप्त.**